ग्रं. मं. ठाणे
निबंध
१०९९

# THE SCIENTIFIC OUTLOOK

DR. R. J. PHADKE

धर्म, कला, विज्ञान, शास्त्रातील लघुकथा, संशोधन, गांधीवाद, जातीयता, शिक्षण, लिपिशुद्धि इ.

# वैज्ञानिक दृष्टिकोन



REFBK-0009458

# वैज्ञानिक – दृष्टिकोन

मराठी ग्रं. सं., ठाणे, सुचकमत.
अनुक्रम 22342 वि.
क्रमांक ......70.66.... नों: दि. ......

लेखक

प्रा. डॉ. रा. ज. फडके,

पीएच. डी., ए. आर. आय. सी. ( लंडन ),

एफ. सी. एस. ( लंडन ).

ग्रं. क्र. ९५५८

REFBK-0009458

तीन रुपये

प्रकाशक :

डॉ. रा. ज. फडके,
" विश्राम ", लेव्हल
क्रॉसिंग, चेंबूर, मुं..३८.

ती. वडील व सौ. आईस
सादर समर्पित

मुद्रक :

के. एल्. एन्. राव,
मुंबई वैभव प्रेस,
वल्लभभाई पटेल रोड,
मुंबई नं. ४.

वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# प्रस्तावना

"वैज्ञानिक–दृष्टिकोन" हा अभ्यासू लेखसंग्रह प्रसिद्ध करीत असल्या-बद्दल माझे तरुण मित्र डॉ. रा. ज. फडके यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. डॉ. फडके हे रसायनशास्त्रज्ञ आहेत. लहान वयांत पीएच्. डी. ही उच्च पदवी संपादन केल्यानंतर तेरा वर्षांहून अधिक काळ त्यांनीं शिक्षण क्षेत्रांत जबाबदारीचीं कामें केली. प्राध्यापकाच्या नात्यानें त्यांनीं चांगलें यश नि ख्याति मिळविली; परंतु महत्त्वाची गोष्ट ही कीं त्यांनीं आपला व्यासंग विज्ञाना-पुरताच मर्यादित ठेवला नाहीं. धर्म, तत्त्वज्ञान, शिक्षण, संशोधन, गांधीवाद समाजवाद, भाषाशुद्धि अशा नानाविध विषयांचा आवश्यकतेनुसार त्यांनीं सचोटीनें अभ्यास केला व त्यांत बहुश्रुतता मिळविली. प्रस्तुत लेख-संग्रह हा या अभ्यासाचाच एक सुयोग्य परिणाम होय व मराठी वाचकांस हें विचार-प्रवर्तक लेखन निःसंशय आवडेल अशी मला मनोमय खात्री वाटते.

या पुस्तकांतील विषयांचें साधक–बाधक विवेचन मुद्देसूद असून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार अत्यंत तर्कनिष्ठ भूमिकेवरून करण्याचा त्यांचा प्रयत्न फलद्रुप झाला आहे.

डॉ. फडके हे उत्तर भारतीय आहेत. त्यांचें शिक्षणही तिकडेच म्हणजे हिंदींतून झालें आहे. त्या दृष्टीनें पाहतां त्यांचें मराठीवरील प्रभुत्व वाखाणण्या-सारखें नि कौतुकास्पद वाटते.

वैज्ञानिकांनीं सामाजिक प्रश्नांचा योग्य त्या प्रमाणांत अभ्यास करणें व समाजशास्त्रज्ञांनीं विज्ञानाची इष्ट ती दखल घेणें आज अत्यंत आवश्यक होऊन बसलें आहे. पाश्चात्य देशांशीं तुलना करितां आपण एक दोन शतकें तरी मागे आहोंत, असें वाटूं लागतें. जीवनाबद्दलच्या आपल्या अपेक्षा वाढल्या आहेत. प्रत्येकास चांगलें घर, चांगलें अन्न, कपडे–लत्ते, खेळ, करमणूक इत्यादि हवीं आहेत. परंतु या गोष्टी मिळविण्यासाठीं गेलीं शतकानुशतकें आपल्या अंगीं मुरलेला, आम्हांला निष्क्रिय व नादान बनविणारा चुकीचा दृष्टिकोन, आमच्या हाडींमासीं खिळलेला दैववाद आम्हीं टाकून दिला पाहिजे. आपले पंतप्रधान नेहरू "आराम हराम है" असें म्हणतात तें याच दृष्टीनें. भौतिक जीवन सुधारावयाचें तर आपणांस शास्त्राचीच कांस धरली पाहिजे व या

दृष्टीनें शास्त्राचें स्वरूप नि साध्य, संदेश नि साधनें, महति नि मर्यादा याविषयीं प्रस्तुत पुस्तकांतील चर्चा निश्चित मनोवेधक आणि उद्‌बोधक आहे. तसेंच, विज्ञानाच्या सर्वांगीण उपासनेवांचून राष्ट्राची प्रगति अशक्य असली, तरी ही विज्ञान–साधना व्यवस्थित चालविण्यासाठीं नेमक्या कोणत्या गोष्टी आधीं अमलांत आणल्या पाहिजेत याचें डॉ. फडके यांनीं केलेलें विवेचन नाविन्यपूर्ण वठलें आहे.

स्वतंत्र भारतांत निधर्मी राज्याची घोषणा सुमारें दहा वर्षांपूर्वींच झाली असली, तरी आपल्या लहानमोठ्या सामाजिक व राजकीय व्यवहारांत जातीय भावना अजूनही भरपूर प्रमाणांत आहे. आपली राष्ट्रीय उन्नति आजही जातीयवादापायीं रोखली जात आहे. डॉ. फडके यांनीं या परिस्थितीचें सांगोपांग विश्लेषण करून त्यावर या पुस्तकांत सुचविलेले विविध उपाय खरोखर मननीय व आचरणीय आहेत.

धर्माबाबतचा व्यापक दृष्टिकोन हें भारताचें अति पुरातन कालापासून चालत आलेलें वैशिष्ट्य होय. या दृष्टीनें धर्म म्हणजे अंधश्रद्धा, मतमतांचें भांडण, पोकळ भाविकपणा अगर भोळसटपणा नव्हे, हें सुचविणारें या पुस्तकामधील प्रदीर्घ लेखन कोणासही मननीय वाटेल. “ गांधीजींची अभिनव स्वराज्य–साधना ” हा लेख तळमळीनें लिहिला असून त्यांतील लो. टिळक व म. गांधी यांच्या तुलनेंत तर फारच मार्मिकता साधली आहे. “ नवी हिंदी टंक–लिपी ” हा संशोधनात्मक लेखही फार उद्‌बोधक असून हिंदी या राज्य भाषेचा वापर जेव्हां दैनंदिन व्यवहारांत होऊं लागेल तेव्हां हिंदी टंक—लेखकांच्या मंदगतीचा विचार करणें अपरिहार्य होऊन बसणार आहे. या दृष्टीनें टंकलिपी बाबतचें डॉ. फडके यांचें संशोधन भविष्यकाळांत उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

शास्त्रशुद्ध व शास्त्राभिमुख दृष्टिकोनाच्या अभावी स्वातंत्र्य मिळवूनही त्याचें पूर्ण साफल्य अजून आम्हांस प्राप्त व्हावयाचें आहे. अशा या संक्रमण काळांत या पद्धतीचीं नवविचारप्रवर्तक पुस्तकें जितकीं म्हणून प्रसिद्ध होतील, तितकीं हवींच आहेत. “ वैज्ञानिक—दृष्टिकोन ” या डॉ. फडके यांच्या पुस्तकाचें मी स्वागत करतों तें याच दृष्टीनें व या प्रयत्नांत त्यांना यश मिळावें ही माझी मनःपूर्वक इच्छा आहे.

कांग्रेस हाउस, मुंबई. —स. का. पाटील

# निवेदन

मराठी वाचकांस " वैज्ञानिक दृष्टिकोन " हा माझा लेख–संग्रह सादर करतांना मला अत्यानंद होत आहे. लेखन हा माझा व्यवसाय नाहीं व होण्याची शक्यता नाहीं. परंतु, १९४३ ते १९५४ या अवधींत, शिक्षण क्षेत्रांत काम करीत असतां, भाषण हा मात्र माझा व्यवसाय होता. त्याकरितां भरपूर वाचन करणें, शक्यतो बहुश्रुत होणें भागच होतें. या आवश्यकतेमुळेंच मी या बाबतींत श्रम घेतले व ते वाया जाऊं नयेत, म्हणून भाषणांचें रूपांतर मी हळू हळू लेखांत करूं लागलों व आनंदाची गोष्ट म्हणजे नामांकित मराठी नियत-कालिकांनीं हे माझे लेख तत्परतेनें स्वीकारले.

रसायनशास्त्राचा प्राध्यापक या दृष्टीनें सुरवातीस मला विद्यालयांतील शास्त्र विभागाच्या स्नेहसंमेलनाकरितां आमंत्रणें यावयाचीं. परंतु, पुढें हेंही बंधन राहिलें नाहीं. सामाजिक, धार्मिक, तात्विक, शैक्षणिक, राजकीय, वाङ्मयीन इतकेंच काय गांधीवादावरही मी विचार मांडावे, असा आग्रह होऊं लागला. तेव्हां, अर्थातच, कोणत्याही प्रकारचे पूर्वग्रह न बाळगतां, शक्यतों शास्त्रीय पद्धतिनें, केवळ बुद्धिवादी दृष्टिकोनांतून, या विषयांचाही मी अभ्यास केला व हें करण्यास प्राध्यापक असतां मला भरपूर सवडही मिळाली. प्रस्तुत पुस्तक हा या अभ्यासाचाच परिणाम होय; म्हणूनच, या लेख संग्रहाचें अधिकांश श्रेय मला नसून बेळगांव येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या ज्या माझ्या विद्यार्थ्यांनीं अथवा सांगली, कोल्हापुर, धारवाड, विजापुर, वेंगुर्ला, सावंतवाडी इत्यादि ठिकाणच्या ज्या त्यांच्या मित्रांनीं, हा चौफेर अभ्यास करणें मला भाग पाडलें, त्यांनाच आहे.

या माझ्या अभ्यासांत बऱ्याच गोष्टी माझ्या निदर्शनांस आल्या. अर्थकारणा-कडे महाराष्ट्रानें योग्य तें लक्ष कधींच दिलें नाहीं. पेशवाईंतही तिजोरीचा रिकामेपणा नेहमींच नडे. परंतु, त्याच्या जोडीला आधुनिक काळांत विज्ञानाची-ही आम्ही उपेक्षा केली. बुद्धिमत्तेचा अभिमान असलेल्या महाराष्ट्रानें जगदीश-चंद्र बोस, प्रफुल्लचंद्र रे, मेघनाद सहा, रामन, कृष्णन, रामानुजम, भाभा अथवा भटनागर इत्यादींच्या तोडीचा एकही शास्त्रज्ञ भारतास दिला नाहीं,

मग शास्त्रीय संस्थांची तर गोष्टच नको! उद्योग धंद्यांची वैयक्तिक मालकी राहूं द्या, सहकारी मालकीही आम्ही निर्माण करूं शकलों नाहीं. जातीयतेची परंपरा व तज्जन्य हेवेदावे, राजकारणाचा शुष्क काथ्याकूट, परस्परांवरील जिव्हारी लागणारे वाङ्मयीन शरसंधान, हेंच काय ते अलीकडे चालू राहिलें. अर्थात्, या अनिष्ट प्रवृत्तींचा परिणाम अपरिहार्यच होता. मराठी मताला देशांत मूल्यच राहीलें नाहीं व सर्व दृष्टींनीं उपेक्षित ठरलेल्या या समाजाची दृष्टि अधिकच कोती व वृत्ति अधिकच हेकेखोर होऊन बसली—व्यवहाराची सांगड सुटून ऐतिहासिक स्वप्नरंजन, स्वप्नाळू ध्येयवाद अधिकच बळावला. नेतृत्वाची आमची सध्याची कल्पना इतकी अवास्तव आहे कीं नेत्यांचें व्यवहार सिद्धावस्थेंतूनच व्हावे, असेंच जणु आम्हांस वाटतें व तसें प्रत्ययास आलें नाहीं, नेत्यांत जरा दोष दिसला कीं अतिरेकी व हीन अभिरुचीची टीका नव्हे, टवाळीच सुरू होते. याचा परिणाम म्हणजे अखिल महाराष्ट्रास वंदनीय वाटेल, असें नेतृत्वच टिळकांच्या पश्चात महाराष्ट्रांत निर्माण होऊं शकलें नाहीं, व हेंच तर आमचें राजकीय दुखणें होय.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. देशसेवा, समाजसेवा करावयाची म्हणजे घरादाराची होळी केलीच पाहिजे, हा समज आपण टाकून दिला पाहिजे. पारतंत्र्यांतील दडपशाहींत देशभक्तांचा छळ झाला असेल, परंतु, आजच्या स्वराज्यांत हें अपेक्षित नाहीं. लोकनेत्यानें गैरसोय होईल इतपत साधें राहावें, ही अपेक्षाच गैर होय. "लोकांचें पुढारी म्हणवितां आणि वाहनाशिवाय हिंडणें फिरणें नाहीं, हें कसें काय?" हा प्रश्न महात्मा गांधींनी फार पूर्वी ना. गोखले यांना विचारला होता व त्यावर "विभूतिपूजक अशा या देशांत पायीं हिंडलों तर लोकांचें थवे जमतील, शिवाय वेळ मोडेल तो निराळाच" हें उत्तर ना. गोखले यांनी गांधीजींना दिलें होतें. स्वतःची व स्वतःवर अवलंबून असणाऱ्यांची स्थिती केविलवाणी करून घेतली, हेंच काहीं निःस्वार्थी देशसेवेचें लक्षण नव्हे. कारण, इतर अनेक क्षेत्रांप्रमाणें समाजकारण, राजकारण या क्षेत्रांतही चुरस ही असतेच व कोणत्याही इतर चुरशीप्रमाणें बुद्धिमत्ता, स्वभाव, कार्यक्षमत्ता आणि एकंदर व्यक्तिमत्व यांचा कस याही चुरशींत लागतोच. हा दमदारपणा कमी पडला अथवा पराभूत होण्याची शक्यता असल्यास लोक पलायनवादाचा आश्रय घेतात—जेथें चुरस नाही

अशा क्षेत्रांत शिरतात—व धकाधकीत भाग घेणाऱ्यांवर सत्तालोलुपतेचा आरोप ठेवतात.

खरे पाहिले, तर लोकसेवा हें ध्येय असल्यास, सत्ता संपादन हें हीन ठरण्याचें कारणच काय ? सत्तासंपादनानंतर स्वखुशीनें सत्ता त्याग करणें निराळे व सत्ता प्राप्तीची शक्यताच नसता सत्तेचा निषेध करीत सुटणें निराळे ! " करून करून भागले, देवपूजेस लागले " अशांनी नैष्ठिक ब्रह्मचर्याचा उपदेश करण्या इतकेंच तें हास्यास्पद ठरेल ! सत्ता संपादनाच्या चुरशीच्या क्षेत्रांत यश मिळविण्याची आकांक्षा धरण्यांत काहींच गैर नाहीं. सत्तेचा उपयोग लोक कल्याणास्तवच करावयाचा असतो, याचें मात्र स्मरण असावें.

शास्त्राव्यतिरिक्त अन्यविद्या व्यासंगाच्या बाबतींतही महाराष्ट्राचा उथळपणा जाणवण्यासारखा आहे. टिळक, गोखले, रानडे, तेलंग नि भांडारकरांचे युग सध्या इतिहास जमा झाले आहे. गणेशोत्सवांत चार अपरिपक्क, परंतु ठसकेबाज भाषणें दिली, थोडा चक्री व्याख्यानांत भाग घेतला, मेळयांत कांहीं गाणी म्हटली अथवा टफ टफ करीत काही वाद्यें वाजविली की मुलांच्या बाबतींत मराठी पालक भलतेंच संतुष्ट असतात. मग, विद्यालयीन परिक्षेंत विद्यार्थी 'पास क्लास' मध्येंच 'पास' झाले तरी हरकत नाहीं ! अर्थात, पुढें नोकरीस ठेवणाऱ्यांचें या जेमतेम यशानें समाधान होत नाहीं, ही गोष्ट वेगळी. सिनेमा–नाटके अथवा तमाशे न पाहणें, पत्ते न खेळणें, चहा न पिणें, पानसुपारी न खाणें, धूम्रपान न करणें, सहाध्यायी (विद्यार्थी अथवा) विद्यार्थिनींशी अतिरिक्त सलगी न वाढविणें, या गोष्टी विद्यार्थीदशेंत इष्ट असतील; परंतु हे कांहीं **महान** गुण नव्हेत. सफाईदार इंग्रजी व हिंदी बोलता येत नाहीं अथवा समजत नाहीं, हें मराठी भाषिकांचें सर्व साधारण वैगुण्य लक्षांत घेतल्यास तर मधून मधून चांगले इंग्रजी व हिंदी चित्रपट पाहणें, भावी आयुष्याच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांस उपयुक्त ही ठरू शकेल. परंतु, चांगल्या अथवा वाईटाच्या आमच्या काहीं ठरीव कल्पना आहेत व त्या तपासण्याची अथवा त्यांत फेर बदल करण्याची आम्हांस आवश्यकता वाटत नाहीं. वरीलपैकी एकही गोष्ट एखादा विद्यार्थी करताना दिसला की तो " बिघडला " असें मानण्याचा मराठी पालकांचा प्रघात आहे, मग तो अभ्यासांत व खेळांत कितीहीका

चांगला असेना ! सुशिक्षित व पुढारलेल्या महाराष्ट्रीय पालकांना मात्र वरील विवेचन लागू नाहीं, हे उघड होय.

स्त्री–स्वातंत्र्य अथवा शिक्षणाच्या बाबतींतही हाच प्रकार आहे. आमचें सहशिक्षण हें विद्यार्थी—विद्यार्थिनींनी एका वर्गांत व तेंही वेगवेगळे गट पाडून बसण्यापुरतेंच मर्यादित आहे. स्त्री शिक्षणाची सुरुवात गेल्या शतकांत होऊनही, स्त्री—पुरुष सहजीवनाच्या बाबतींतील आमचा कर्मठपणा परवापर्यंत पडदा पाळणाऱ्या उत्तर भारतीयांसही लाजविणारा आहे. सम्मिश्र समाजांत मोकळेपणानें हंसणे—बोलणें दूरच राहो, परप्रान्तीय अथवा परदेशीय अशा केवळ स्त्रियांच्या मेळाव्यांतही, इतकेंच काय प्रसंगीं स्वकीय नातलगांतही, महाराष्ट्रीय स्त्रियांची संकोची वृत्ति, जी इतरांच्या दृष्टीनें आढ्यताही ठरूं शकते, सहज जाणवते. **आढ्यता हें पावित्र्याचें लक्षण नव्हे व वागणुकींतील मोकळेपणा हें चारित्र्यहीनतेचें गमक नव्हे.** कर्मठ, सनातनी व संकोची वृत्तिच्या सहचारिणीमुळें वरिष्ठ अधिकाऱ्याची बरेंचदा कुचंबणा होत असल्यानें, अधिकारी नेमताना त्याच्या पत्नीचीही चौकशी करण्याचा पाश्चात्त्य देशांत प्रघात आहे. आपल्या इकडेही परराष्ट्र खात्यातील अधिकारी वर्गासंबंधी बोलतांना पं. नेहरू मागें असें म्हणाले होते कीं प्रभावशाली व्यक्तिमत्वाची पत्नी ही केव्हांही अधिकाऱ्याच्या व्यक्तिमत्वास पूरकच होय. वेषभूषेच्या बाबतींतच नव्हे, तर केशभूषेच्या बाबतींतही सर्वसाधारणपणें महाराष्ट्रीय स्त्रिया, परप्रांतीय स्त्रियांच्या तुलनेनें सनातनीच ठरतात. आमच्या वागणुकीनें "महाराष्ट्रीय थोडे तुसड्या वृत्तिचे वाटतात" असें परप्रान्तीयांनीं म्हटलें, तर त्यास्तव आम्हांस राग येण्याचें कारण नाहीं. हा तुसडेपणा व्यक्तिगत भवितव्याच्याही आड येऊं शकतो, इतकें सांगितलें कीं पुरे. नैतिक मूल्यांची तथाकथित कल्पनात्मक जोपासना करीत असतां, एक प्रकारचें खुरटलेलें जीवन तर आपण जगत नाहींना, व्यवहारांत आपल्या उपेक्षावृत्तीमुळें जीं उपयोगास पडूं शकतील अशीं माणसें तर आपण निष्कारण दुखवीत नाहीना, आपल्याविषयी गैरसमज पसरण्यांस आपल्या वागणुकीनें आपण स्वतःच तर हातभार लावीत नाहींना, हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. या बाबतींतील कांहीं चर्चा प्रस्तुत लेखसंग्रहांत आहे, सर्वंकश चर्चा अर्थातच नाहीं. कारण तशी योग्यता असल्याचा लेखकाचा मुळींच दावा नाहीं.

शास्त्र हा व्यवसाय असलेल्या माझ्या सारख्याच्या दृष्टीनें लेखन हेंच मुळीं धाडस; मराठी लेखन, हें तर दुप्पट धाडस ! कारण, माझें सर्व शालेय शिक्षण व इंटर पर्यंतचें विद्यालयीन शिक्षण, हें सर्व जोधपुर येथें हिंदींतून झालें व या पुढील शिक्षण पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांत व मुंबई येथील डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या संस्थेंत झाले असलें, तरी या उच्च शिक्षणाचें माध्यम इंग्रजी होतें. बरें वारसा म्हणाल, तर तोही हिंदींचाच आहे, हें खालील अल्प कुलवृत्तावरून दिसून येईल.

महाराष्ट्राचे पेशवे यांच्या शेवटच्या ऐतिहासिक पिढीत अमृतराव, बाजीराव व चिमाजीअप्पा, हे तीन बंधु झाले. यांच्या संबंधीं एका पोवाड्यांत एक शाहीर म्हणतो :

**थोरले तें तप करिती, जान्हवी काठी,** (अमृतराव)
**मधल्यांच्या भोवती, ती बायकांची दाटी !** (बाजीराव)
**धाकटे लाविती कुस्त्या, पाळुनिया जेठी,** (चिमाजी अप्पा)
**करोनि ऐसे ढंग, राज्या लाविली काठी ॥** (व्यायम ज्ञान कोष, पृष्ठ १०५)

याप्रमाणें, श्रीमंत अमृतराव पेशवे यांनीं श्री क्षेत्र काशींत, गणेशमंदीर शिवमंदिर, भागीरथी वरील घाट इत्यादींची स्थापना करून चित्रकूट (कर्वी, जिल्हा बांदा, उत्तर प्रदेश) येथें वास्तव्य केलें व विद्वान वेदमूर्ति ब्राह्मणांना आमंत्रणें दिली. त्यांच्याच आग्रहामुळें माझ्या पणजोबांचे वडील, वेदमूर्ति नारायणशास्त्री फडके, हे कुर्धा (रत्नागिरी) येथून, पेशव्यांकडून न्यावयास आलेल्या इंदूरच्या कोणा एका सरदारासह, काशींत आले. आपले दोन्ही पुत्र हरिपंत व कृष्णराव यांनाही ते बरोबर घेऊन आले होते व प्रतिवर्षी चित्रकूटास जाऊन पेशव्यांकडून तीन वर्षासनें ते मिळवीत. वडिलांच्या पश्चात्, हरिपंत व कृष्णराव या माझ्या पणजोबांनाही पेशवे वर्षासन आजन्म मिळत राहिलें.परंतु,उत्तर प्रदेशातील तेव्हांच्या एकंदर अशांत परिस्थितीमुळें व जबलपुर जवळील पथर्या येथील जहागिरदार आपटे यांच्या निमंत्रणामुळें, वे. कृष्णशास्त्री लवकरच पथरिया येथें स्थाइक झाले. वे. हरिपंतांना एकच कन्या होती व ती

झांसा येथील देवधरांकडे दिली. वे. कृष्णशास्त्री व त्यांची पत्नी, नरसिंग गढ राज्याचे दिवाण परांजपे यांची कन्या, या उभयतांना मात्र ५ पुत्र व १ कन्या अशी अपत्यें होती. पैकीं राजारामपंत व श्रीरामपंत या आपल्या दोन्ही पुत्रांना वे. कृष्णशास्त्री यांनीं काशी येथेंच वेदाभ्यासार्थ ठेवलें. पेशवे वर्षासन चालू राहावें, ह्याच यांत हेतु होता. श्रीरामपंत ( माझे आजोबा) यांची पत्नी (माझी आजी) पेशवाईतील नीळकंठशास्त्री थत्ते यांच्या घराण्यांतील. हें थत्ते घराणें मूळचें वाईचें, परंतु, दुसऱ्या बाजीराव पेशव्यांबरोबर, हे कानपुर—ब्रह्मावर्तास स्थाइक झाले. या माझ्या आजीचे वडील सुरुवातीस दुसऱ्या बाजीरावांच्या नोकरीतच होते. इंग्रजी शिक्षण झाले असल्यानें, पुढें मात्र इंग्रजी राज्यांत "स्कूल इन्स्पेक्टर" म्हणून त्यांनीं काम केले. दुसऱ्या बाजीरावांच्या कांहीं गमतीदार आठवणी व १८५७ सालच्या बंडातील कांहीं कठिण प्रसंग माझ्या आजीनें लहानपणी मला सांगितले आहेत. तिला ती माहिती तिच्या वडिलांकडून मिळाली होती. परंतु, तें सर्व सांगण्याचें हें स्थळ नव्हे.

वे. कृष्णशास्त्री यांच्या निधनानंतर माझे आजोबा ( श्रीरामपंत ) यांना २-३ वर्षेंच पेशवे वर्षासन मिळालें. पुढें पेशवाईच संपुष्टांत आली, इंग्रजी विद्येचा प्रसार झाला व श्रीरामपंतांनीं आपल्या मुलास, माझ्या वडिलांस, श्री. जगन्नाथपंत यांस, इंग्रजी शिक्षण देण्याचें ठरवून आपले पुतणे होळकर संस्थानचे "फॉरिन सेक्रेटरी" श्री. दादाभाई फडके यांचेकडे ठेविलें. नोकरी निमित्त माझे वडील पुढें जोधपुर येथें गेले व आजही तेथेंच स्थाइक आहेत. एकूण मराठीचा वारसा गेल्या पांच पिढ्यांपासून तरी मला नाहीं. आजोबाच्यावेळेपर्यंत घरांतही मराठीपेक्षां हिंदीचाच वापर अधिक असे, इतकें सांगितलें कीं पुरे.

मराठींत माझें शिक्षण झालें नसलें, अथवा मराठी वातावरणांत माझी वाढ झाली नसली, तरी मराठी वाङ्मयाबद्दल मात्र मला आवड आहे व मराठी लिहिणें थोडें बहुत जमलें असेल, तर तें मराठींतील नामांकित साहित्यिकांच्या साहित्य वाचनानेंच. त्यांतही प्राचीन मराठी साहित्य मी अपवादात्मक असेंच वाचले असल्यानें, अर्वाचीन मराठी साहित्यिक हेच मला गुरुस्थानी होत. या गुरुवर्यांना सादर प्रणाम करताना, या माझ्या साहित्यसेवेकडे ते थोड्या अधिक उदारतेनें व सहानुभूतिनें बघतील, ही अपेक्षा करणें गैर ठरेल काय ? तसेंच,

एकंदरींत मराठी वाचकही माझे हें लेखन गोड करून घेतील हा विश्वास व्यक्त करून व ज्या सुमुहूर्तावर हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे, त्याचे शिल्पकार—सत्तावनच्या स्वातंत्र्य समरांतील वीर–यांना आदरांजली अर्पण करून, हें निवेदन संपवितो.

" विश्राम "
लेव्हल क्रॉसिंग, चेंबूर,
मुंबई ३८.

डॉ. रा. ज. फडके

स्वातंत्र्यसमर शताब्दि दिन, १९५७.

---

*(Some comments on the article on "Communalism" in this book.)*

1. **Sir Chintaman Deshmukh :**

*March 10, 1955.*

......" I am desired by Shri Chintaman Deshmukh, Minister for Finance, Government of India, to acknowlege receipt of your article on Communalism and to say that he agrees with your diagnosis and prognosis of the problem."

**P. D. Kasbekar,**
*Private Secretary, Finance Minister, New Delhi.*

●

2. **Shri H. V. Pataskar, Law Minister, India :**

*March 8, 1955.*

......" Your article is thought provoking. I agree with you that communalism is the bane of our society and the sooner it is eradicated, the better for our Nation."

●

3. **Dr. G.S. Mahajani, Vice-Chancellor. University of Delhi, Delhi :**

*March 8, 1955.*

......" I am glad to find that a person like you, whose normal interests lie in the field of Science and Technology, should as well think of social problems. This mental awareness is a healthy sign of a sensitive nature and I hope you will retain it."

# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना ( श्री. स. का. पाटील ) | ३–४ |
| | निवेदन | ५–११ |
| १. | शास्त्राच स्वरूप, साध्य व साधनें | १ |
| २. | धर्म हा तारक कीं मारक ? | ६ |
| ३. | शास्त्राची महति | ९ |
| ४. | वेदान्त धर्म | १७ |
| | ( i ) धर्म म्हणजे काय ? | १९ |
| | ( ii ) वेदान्त धर्माचें वैशिष्टय | २२ |
| | (iii) वेदान्त नि व्यवहार | २५ |
| ५. | शास्त्राचा संदेश | ३० |
| ६. | गांधीजींची अभिनव स्वराज्य साधना | ३८ |
| ७. | शास्त्रीय प्रगतीची आवश्यक उपांगें | ४५ |
| | ( i ) शिक्षणाची पुनर्घटना | ४६ |
| | ( ii ) शास्त्रीय ऐपतीची वाताहात | ५० |
| | (iii) प्राध्यापक नि विद्यालयांतील त्यांची व्याख्यानें | ५४ |
| | (iv) संशोधन व संशोधक | ५६ |
| ८. | जातीयतेवर तोडगा | ५८ |
| | ( i ) जातीयतेचा स्वैराचार | ६२ |
| | ( i ) धर्मभेदावर उपाय काय ? | ६५ |
| | ( ii ) अल्पसंख्यांकावरील जबाबदारी | ६७ |
| | (iii) जातीयतेवरील चार तोडगे | ६९ |
| | (iv) जातीयता नष्ट करण्याचे तीन व्यक्तिगत मार्ग | ७३ |
| | ( v ) क्षमाशील वीरांचें कार्य | ७६ |
| ९. | नवी हिंदी टंक लिपी | ७८ |
| १०. | अधःपतनाचें मूळ | ८३ |

ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# शास्त्राचें स्वरूप, साध्य व साधनें

“ हिंदची शास्त्रीय प्रगति झाली पाहिजे, आपल्या राष्ट्रास शास्त्रज्ञांची गरज आहे ” हीं घोषवाक्यें आज सर्वत्र ऐकूं येत आहेत. शास्त्राविषयीं आदर व शास्त्रज्ञांविषयीं कुतूहल वाढत आहे; परंतु, शास्त्राचें स्वरूप व साध्य, साधनें व मर्यादा यां विषयीं आपल्या समाजांत एकंदरींत अज्ञान आहे. आपल्या राष्ट्राची शास्त्रीय प्रगति व्हावयाची असेल, तर शास्त्राच्या गुणावगुणांचें योग्य तें मूल्यमापन होणें जरूर आहे. शास्त्रीय प्रगतीचाच हा एक आवश्यक भाग आहे व याच दृष्टीनें प्रस्तुत लिहिण्याचे योजिले आहे.

शास्त्राचें साध्य म्हटल्यास एकीकडे रेडिओ, विमानें, वीज इत्यादि आधिभौतिक सुखसाधनें व दुसरीकडे ॲटम बॉंब व तत्सम इतर विध्वंसक साधनें आपल्या डोळ्यापुढें उभीं राहतात व शास्त्र हें ‘शाप की वरदान’ हा प्रश्न उपस्थित होतो. ‘जें अनुभवसिद्ध असेल, तेंच सत्य मानावयाचें’ या शास्त्रीय बाण्याचा विपर्यास होऊन, ‘शास्त्र हेंच’ सत्यसंशोधनाचें एकमेव अमोघ साधन होय, हा गैरसमज बळावत जातो. सृष्टीचे व्यवहार बघून शास्त्रीय नियम ठरविण्यांत आले ही खरी गोष्ट; परंतु, सृष्टीचे व्यवहारच मुळीं शास्त्रीय नियमानुसार चालू आहेत, असाहि लोकापवाद आहे.

## शास्त्राचा लवचिकपणा आणि प्रगतिक्षमता

“ वर फेकलेली प्रत्येक वस्तु, गुरुत्वाकर्षणामुळें खालीं पडते ” या न्यूटनच्या सिद्धान्तानें जें प्रत्यहीं घडतें त्याचें वर्णन व त्यांस संयुक्तिक कारण पुरविण्याचा फक्त प्रयत्न केला आहे. यांत भविष्याची हमी नाहीं अथवा जें आजपर्यंत घडलें तें पुढें घडावेंच, असा हट्ट नाहीं. शास्त्रीय नियम ( Scientific Law ) हे कायद्यांतील नियमाप्रमाणें (Civil Law) सूचनात्मक नसतात. “पायीं चालणाऱ्यानें रस्त्याच्या डाव्या बाजूनेंच चालावें ” असा कायद्याचा अट्टाहास आहे. परंतु, शास्त्रीय नियम हे केवळ वर्णनात्मक असतात. सृष्टीवर कसल्याहि प्रकारचा निर्बंध ते घालीत नाहींत. उलट वर

सांगितल्याप्रमाणें, जें घडतें त्यास शक्यतों सयुक्तिक कारण देणें, हा त्यांचा प्रयत्न असतो. शास्त्रीय नियम हे त्रिकालाबाधित सत्य आहेत, हा शास्त्रज्ञांचा दावा नाहीं; किंबहुना कुठल्याहि नियमांत 'फेरफार' करण्यास शास्त्र सदैव सिद्ध आहे. उदाहरणार्थ, न्यूटनचा वरील सिद्धान्त अलीकडे प्रो. आयन्स्टाईन यांनीं खोडून काढला आहे. "गतिमान् जड पदार्थ शक्यतों सोप्या, म्हणजे अल्पविरोधी मार्गांचा अवलंब करतात" असा त्यांचा थोडक्यांत सिद्धान्त आहे. वर अंतराळांत प्रवास करण्यापेक्षां सरळ, म्हणजे कमींत कमी अंतरांत, भूमीवर पडणें हा अल्पविरोधी मार्ग असल्यानें, वर फेकलेली वस्तु खालीं पडते, असें त्यांचें म्हणणें आहे व प्रो. आयन्स्टाईन यांचा वरील सिद्धान्त आतां शास्त्रीय जगतांत सर्वमान्यहि झाला आहे. शास्त्राच्या या लवचिकपणामुळें, या बदल करण्याच्या तयारीमुळेंच, अर्वाचीन काळांत शास्त्राची प्रगति अव्याहत चालू आहे व चालू राहील.

## शास्त्राचें ध्येय

शास्त्रीय ज्ञान हें एकंदर ज्ञानाचा एक भाग आहे, ज्ञानसर्वस्व नाहीं, हें समजून घेणें जरूर आहे. जें इंद्रियगम्य असेल त्याचाच विचार करावयाचा, हा भौतिक शास्त्राचा पहिला दंडक आहे. जें इंद्रियगम्य नाहीं, जें केवळ बुद्धिगम्य आहे, अशा ज्ञानाच्या बाबतींत भौतिक शास्त्र सर्वस्वी उदासीन आहे. बाह्य पदार्थांचें आपणांस जें ज्ञान होतें, तें रूप, रस, गंध, शब्द, स्पर्शा-पलीकडे कांहीं नाहीं. म्हणूनच, जगांतील पदार्थांचें निर्भेळ सत्यस्वरूप काय आहे याचा बोध केवळ इंद्रियद्वारा शक्य नाहीं, हें शास्त्रज्ञ जाणून आहेत. उद्यां जर आपणांस एखादें नवीन इंद्रिय प्राप्त झालें, तर सृष्टींतील पदार्थांचे गुणधर्म आपणांस हल्लींच्याहून निराळे भासतील, हें उघड होय. परंतु, उद्यां काय होईल यापेक्षां आज काय आहे, याचीच चिंता शास्त्रज्ञांस असल्यानें, **आज अस्तित्वांत असलेल्या इन्द्रियांच्या आधारें विश्वांतील पदार्थांचें अधिकाधिक सत्यस्वरूप ओळखणें, सृष्टीच्या व्यापारांतील शक्तिकेन्द्रें हुडकून काढणें व तीं शक्यतों मानवी हुकमतींत, ताब्यांत आणणें,** हेंच अति स्पष्ट ध्येय शास्त्रानें उराशीं बाळगलें आहे.

## शास्त्राच्या आवाक्याबाहेरचे प्रश्न

इन्द्रियगम्य गुणांतहि ज्या गुणांची गणितशास्त्रदृष्ट्या मोजदाद होणें शक्य

आहे, त्याच गुणांचा, शक्यतों, शास्त्रांत विचार होतो, व तोहि कांहींसा एकांगीपणें. म्हणूनच, शास्त्रानें संपूर्ण सत्यबोध होणें शक्य नाहीं, असें प्रख्यात आंग्लशास्त्रज्ञ सर जेम्स जीन्स व प्रो. एडिंग्टन यांचें मत आहे. उदाहरणार्थ, काळया व पांढऱ्या रंगाचे, भिन्न भिन्न वजनांचे व आकारांचे, कांहीं चेंडू आपल्याकडे आहेत, अशी कल्पना करा. यांचा अभ्यास शास्त्रज्ञ कसा करील असें आपणांस वाटतें? प्रथम तो पांढऱ्या रंगाचे सर्व चेंडू एका बाजूस व काळया रंगाचे दुसऱ्या बाजूस, असे दोन भाग करील. यावेळीं तो आकार व वजन, या दोन्ही गुणांकडे दुर्लक्ष करील. नंतर आकार हें प्रमाण धरून, रंग व वजन या गुणांकडे दुर्लक्ष करील, इत्यादि. शेवटीं दिलेल्या चेंडूंपैकीं इतके समान रंगाचे, इतके समान आकारांचे व इतके समान वजनांचे आहेत, असा आपला निकाल जाहीर करील. या निकालांत पूर्ण सत्य नाहीं, हें उघड आहे. उदाहरणार्थ, चेंडूंची घडण सुबक आहे कीं नाहीं, ते मोहक दिसतात कीं नाहीं, इत्यादि अनेक प्रश्नांचा या शास्त्रीय निकालांत विचारच नाहीं! कारण, सुबकपणा, मोहकपणा, उपयुक्तता, रसिकता इत्यादि गुणांची गणितशास्त्रदृष्ट्या मोजदाद शक्य नसल्यानें, यांचा विचार शास्त्र करीत नाहीं. **म्हणूनच, शास्त्रीय ज्ञान लाभप्रद कीं हानिप्रद, शास्त्रीय शोध शाप कीं वरदान, इत्यादि प्रश्न 'शास्त्रीय' दृष्ट्या अप्रस्तुत होत.** हे प्रश्न शास्त्राच्या आवाक्याबाहेरचे आहेत. शास्त्र आपणांस 'शक्तिकेन्द्रें' दाखवील, 'शक्ति' पुरवील; तिच्या युक्तायुक्ततेबद्दल तें उदासीन आहे. **शास्त्राचा योग्य तो उपयोग होणें, त्यामुळें मानवी हित, लोककल्याण साधणें, हें ज्ञानाच्या सर्वांगीण वाढीवर, सुधारणेवर आणि संस्कृतीवर अवलंबून आहे.**

## साक्षरता व शिक्षण

शास्त्रीय संशोधनास अथवा प्रगतीस शास्त्राची अद्यावत् माहिती असणें आवश्यक आहे. प्रत्येक शास्त्रज्ञ हा तत्पूर्वींच्या शास्त्रज्ञांचे अनुभव व ज्ञान जमेस धरून पुढील पाहणी करीत असतो. या ज्ञानाची वाताहात होऊं नये, म्हणून अगदीं बारीकसारीक संशोधनांचींहि टिपणें शास्त्रीय नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था गेल्या पाउणशें वर्षांपासून आहे व जगांतील अद्यावत् शास्त्रज्ञानाची संपूर्ण माहिती देणारीं अनेक ग्रंथालयें पाश्चात्य देशांत विखुर-

लेलीं आहेत. आपल्याहि देशांत अशा ग्रंथालयांची यापुढें वाढ होईल; परंतु, हें ज्ञान मिळविण्यास 'साक्षर' असणें जरूर आहे व या दृष्टीनें **साक्षरतेची वाढ हा शास्त्रीय प्रगतीचा पाया होय.**

या साक्षरतेस शिक्षणाची जोड मिळणें आवश्यक आहे. **साक्षरता व शिक्षण हे शब्द समानार्थी वापरण्याची चूक अनेकदां होत असते. परस्परपूरक, परंतु वस्तुतः भिन्न, अशा या दोन गोष्टी होत. साक्षरतेनें अनेक गोष्टींची माहिती होईल, पांडित्य अंगीं बाणेल; परंतु, संशोधन करण्याची अथवा कुठल्याहि नवीन क्षेत्रांत नवनिर्मिति करण्याची ऐपत, योग्यता, येईलच असें नाहीं.** हें कार्य सुशिक्षणाचें आहे. यास्तव, प्रथमपासूनच संशोधकवृत्तीची जोपासना होणें आवश्यक असतें. साक्षर मनुष्य हा सुशिक्षित असतोच असें नाहीं व सुशिक्षित मनुष्य हा साक्षर असलाच पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं. शिवाजी हा साक्षर नव्हता, असें कांहींचें मत आहे. त्याला स्वतःची सही पण धडपणें करतां येत नव्हती, असें म्हणतात. तरी पण तो सुशिक्षित होता. त्याला या देशाच्या इतिहासाचें सम्यक् ज्ञान होतें. त्यानें स्वराज्य स्थापन केलें, स्वराष्ट्र निर्माण केलें, नवविचारांना चालना दिली! या उलट, गेल्या पाउणशें वर्षांत आपल्या साक्षर वर्गानें केवळ पुस्तकी ज्ञान मिळविलें, पांडित्य आत्मसात् केलें. **आपण शास्त्र शिकलों, पण शास्त्रज्ञ झालों नाहीं.**

## शिक्षणक्रम आमूलाग्र बदलण्याची आवश्यकता

आपल्या देशाची शास्त्रीय प्रगति व्हावयाची असेल, तर आपल्या शिक्षणक्रमांत आमूलाग्र बदल होणें अपरिहार्य आहे. आपल्या शालेय शिक्षणक्रमांत अनेक विषय आहेत; परंतु शास्त्रास अजूनहि महत्त्वाचें स्थान नाहीं. रसायनशास्त्र, वस्तुशास्त्र इत्यादींचीं मूलभूत तत्त्वें, आठदहा वर्षांच्या मुलांस समजणें कठीण नाहीं, परंतु ज्या वयांत बुद्धि जास्तींत जास्त चिकित्सक असते, तें सर्व वय इतिहास, भूगोल नि संस्कृतच्या पाठांतरांत अथवा इंग्रजी भाषा शिकण्यांत खर्च होतें. या दृष्टीनें आधुनिक शास्त्राचा आवश्यक भाग तरी, शक्यतों लवकर, स्वभाषेंत भाषांतरित होणें अगत्याचें आहे.

**शास्त्रीय शिक्षणांत प्रयोगाचें महत्त्व फार आहे. प्रयोग केल्या-**

**विना स्वतःबद्दल आत्मविश्वास व शास्त्राबद्दल आवड उत्पन्न होणें शक्य नाहीं.** भूमिका व सिद्धान्त शिकविण्याऐवजीं, शास्त्रीय शिक्षणाची सुरुवातच मुळीं लहान मोठ्या अनेक प्रयोगांनीं असावी. घन व द्रव पदार्थांचें शुद्धीकरण, अनेक चमत्कारिक रासायनिक क्रिया, कांच सामानाची प्रयोगाकरितां जुळवाजुळव, मोठाल्या कारखान्यांचे लहानगे नमुने, इत्यादींची माहिती जितकी लवकर मिळेल तितकें चांगलें. आपल्याकडील मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांस शास्त्राबद्दल थोडीबहुत माहिती असते; परंतु, ती सर्व असते औपपत्तिक व सिद्धान्तरूप. क्रियात्मक भाग कांहींच नाहीं; अद्यावत् माहिती तर अत्यंत अल्प ! रेडिओ, टेलिफोन, बोलपट, स्टीम एन्जिन्स, विमानें, मोटार गाड्या इत्यादि नित्य परिचयाच्या शोधांबद्दल त्यांना कांहींच ज्ञान नसतें. लहान लहान नमुने दाखवून, क्लिष्टता निर्माण न करतां, वरील शोधांची माहिती देणें अगदीं शक्य आहे. डेहराडून येथील डून स्कूलमध्यें हा प्रयोग यशस्वी रीतीनें करण्यांत आला आहे. परंतु, सर्व साधारणपणें तसा प्रयत्न होत नाहीं. त्यामुळें शास्त्रीय शिक्षणक्रम विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें निरुत्साही आहे; किचकट व कंटाळवाण्या भागास परीक्षेच्या दृष्टीनें महत्त्व प्राप्त झालें आहे. ही गोष्ट पाठान्तरास प्रोत्साहन देणारी आहे. यामुळें संशोधक वृत्तीची वाढ, चौकसपणा निर्माण होणें शक्य नाहीं. शास्त्राच्या कुठल्या भागांत सध्या विशेष संशोधन चालू आहे, आपल्या देशाच्या दृष्टीनें कोणतें संशोधन आज आवश्यक आहे, इत्यादि माहिती आमच्या पदवीपरीक्षेपर्यंतहि विद्यार्थ्यांस मिळत नाहीं. मग संशोधनाबद्दल त्यांच्यांत हुरूप कसा राहणार ?

**यापुढें शास्त्रीय क्षेत्रांत पाश्चात्यांचें केवळ अनुकरण करून चालणार नाही. त्यांनीं शोध लावावे, आम्ही पाठान्तर करावें, ही पद्धति बदललीच पाहिजे. आपलें राष्ट्र ऊर्जितावस्थेस यावयाचें असेल, तर शास्त्रनिर्मितीची परंपरा या देशांत प्रस्थापित झाली पाहिजे व अशा प्रयत्नास हा उदयोन्मुख स्वातंत्र्याचा कालच अत्यंत उपयुक्त होय.**

(कर्नाटक कॉलेज, धारवाड, शास्त्रविभाग स्नेहसंमेलन, १९४८, प्रसंगीचें भाषण.)

लेख : "सह्याद्रि" पुणें, डिसेंबर १९४९.

# धर्म हा तारक कीं मारक ?

" धर्म ही अफूची गोळी आहे " ही घोषणा साम्यवादी लोकांकडून वारंवार होत असल्यानें " धर्म हा तारक कीं मारक ? " हा प्रश्न उत्पन्न होतो. याबाबतींत एक गोष्ट मात्र दृष्टी आड होऊं नये. ज्या अर्थानें धर्म हा शब्द जगांत इतरत्र वापरण्यांत येतो, त्या अर्थानें हा शब्द आमच्या शास्त्रकारांनीं वापरलेला नाहीं. जो बायबल प्रमाण मानतो तो ख्रिश्चन धर्म, जो कुराण प्रमाण मानतो तो इस्लाम धर्म, या अर्थानें " धर्म " हा शब्द पाश्चात्य देशांत वापरण्यांत येतो. धर्म या शब्दाचा हा अर्थ आमच्या शास्त्रकारांना अभिप्रेत नाहीं. या देशांतील बहुसंख्य जनतेचा धर्म म्हणजे हिंदुधर्म व या धर्मास धर्म म्हणावें तरी कसें, हा पाश्चात्यांना प्रश्न पडतो. कोणताही एक प्रमाणग्रंथ या धर्मास नाहीं, कोणी एक निश्चित प्रेषित नाहीं. सर्वांनीं या धर्माचा अंगिकार करावा असा आग्रही प्रयत्न नाहीं, अट्टाहास नाहीं. कोणत्याही प्रकारची धार्मिक असहिष्णुता हा धर्म सुचवीत नाहीं. या धर्माचें स्वरूप कालमानाप्रमाणें बदलत आलें आहे, व हेंच याचें प्रमुख लक्षण होय. म्हणूनच, हिंदुधर्म म्हणजे समाजधारणेस्तव, समाज कल्याणास्तव सतत बदलणारी एक विचारधारा व योग नि वेदान्त हीं तिच्यांतील अजरामर कमलपुष्पें. " ज्यामुळें धारणा होते, तो धर्म " ही धर्म शब्दाची आमची व्याख्या होय; व शारीरिक अथवा मानसिक उपाधिपासून मनुष्यांस मुक्त करणें, त्यास शक्यतों पूर्णावस्थेस नेणें, हें आमच्या धर्माचें साध्य होय.

परमेश्वराचें अस्तित्व मान्य कराच असाही आमच्या धर्माचा हट्ट नाहीं. गौतमबुद्धानें परमेश्वराचें अस्तित्वच नाकारलें, तरीहि बौद्धधर्म या देशांतील धर्माची एक शाखा होय, असें आपण मोठ्या अभिमानानें म्हणतों. धर्मानें माणसाची दृष्टि अंध बनते, विचार पूर्वग्रहदूषित होतात, असें म्हणाल, तर ऋग्वेदांतील ' नासदीय सूक्त ' पहा.

" को अद्धा वेदक इह प्र वोचत् ।
कुत आजाता कुत इयं विसृष्टिः ॥ "

दृश्य जगाच्या विस्ताराबद्दल हा ऋषि म्हणतो, "हा पसारा कशापासून व कोठून आला, हें (यापेक्षां) प्र म्हणजे विस्तारानें येथें कोण सांगणार? कोण निश्चयात्मक जाणतो आहे?" यापेक्षां आणखी डोळस दृष्टी ती काय असूं शकणार? आणि विश्वबंधुत्व ह्मणाल तर आमच्या संताग्रणींनीं सदोदित याच ध्येयाचा पुरस्कार केला आहे. ह्या अखिल मानवी प्रेमास्तवच आमच्या 'अशोकाचे' भिक्षु घरादाराची, ऐहिक सुखाची, ऐश्वर्याची होळी करून, त्याग प्रतीक भगवीं वस्त्रें परिधान करून, वणवण करीत जगभर हिंडले! ह्या विश्वबंधुत्वाचा प्रचार करीतच आमचे गौतमबुद्ध निर्वाण पदीं गेले! हें 'विश्वचि माझें घर' हा जयघोष करीतच आमचे तुकारामबुवा केवलरूप झाले! वास्तविक, हें विश्वबंधुत्व दोष ठरेपर्यंत आम्ही पूजिलें आहे; त्यामुळेंच 'कोणीही यावें, अन् पथारी पसरावी,' अशी विचित्र परिस्थिती आम्ही आमच्या देशांत निर्माण केली!

आपल्या धर्माचें हें व्यापक नि परिस्थितीनुरूप बदलण्याचें स्वरूप, व विशेषतः वर दिलेली व्याख्या बघूनच, न्यायमूर्ति रानडे यांनीं ठरविलें कीं या देशांतील लोकांना "पुरातन धर्माचें अनुकरण करा, ऋषी व्हा!" असा आदेश देण्यास कांहींच हरकत नाहीं. त्यामुळें हे अंध, भोळसट, हट्टी अथवा नैराश्यवादी होणार नाहींत. फक्त "ज्यामुळें धारण होतें, तो धर्म" ही व्याख्या यांच्या कानीकपाळीं ओरडत राहिलें म्हणजे झालें. आपल्या समाजाच्या प्रस्थापित भावनेला यत्किंचितही धक्का न देतां, त्यांस योग्य मार्गावर आणण्याचा न्यायमूर्तींचा हा प्रयत्न श्रेयस्कर नाहीं असें कोण म्हणेल? **हिंदुसमाजाचा घात सामाजिक रूढींनीं केला आहे, धर्मानें नव्हे. जातीयता, अस्पृश्यता, परदेशगमनावर बहिष्कार या सामाजिक रूढी होत, धार्मिक बाबी नव्हेत.** रानड्यांच्या सारख्या 'अध्यात्मिक' हिंदी पुढाऱ्यांनीं हिंदी समाजास अशा प्रकारें फसविण्याचा प्रयत्न केला, ही धूळफेंक केली, असा कांहीं साम्यवादी लोकांचा यावर आक्षेप आहे. परंतु, या लोकांनी हें लक्षांत घेणें जरूर आहे कीं धर्म शब्दाची ही व्याख्या रानड्यांनीं पुनश्च लोकांपुढें मांडली असली, तरी ती व्याख्या कांहीं त्यांनीं स्वतःच रचलेली नाहीं. ही व्याख्या महाभारतकालीन अथवा त्याहूनही पुरातन आहे, आणि इतक्यावरही "धर्म ही अफूची गोळी आहे" असें म्हणण्याचा साम्यवाद्यांचा हट्ट

असेलच, तर या देशांतील लोकांनाही असें म्हणतां येईल, कीं धर्म शब्दाचा जो अर्थ मार्क्सला माहीत होता, त्या अर्थानें तें ठीक आहे. परंतु, धर्म शब्दाचा जो अर्थ आम्ही घेतों आणि जो, या देशाचे निवासी म्हणून, तुम्हीही घेतला पाहिजे, त्या अर्थानें **धर्म ही अफूची गोळी नाहीं, अमृतवल्ली आहे; धर्म हा मारक नसून तारक आहे.**

( महिला विद्यालय, बेळगांव, गणेशोत्सव, १९४९, प्रसंगीचें भाषण. )
लेख : बेळगांव समाचार, दिवाळी अंक, १९४९

# शास्त्राची महती

शास्त्र आणि कला हे ज्ञानाचे सनातन भेद आहेत. समाजाच्या प्रगतीस दोघांची आवश्यकता आहे. प्रथम काय, हें त्यावेळच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. सृष्टीच्या व्यापारांतील शक्तिकेंद्रें हुडकून काढून तीं मानवी ताब्यांत आणणें, हें शास्त्राचें ध्येय आहे. मानवी मनास आनंद देणें, त्यास उच्च पातळीवर नेणें, औदार्याची वाढ करणें, हा कलेचा उद्देश आहे. नुसतें शास्त्र आंधळें, तर नुसती कला मानवास पतित करणारी आहे. या दोहोंचा सुवर्णमध्य साधण्यांतच राष्ट्राचा खरा उत्कर्ष आहे.

## कला व्यसन आणि शास्त्र

शास्त्र ही जीवनाची गरज आहे; कला तें सुखमय करणारी आहे. शास्त्रामुळें जीवन शक्य होतें, कलेमुळें तें सुसह्य होतें. कला आणि व्यसन यांतील भेद लक्षांत घेणें जरूर आहे. कलेचा उद्देश मानवी मनास विरंगुळा देण्याचा, उत्साह देण्याचा, कार्योन्मुख करण्याचा आहे; कार्यविन्मुख करण्याचा नव्हे. जी श्रम परिहार करून नव उत्साह देते, तीच खरी कला! जी पतित करते ती कला नव्हे, तें व्यसन होय! कला-प्रेम जेव्हां कर्तव्यकर्माच्या आड येतें, तेव्हां तें ' व्यसन ' झालें, असें समजण्यास हरकत नाहीं. कलेच्या " व्यसनी करणास " या देशाची भूमी विशेष सुपीक आहे!

## आज प्रथम काय? शास्त्र कीं कला

कलावंतांची या देशांत कधींच वाण पडली नाहीं—पडणार नाहीं. कमतरता असेल तर ती फक्त शास्त्रज्ञांची! आपला महाराष्ट्रच घ्या. अखिल भारतीय कीर्तीचे शिल्पकार, दिग्दर्शक नि गवई आमच्यांत आहेत, परंतु शास्त्रज्ञ? हीच गोष्ट कमीअधिक प्रमाणांत अखिल भारताची आहे. " प्रथम काय? शास्त्र कीं कला?" या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट आहे. जगण्याची ज्यांना खात्री आहे, त्यांनींच कलेच्या भानगडींत पडावें. जीवनाचे मूलभूत प्रश्नही ज्या राष्ट्रास अजून पूर्णपणें सोडवितां आले नाहींत, जें राष्ट्र दारिद्र्य नि बेकारीच्या भोवऱ्यांत सांपडलें आहे, त्यास कलासक्त " कलाव्यसनी " होण्याचा कांहींच अधिकार

नाहीं. निदान स्वातंत्र्यरक्षणास्तव तरी आज आपल्या देशानें शास्त्राचाच ध्यास घेणें जरूर आहे. आज आमचे सर्व प्रयत्न, सर्व कला शास्त्राभिमुख असल्या पाहिजेत. "समाजाकरितां शास्त्र व शास्त्राकरितां कला" हेंच आज या देशाचें ब्रीद झालें पाहिजे. अर्थात, ठोकळेबाज असा कोणताच नियम शास्त्रास मान्य नसल्यानें, शास्त्राकरितां समजण्याचे तर मुळींच कारण नाहीं! ज्या भाग्यदिनीं हें राष्ट्र शास्त्रीय आघाडीवरही चमकूं लागेल, त्या वैभवशाली काळांत "कलेकरितां शास्त्र" हेंही आमचें घोषवाक्य असूं शकेल.

## शास्त्र नि इतिहास

शास्त्रज्ञान हें अगदीं अलीकडचें आहे, असा सर्वत्र समज आहे. शास्त्राची वाढ गेल्या दोन शतकांत विशेष झाली असली, तरी शास्त्र हें इतकें आधुनिक नाहीं. दगडी हत्यारें, विणलेले कपडे, शिजविलेलें अन्न यांची उपयुक्तता ज्या काळीं मानवास समजली, निसर्गावरच सर्वस्वी अवलंबून न राहतां स्वतंत्रपणें जगण्याची ज्यावेळीं त्याला बुद्धि झाली, त्या दूरच्या काळांतच शास्त्राचा जन्म झाला. आज आश्चर्य वाटेल, पण एके काळीं शास्त्रदृष्ट्याहि हा देश जगाच्या आघाडीवर होता. गणित शास्त्राचा आधार जी दशांश पद्धति ती मूळची भारतांतील आहे. अरबी लोक ती या देशापासून शिकले व पुढें ही विद्या त्यांनीं फिरंग्यांना शिकविली. ४५ या आंकड्यास ३९ या आंकड्यानें गुणणें आज किती सहज गोष्ट, परंतु दशांश पद्धतीच्या अभावी, ग्रीक संस्कृतीच्या शिष्यांना XXXXV या आंकड्यानें XXXIX या आंकड्यास गुणणें केवढ्या कटकटीचें झालें असतें, याची कल्पनाच केलेली बरी! निरनिराळ्या रासायनिक क्रिया, तांत्रिक नि वैद्यकीय ज्ञानांतहि हा देश अति पुरातन काळीं प्रगतिमान होता. परंतु, पुढें अहंकारानें या देशास ग्रासलें. आलबेरुनि या मुस्लिम इतिहासकारानें अशी नोंद करून ठेवली आहे कीं "हिंदूंच्या इतके अहंकारी लोक जगांत दुसरे कोणी नसतील." या अहंकारानेंच, पुढें समुद्रपर्यटन निषिद्ध ठरविलें! या अहंकारामुळेंच, गीतेंत वर्णिल्यानुसार, पुढें बुद्धिनाश व सर्वनाश झाला! **कार्लमार्क्सनें जगाच्या इतिहासाचें परीक्षण अर्थशास्त्रदृष्ट्या केलें आहे. इतिहासाचें परीक्षण (भौतिक) शास्त्रदृष्ट्याहि करतां येईल. इतिहासांतील**

**सर्व घटनांची, जयपराजयांची सांगता शास्त्रज्ञान व शास्त्राचें अज्ञान यांच्या दृष्टीनें लावतां येणें शक्य आहे !**

आपल्या देशाचाच गेल्या आठशें वर्षांचा इतिहास बघा. विजयापेक्षां त्यांत पराभवच भरपूर आहेत. आज शिकंदरनें आक्रमण केलें, उद्यां गझनीच्या महंमदानें बेजार केलें, परवा मोंगलांनीं, ब्रिटिश, फ्रेंच नि पोर्तुगीजांनीं लोळविलें, या वर्णनांनीं सारा इतिहास गजबजला आहे. वर्षानुवर्षें त्यांचें पाठांतर होत आहे. **परंतु, बाबर विजयी कां झाला, ब्रिटिशांपुढें मराठ्यांनीं हात कां टेकले, याचा गंभीर विचार कधीं झाला आहे काय? कर्ता-करविता परमेश्वर आहे, त्याची लीला अगाध आहे व जें घडतें तें सर्व पूर्व संचित नि पूर्वकर्मानुसार अशी आमची प्रामाणिक श्रद्धा आहे ! असले घट्ट नि मठ्ठ अनुयायी, परमेश्वरास तरी इतरत्र कोठें मिळणार ?**

बाबरला संयुक्त रजपूत आघाडीशीं लढा द्यावा लागला. रजपूतांचें शौर्य नि धैर्य सुप्रसिद्ध आहे. "करूं अथवा मरूं" या वृत्तीनें ते लढत, अर्थात, आपसांत हेवे दावे, दुही इत्यादि फार असल्यानें यांतले "मरूं" हेंच बहुधा खरें ठरे ! त्यांच्या स्त्रिया जोहार करीत. मग या शूर रजपूतांचा पराभव कां झाला ? कारण, पुरातन हिंदु संस्कृतीच्या या कडव्या अभिमान्यांनीं युद्धांत रामायण नि महाभारताचें अनुकरण केलें. गदा नि गोफण, तलवार नि धनुष्यबाण यांचाच काय तो उपयोग केला ! आणि बाबरनें ? त्यानें यांच्यावर तोफा डागल्या. आतां "कलात्मक" धनुष्य बाणाचा "शास्त्रीय" तोफेपुढें निभाव लागणार कसा ? हेंच रजपूत परदेशगमन निषिद्ध न ठरविते, परदेशीयांस हीन न लेखतां त्यांचेपासून ज्ञान ग्रहण करते, तर ही पाळी आली नसती. **परंतु, पराभवावर उपाययोजना न करितां संकुचित होत जाणें, हाच जणु आमचा धर्म.** स्त्रियांना गोषांत घालणें, त्यांचें रक्षण करण्याची ऐपत नाहीं म्हणून त्यांचेवर "सती" होण्याची जबरदस्ती करणें, प्रणयावर "कर्फ्यू" पुकारणें व अब्रू नि वित्ताची हानि झाली, तर फारतर सभा घेऊन निषेध करणें, हीच आमची आक्रमकांविरुद्ध परंपरागत उपाययोजना ! अगदीं अलीकडच्या काळांत, स्वतंत्र मराठी राज्याचा टोपीवाल्या मुंबईकरांशीं जवळजवळ शंभर वर्षें संबंध आला. परंतु लावण्या, अभंग नि

ओघ्यांत मशगूल असलेल्या महाराष्ट्रास ब्रिटिशांपासून शास्त्रज्ञान मिळविण्याची बुद्धि झाली कां ? "या इंग्रजांचा मोठा विस्मय वाटतो" असें पेशवे म्हणत. अमेरिका व रशिया यांच्या शास्त्रीय प्रगतिचा विस्मय वाटण्याखेरीज आज तरी आम्हांस दुसरें काय वाटत आहे ? विस्मय करून दाखवावा, अशी ईर्षा थोडीच आहे ! **त्यांनीं शोध लावावे, आम्ही पाठांतर करावें हीच अलीकडे आमची परंपरा आहे !**

## काय होत आहे, काय व्हावयास पाहिजे

आज तरी काय होत आहे ? हा देश स्वतंत्र होऊन आतां आठ वर्षांहून अधिक काळ लोटला. आम्ही दारुबंदी केली, द्विभार्या प्रतिबंधक कायदा केला, हिंसा–अहिंसेची न संपणारी चर्चा तर चालूच आहे. परंतु, शास्त्रीय प्रगतीच्या बाबतींत काय होत आहे ? नुसत्या नॅशनल लॅबोरेटरीज बांधून हें काम संपत नाहीं. संशोधनाच्या बाबतींत पाश्चात्य देशांत सरकारी यंत्रणेपेक्षां विद्यापीठांवर अथवा धनिकांकडून पुरस्कृत अशा संशोधन मंडळावरच अधिक भिस्त असते. सरकारी संशोधन संस्थांतून बांधलेले कामाचे तास, तसेंच नोकरीचें स्थैर्य व त्यामुळें बळावत असलेली आराम करण्याची प्रवृत्ति, ही बहुधा शास्त्रीय संशोधनास बाधक ठरते. तिकडे नेहरू "आराम हराम है" ही घोषणा करतात, तर इकडे धर्मातीत राष्ट्र म्हणून सर्व धर्म नि जातीच्या सुट्या व बुट्यांचा उपभोग घ्यावयाचा, कसल्याहि प्रकारच्या उत्सव समारंभांत अहमहिकेनें भाग घ्यावयाचा व फावल्या वेळीं जातीयता अथवा उपजातीयतेच्या आहारी जावयाचें, हा आमचा अखंड कार्यक्रम आहे.

## शास्त्रज्ञानाकडे अधिक लक्ष द्या

टिळक नि गांधी यांच्या थोर प्रयत्नानें या देशास स्वातंत्र्य मिळालें. यांच्या पूर्वीचे पुढारीहि स्वातंत्र्य मिळविण्याच्या बाबतींत इतकेच आतुर होते. मग या नेत्यांचें रहस्य कशांत आहे ? अर्थात, आम जनतेंत या नेत्यांनीं स्वातंत्र्योत्सुकता, स्वातंत्र्यप्रेम निर्माण केलें यांतच. सर्वांनींच कांहीं स्वातंत्र्यसंग्रामांत भाग घेतला नाहीं; परंतु देशांत स्वातंत्र्याचें वातावरण निर्माण झालें. जेव्हा आम जनता देशभक्तांना डोक्यावर घेऊन नाचूं लागली, तेव्हांच सर्वत्र देशभक्तांचें पेव फुटलें. संपत्तीच्या खालोखाल लोकमान्यता हीच मानवास प्रिय

असते. शास्त्रास आज या देशांत स्थान नाहीं, म्हणून तर आमचे होतकरू तरुण, शास्त्रज्ञ होण्यापेक्षां कलेक्टर नि कमिशनर होण्याची आकांक्षा धरतात. या देशांत नामवंत शास्त्रज्ञ निर्माण व्हावयाचे असतील, तर जनतेंत शास्त्रज्ञ नि शास्त्राविषयीं आदर निर्माण होणें जरूर आहे. किमान पक्षी शास्त्रज्ञांची आज होत असलेली उपेक्षा थांबलीच पाहिजे.

आमचे वार्तापट आम्हांस नॅशनल फिजिकल व केमिकल, या भव्य प्रयोगशालांचें दर्शन घडवितात. यामुळें राष्ट्रीय स्वाभिमान जागृत होत असेल. याहि क्षेत्रांत आपला देश आघाडीवर आहे, हा भास निर्माण होत असेल. परंतु, त्याच बरोबर शास्त्र संशोधन ही फार खर्चिक बाब आहे, सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरची आहे, हेंहि मनावर ठसत नाहीं काय ? लॉंगफेलो व बायरन, शेले व कीट्स, या आंग्ल कवींविषयीं कितीहि आदर असला, तरी आमची अस्मृता रामदास नि तुकाराम, तुलसी नि कबीर हेंच जागृत करू शकतील. तद्वत्च, गॅलिलिओ नि पाश्चर, फ्लेमिंग नि रॉबिन्सन, हे कितीहि थोर शास्त्रज्ञ असले, तरी आम्हांस जवळचे असे रामन, लिमये, भाभा अथवा भटनागर, हेच आमच्यांत शास्त्र संशोधनाविषयीं आत्मविश्वास निर्माण करतील, हें उघड होय.

मागें प्रभात फिल्म कंपनीनें मराठी कवींचा परिचय घडविला होता. पुण्यांत आजहि अनेक चित्रपट कंपन्या आहेत. परंतु, प्रतिकूल परिस्थितींतहि गेलीं दोन अडीच तपें रसायन-साधना करणाऱ्या, अनेक गरीब नि होतकरू विद्यार्थ्यांना शास्त्रांतील उच्च पदवी मिळवून देऊन पोटापाण्यास लावणाऱ्या, श्री. दत्तोपंत लिमयांचा परिचय घडविण्याचे एकाहि निर्मात्याच्या मनांत आलें काय ? नखरेल नट्या नि गुळगुळीत नट लोकांना पुढें आणणें, इतकेंच चित्रपटांचें कार्य आहे कीं काय ?

## यापुढें शास्त्रशिक्षण सक्तीचें असावें

आपल्या देशांतील शास्त्र उपेक्षेचें कारण स्पष्ट आहे. **आमच्या बहुसंख्य जनतेस शास्त्राचा परिचयच नाहीं. माहितीच नाहीं, मग महती कुठली पटायची** ! ही आज जनतेची स्थिती. मग जे निवडून येतात त्यांनीं तरी शास्त्राकडे लक्ष काय म्हणून द्यावें ? जशी जनता तसें सरकार, हेंच खरें.

म्हणूनच, यापुढें, आपल्या देशांतील शास्त्रशिक्षण दोन प्रकारचें असलें पाहिजे– सक्तीचें नि ऐच्छिक. पहिल्या प्रकारचें शिक्षण देशांतल्या प्रत्येक साक्षर माणसास व दुसऱ्या प्रकारचें शिक्षण, जे शास्त्रज्ञ होऊ इच्छितात अशांनांच मिळालें पाहिजे. ऐच्छिक शास्त्रशिक्षणाविषयीं प्रस्तुत कांहीं लिहित नाहीं. ज्यांना शास्त्रज्ञ व्हावयाचें आहे, त्यांनीं शास्त्राचा सर्वांगीण अभ्यास केला पाहीजे, हें उघड होय. सक्तीच्या शिक्षणाविषयीं मात्र थोडें लिहिणें जरूर आहे. सक्तीची अशी कुठलीच गोष्ट खरा आदरभाव निर्माण करूं शकत नाहीं. मग सक्तीचें शास्त्र-शिक्षण तरी आपला हेतु साध्य करील काय ? यावर उपाय स्पष्ट आहे. शास्त्र–सक्तीचें झालें पाहिजे, परंतु तें तसें वाटता कामा नये. ज्ञानाच्या सर्व भागांत, शिक्षणाच्या सर्व प्रकारांत शास्त्राचा अंतर्भाव केल्यानेंच हें शक्य होईल.

इतिहासाचेंच उदाहरण घ्या. हा विषय शिकविण्याची सध्याची पद्धति अत्यंत एकांगी आहे. राजे–रजवाडे, त्यांची वंशावळ व साम्राज्यें, त्यांचे तह नि कलह, उदय नि अस्त, त्यांच्या राण्यांची सौंदर्यस्पर्धा नि प्रणय, वैषम्य नि कारस्थानें, यांतच आमचा इतिहास संपुष्टांत येतो. सामान्य जनता, तिची परिस्थिति नि प्रगती, यांची त्यांत जवळ जवळ कांहींच माहिती नसते. आतां याच इतिहासांत शास्त्रवाढीचा आतापर्यंतचा प्रयत्न, त्यापायीं झालेलें बलिदान, त्यांतील सामान्य जनतेचा वाटा, मोठमोठ्या शास्त्रज्ञांची चरित्रें इत्यादींचा अंतर्भाव केल्यास, तो नव्या पिढीस स्फूर्तिदायक ठरणार नाहीं काय ? असाच बदल भूगोल नि भाषा शिक्षणाच्या बाबतींतहि करतां येईल. खनिज द्रव्यें व तीं शुद्ध करण्याच्या रासायनिक क्रिया, वनस्पती आणि पशु, नक्षत्रें नि तारांगण यांची माहिती भूगोलांतच अंतर्भूत करणें शक्य नाहीं काय ? यामुळें भूगर्भ, रसायन, खगोलशास्त्र इत्यादींची आद्यतत्वें अगदीं नकळत मुलांना समजतील. भाषा शिक्षणाच्या बाबतींत तर नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा कविता इत्यादींप्रमाणें स्वतंत्र असा एक “ शास्त्र–विभाग ” असावा व या विभागांत शास्त्राची युक्तायुक्तता, स्वरूप नि साध्य, महती नि संदेश, मर्यादा नि प्रगति, यांची भरपूर माहिती असावी. अशा वाङ्मयाची मराठी भाषेस वाण पडणार नाहीं व योग्य ते प्रोत्साहन दिल्यास सर्व वयाच्या मुलांना सोयिस्कर असे शास्त्रीयवाङ्मय आमचे साहित्यिक सहज पुरवतील.

## किमान पक्षी इतकें तरी करा

सर्व शिक्षण शास्त्रमय करण्याची वरील सूचना जादा क्रांतिकारक वाटत असेल, तर किमान पक्षी निदान एस. एस. सी. परीक्षेपर्यंत तरी भौतिक शास्त्र हा विषय भाषा, गणित, इतिहास-भूगोल इत्यादींप्रमाणें सक्तीचा करा. रशिया-प्रमाणें अधिक नव्हे, तरी या विषयां इतका तरी, शास्त्रास शिक्षण क्रमांत व समाजांत मान मिळू द्या. " व्हाइस चॅन्सेलर " च्या अनुपस्थितींत " डीन ऑफ फॅकल्टी ऑफ आर्ट्स " यानेंच काय ते विद्यापीठाचें काम बघावयाच, ही आजची परिस्थिती बदलून, " आर्ट्स " व " सायन्स " या दोन्ही विभागांच्या " डीन्स " ना आळीपाळीनें हें पद भूषविण्याचा मान मिळावा, इतपत तरी सुधारणा करा. **शास्त्रज्ञ हा आपल्या विषयांत कितीही तरबेज असला, तरी त्याखेरीज त्याला कांहींच गम्य नसतें, साधें व्यवहारज्ञानसुद्धां नसतें हा धूर्तांनीं पसरविलेला मतलबी लोकापवाद तरी नष्ट करा.** कॉलेजचा प्रिन्सिपाल शक्यतोवर कला विभागांतीलच नेमावयाचा, ही परिस्थिति बदलून शास्त्र विभागाला निदान समान संधी तरी द्या. यांत अधिक मागणें नाहीं, शास्त्रास समान वागणूक द्या, इतकेंच म्हणणें आहे व तेंही आजच्या शास्त्रीय युगांत! निदान, शास्त्र व शास्त्रज्ञांची आम्ही उपेक्षा करीतच नाहीं, हा गैरसमज तरी उराशी बाळगू नका! **देशाच्या संरक्षणाइतकीच, देशाची शास्त्रीय प्रगति ही एक आवश्यक बाब आहे, याचें सदा स्मरण असावें. अन्यतः, शास्त्रीय पीछेहाटीचे सर्व दुष्परिणाम यापुढेंहि आपल्या देशास भोगावे लागतील, हें निश्चित.**

## शास्त्रनिष्ठा हेंच आजचें महान कर्तव्य होय

अशा प्रकारें, शास्त्रीय दृष्ट्या हा देश आघाडीवर यावयाचा असेल, तर आमच्या शिक्षणक्रमांत नि मनोरचनेत आमूलाग्र बदल होणें जरुर आहे. गेल्या सहस्र वर्षांपासून या देशाची शास्त्रीय परंपरा मोडली आहे. या देशांतील पहिलें जाचक आक्रमण सात-आठशें वर्षांपूर्वी झालें असलें, तरी त्या आधीं, किमान चार-पांच शतकें, हा देश सर्व दृष्टीनें पतित झाला होता. परंतु, लगेच कांहीं परतंत्र झाला नाहीं! कारण भाग्यवशात्, कोणी आक्रमणच केलें

नाहीं ! **शास्त्रनिष्ठ अशा एखाद्या प्रबळ राष्ट्राकडून प्रत्यक्ष परचक्र येई तो आजहि हा देश स्वतंत्र राहील ! परंतु, असलें 'मिळ-मिळीत' स्वातंत्र्य या देशास हवें आहे काय ?** इतिहासापासून धडा घेण्याची हीच वेळ आहे. आमचें पराभव झाले तेव्हां गाणारे, बजावणारे, नाचणारे, चित्रकार, भविष्यकार, धर्मकार, वक्ते नि द्रष्टे कवि नि लेखक आमच्यांत नव्हते कीं काय ? परंतु, यांपैकीं कोणीच पारतंत्र्यापासून आमचें रक्षण करूं शकले नाहींत. इतिहासाचा हा धडा–संदेश स्पष्ट आहे.

**शास्त्राची उपेक्षा हेंच आमच्या ऐहिक अधःपतनाचें मूळ कारण आहे. शास्त्रपारंगतता हाच उत्कर्षाचा राजमार्ग होय. शास्त्रनिष्ठा हेंच या पिढीचें महान् कर्तव्य आहे.**

( विलिंग्डन कॉलेज, सांगली, शास्त्रविभाग स्नेहसंमेलन, १९५०, प्रसंगीचें भाषण )

लेख : "चिकित्सक" बेळगांव, दिवाळी अंक, १९५०. "रोहिणी" पुणें, एप्रिल १९५६.

---

# वेदान्त धर्म

‘ धर्म ही अफूची गोळी आहे ’ ‘ राजकारण हें धर्मापासून अलिप्तच राहिलें पाहिजे ’ इत्यादि घोषणा समाजवादी लोकांकडून वारंवार करण्यांत येतात. धर्माच्या नांवावर मनुष्यमात्रानें इतक्या हाणामाऱ्या, इतकी लठ्ठालठ्ठी, इतका रक्तपात केला आहे, कीं कोणत्याहि सहृदय माणसास असेंच वाटेल कीं नको हा धर्म ! यहुदी लोकांनीं प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताचा, पुढें ख्रिस्ताच्या अनुयायांनीं ( रोमन कॅथॉलिक्सनीं ) प्रोटेस्टंट लोकांचा, त्यांना अधर्मी, पाखंडी म्हणून असा कांहीं छळ केला कीं सारें युरोपखंड बेजार झालें. सत्यान्वेषणाकरितां कोणी खटपट करतांना दिसला कीं कर त्याचा छळ नि दे त्याला होळींत टाकून ! सुधारलेल्या म्हणवणाऱ्या युरोपची जर ही गत, तर आशिया खंडांत धर्माच्या नांवावर अत्याचार झाल्यास नवल नाहीं. ‘ दार–उल –हरब ’ ‘ दार-उल–इस्लाम ’ नि ‘ अल्ला हो अकबर ’ च्या आरोळ्या ठोकत, महम्मदाच्या धर्मवेड्या अनुयायांनीं एका हातीं खड्ग नि एका हातीं कुराण घेऊन स्पेनपासून ब्रह्मदेशापर्यंत सर्व प्रदेश पादाक्रांत करून तुडविला, ‘ काफर ’ म्हणून अनंत लोकांचा छळ केला, गांवेंची गांवें ओसाड पाडलीं, जाळून टाकलीं ! अहिंसक हिंदूंनीं तरी कांहीं कमी केलें काय ? “ हा अस्पृश्य, हा महार, हा चांभार ! ह्याला शिवूं नका, ह्याची सावली पडली तरीहि तुम्ही भ्रष्टाल; इतकेंच काय, पाण्याविना हा तडफडून मरूं लागला तरी ह्याला आपल्या विहिरींचें पाणी पिऊं देऊं नका !” असें म्हणून तथाकथित स्पृश्य हिंदूंनीं पूर्वास्पृश्यांस लाथाडलें ! एखाद्या हुकूमशहानें केला नसेल, इतका छळ धर्माच्या नांवावर आजपर्यंत झाला आहे, नि ह्या सर्व गोष्टींचा काळानें घेतलेला सूड म्हणूनच कीं काय, रशियांत प्रचंड क्रांति होऊन तथाकथित धर्माचा अधर्मी खून पाडण्यांत आला.

## दोषी कोण ?

ह्या बाबतींत दोषी कोण ? धर्मप्रणेते, त्यांचे अनुयायी, कीं दोघेहि ? आमच्या मतें ( जाणून अथवा अजाणून ) हा दोष दोघांचा आहे. धर्मप्रणे-

त्यांनीं अत्यंत उदात्त तत्त्वज्ञान सर्वसाधारण माणसांस समजावें, ह्या दृष्टीनें सोप्या रीतीनें मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यामुळें त्यांच्या आदेशांत बरीच संदिग्धता निर्माण झाली. त्यांच्या अनुयायांनीं त्यांच्या पश्चात्, कांहीं स्वार्थी हेतूस्तव अथवा हटवादीपणामुळें, त्यांच्या मतांचा विपर्यास करून स्वतःच्या सोयीस्तव भलभलते अर्थ काढले! शब्दच्छल करून रणें माजविलीं! 'सत्य बोलावें, कोणास दुखवूं नेय' इत्यादि गोष्टी सर्व धर्मांत असल्या तरी चांगलें वागलें म्हणजे काय होईल, ह्या प्रश्नाचें उत्तर मात्र प्रत्येक धर्मांत निरनिराळें आहे. कांहीं स्वर्गाचें आमिष दाखवितात, तर कांहीं नरकाची भीति; कांहींच्या मतें अशामुळें पुनर्जन्म चांगला मिळतो, तर कांहींच्या मतें अशा वागणुकीनें मनुष्य मोक्षाप्रत जातो! मध्ययुगीन काळांत माणसांच्या भाविकवृत्तीमुळें ही परस्परविरोधीं उत्तरें हीं कांहीं प्रमाणांत, मानवाची जिज्ञासावृत्ति तृप्त करीत असलीं, तरी आजच्या शास्त्रीय युगांत तीं सर्व असमाधानकारकच वाटणार! "आपल्या धर्माचा तुम्हीं जगभर प्रसार केला, तर स्वर्गांत सुंदर मोहक अप्सरा मदिरा हातीं घेऊन तुमचें स्वागत करतील," ही लोभस आशा, मागें एखाद्या धर्मप्रणेत्यानें लाविली असली, तरी आज ती हास्यास्पदच ठरणार! स्वतःची जिज्ञासा कोणीकडून तरी तृप्त करण्याची आवश्यकता भासल्यामुळें, आमच्या पूर्वजांनीं वरुण, इंद्र अथवा राहु-केतू यांसारखे देव-दानव कल्पिले, तरी केवळ पूर्वजांनीं तसें केलें म्हणून आजहि आम्हीं त्याचप्रमाणें, पूजा-अर्चा अथवा होम-हवन करीत बसावें काय? आपल्या पूर्वजांचा अभिमान अवश्य असावा, परंतु तो अंध आणि हटवादी असूं नये. श्रीरामानें, फार पुरातन कालीं, भौतिक दृष्ट्याहि भारतीयांचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास्तव अश्वमेध यज्ञ केला, म्हणून त्याचींच पारायणें करण्यापेक्षां आज आपल्या राष्ट्रास उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करणें, हीच खरी रामभक्ति नाहीं काय? भूतकालीन ऐतिहासिक स्वप्नसृष्टींत वावरण्यापेक्षां वर्तमानकालीन सत्यसृष्टींत वावरणें, हेंच योग्य, हेंच श्रेयस्कर! "आज जें कांहीं शास्त्रीय शोध लागले आहेत, अथवा उद्यां जे लागतील, ते सर्व वेदांत आहेत" हें म्हणण्यांत काय अर्थ आहे? "ॲटमबॉम्ब म्हणजे नारायणास्त्र" असें सी. राजगोपालाचारी यांनीं म्हटल्याचें मागें वृत्त आलें होतें, यास काय म्हणावें? आपण भारतीय फार पुरातन कालींहि सुधारलेले होतों, ह्याचा अर्थ

फक्त इतकाच कीं त्यावेळेस इतरत्र वसत असणाऱ्या जनसमूहांपेक्षां आमची संस्कृति जास्त पुढारलेली होती. महाभारतांतील संजयाची तुलना मारकोनी अथवा आयन्स्टाइनशीं अथवा ‘ पुष्पक ’ विमानाची तुलना आजच्या ‘बॉम्बर’ अथवा ‘ फायटर ’शीं करून, आम्हीं आमचें व आमच्या पूर्वजांचें हंसें काय म्हणून करून घ्यावें ? गेल्या दीडशें वर्षांत भौतिक ज्ञानाची जी प्रगति झाली, ती त्या पूर्वीच्या दीड हजार वर्षांतहि झाली नव्हती, हें उघड सत्य नाकारण्यांत काय हंशील आहे ?

## धर्म म्हणजे काय ?

इतर अनंत गोष्टींप्रमाणें धर्म शद्बाची शास्त्रीय व्याख्या ही सध्यांच्या कालानुरूप असली पाहिजे. धर्म आणि शास्त्र यांच्यांत अंतर्विरोध आहे, हा समज करून घेणें योग्य नव्हे. वस्तुतः धर्म आणि शास्त्र यांची मूळ प्रेरणा एकच आहे. सत्य संशोधन हें दोघांचेंही ध्येय आहे. गेल्या अर्ध शतकांतील अणुसंशोधनानें जडवादास चांगलाच धक्का बसल्यानें, प्रस्तुत काळ हा धर्माभ्यासास अधिकच योग्य होय. अर्थात्, सांप्रत धर्मांचा अभ्यास करावयाचा तो पूर्वीपेक्षां अधिक विस्तृततेनें, अधिक चिकित्सक बुद्धीनें व अधिक व्यवहारवादीपणानें केला पाहिजे. शास्त्रीय चिकित्सेस न घाबरतां जो तिचें स्वागतच करील, आव्हानपूर्वक अस्तित्व टिकवील, अशाच धर्मांचें यापुढें स्वागत होईल. शारीरिक अथवा मानसिक उपाधींपासून आत्म्यास मुक्त करून, मनुष्यांस पूर्णावस्थेस नेणें, हें सर्व धर्मांचे अखेरचें साध्य आहे. मनुष्याचें जीवित-रहस्य उलगडविण्यास्तव निरनिराळया धर्मांची स्थापना झाली; परंतु, त्यांत भारतीय धर्मांनीं केलेले प्रयत्न अतुलनीय होत. एकच औषध सर्वांस सर्व वेळीं सारखेंच उपयोगी पडत नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तिगत प्रकृतिमान लक्षांत घेऊन ज्याप्रमाणें सुज्ञ वैद्य योग्य औषध सुचवितो, तद्वतच आपलें सत्यस्वरूप ओळखून सज्ञान होणें, हेंच सर्वांचें ध्येय असतां, भारतीय धर्मांनीं त्या ध्येयपूर्तीस्तव विविध मार्ग दाखविले. श्रद्धावंतांस भक्तियोग, बुद्धिवाद्यांस ज्ञानयोग, धैर्यनिष्ठांस कर्मयोग व महत्त्वाकांक्षी लोकांस त्यांनीं राजयोगाचा मार्ग दाखविला. ध्येय एकच, साध्य एकच, पण ‘ साधनानाम् अनेकता ’. म्हणूनच, धर्म म्हणजे मतमतांचें भांडण, धर्म म्हणजे अंधश्रद्धा, भाविकपणा, भोळसटपणा अथवा हटवादीपणा हा पूर्वीचा धर्माभ्यासाचा अर्थ आतां टाकून दिला पाहिजे. तथाकथित धार्मिक लोकांच्या

अशा आकुंचित व मर्यादित वृत्तीनेंच साम्यवादी लोकांच्या दृष्टीनें धर्म ही अफूची गोळी ठरली. सदोदित वाढत जाणें, हींच जिवंतपणाची खूण, संकोच म्हणजे मृत्यु. धर्मास पुनश्च अमृतवल्ली ठरविणें, हें धार्मिक लोकांच्याच सुज्ञतेवर अवलंबून आहे.

महर्षि भीष्मानें युधिष्ठिरास उपदेशिल्याप्रमाणें, धर्म शब्दाची व्याख्या म्हणजे " ज्यामुळें धारणा होते, तो धर्म."

धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजा।
यःस्याद्धारण संयुक्तः स धर्म अिति निश्चयः॥

धर्म हा शब्दच मुळीं धृ—धारण करणें या धातुपासून निघालेला असल्यानें, समाजाचें धारण करणें, हेंच धर्माचें मुख्य लक्षण होय. या व्याख्येनुसार सृष्टींतील वस्तुमात्राच्या अस्तित्वास, मग ती वस्तु सजीव असो अथवा निर्जीव असो, धर्माची आवश्यकता आहे. कारण, धर्माशिवाय जगांत धारणाच असंभवनीय आहे. धर्म हा समाजास तारण्याकरितां आहे, मारण्याकरितां नव्हे. आणि म्हणूनच, ज्या गोष्टी समाजास तारक होतील, त्या धर्म्य नि इतर सर्व अधर्म्य. आपत्कालीं विश्वामित्रानें श्वानभक्षणही धर्म्य मानले, त्याचेंही कारण हेंच. याच न्यायानुसार ज्यामुळें भारतीय समाज उर्जितावस्थेस येईल, वैभवसंपन्न, ऐश्वर्यसंपन्न होईल, तो आमचा धर्म व म्हणूनच ग्राह्य व इतर सर्व त्याज्य.

धर्माच्या या व्याख्येमुळें कित्येक कोडीं कशीं लवकर सुटतील, हें बघण्यासारखें आहे. "चरखा—खादी"चा आर्थिक कार्यक्रमच घ्या. ह्या देशांतील बहुसंख्य जनता ग्रामवासीच असल्यामुळें हस्तव्यवसायास उत्तेजन देणारा हा कार्यक्रम, योग्य त्या प्रमाणांत, कोणासही मान्य होण्यासारखा आहे. परंतु, यंत्र ही कांहीं त्याज्य वस्तु नव्हे. आधुनिक वैज्ञानिक शोध चांगले कीं वाईट, पुण्यकारक कीं पापकारक, लाभप्रद कीं हानिप्रद, हें ज्याप्रमाणें मनुष्य करीत असलेल्या त्यांच्या सदुपयोगावर अथवा दुरुपयोगावर अवलंबून असते, तद्वतच, वस्तुतः निर्जीव असलेल्या यंत्रावरील सर्व आक्षेप, हे यंत्राच्या दुरुपयोगामुळेंच उद्भवतात. उदाहरणार्थ, बेकारी यंत्रामुळें वाढत नसून विषम

६४५८

वांटणीमुळें वाढते नि विषम वांटणीचा दोष यंत्राचा नसून समाजरचनेचा आहे. युद्धयमान राष्ट्रांत मानवसंहाराकडे होत असणाऱ्या यंत्रशास्त्राचाच उपयोग नंतर समाजधारणेस होतो. तेंव्हा भीतिप्रद वार्ता प्रसृत करणारा रेडिओच नंतर नव्या जगाची नवी वार्ता देतो—संगीताचे कर्णमधुर नाद प्रसवून जनमनास गुंगवितो, प्रणयी युग्मांस रिझवितो. संहारक स्फोटक द्रव्यें टाकून गांवेंच्या गांवें ओसाड पाडणारी, भस्मसात करणारी, युद्ध कालांतील अघोरी वायुयानेंच, नंतर लांब पल्ल्याचे दुर्घट प्रवास सुखकर करतात. अर्थात्, यंत्र-युगाचें स्वागत करणें, हें शास्त्राप्रमाणें शंभर टक्के धार्मिक कृत्य ठरतें.

दुसरें उदाहरण म्हणून हिंसा–अहिंसा हा वाद घेतां येईल. "अहिंसा परमोधर्मः" हें ध्येय म्हणून या देशास कितीही प्रिय असले, तरी शास्त्रकार निरपवाद अहिंसा व्यवहार्य मानीत नाहींत.

> अबुद्धिपूर्वकं 'हिंसा', याऽनिवार्या भवेदपि ।
> बुद्धिपूर्वंच सद्हेतोः अहिंसेवतु ते उभे ॥

बुद्धिपूर्वक, जाणूनबुजून न केलेली हिंसा आणि शुद्ध बुद्धिनें सत्कार्यार्थ केलेली हिंसा, ही अहिंसाच होय, हें शास्त्रकारांचें सांगणें आहे. उदाहरणार्थ, शत्रुवध करणें हिंसा नसून दंडन होय, कारण स्मृतिकारांनीं स्पष्टच म्हटलें आहे,

> हिंसा या सापराधानां, दंड एव हि सा स्मृता ।
> दंडो निरपराधानां, हिंसा घोरेति निश्चयः ॥

अहिंसेचा अर्थ इतकाच, कीं निष्कारण कोणाची हिंसा करूं नये. आत्यंतिक अहिंसेस या देशांतील सूज्ञांनीं कधींच मान्यता दिल्याचे दिसत नाहीं. ज्या देशांतील देवांच्याच नव्हे, तर देवींच्या हातांतहि एक एक नव्हे, दहा दहा शस्त्रें आहेत, त्या देशानें आत्यंतिक अहिंसाच योग्य मानली, हा निष्कर्ष काढतां येईल काय? सिंहनाद करणारा गीतेचा सुदर्शनधारी श्रीकृष्ण, शस्त्रभृतांचा चक्रवर्त्ती चापपाणि श्रीराम अथवा असुरमर्दिनी महावीरा काली ही आत्मघातकी अहिंसेचा आदेश देते काय?

स्वतःच्या शारीरिक अथवा मानसिक दौर्बल्यामुळें दुष्टासहि शासन न करणें, अहिंसा नव्हे, तो भेकडपणा होय. ती आत्मोन्नति नव्हे, तो आत्मघात होय. दुष्टांच्या दुष्टपणापेक्षां, सुष्टांचें अतिसौजन्यच अनेकदां अन्यायास

कारणीभूत होतें. " **अहिंसक लढ्यानें अन्यायाचा प्रतिकार करतां येत नसेल, तर हिंसेनेंही लढावें; परंतु, अन्यायाशीं सहकार्य करूं नये** " " **स्वातंत्र्यरक्षणार्थ पोलंडनें केलेली हिंसा, ही अहिंसा होय** " **ही महात्मा गांधींची वाक्यें हेंच दर्शवितात.** कारण, क्षात्र नि राजधर्मांत, शांतता रक्षणार्थ नि परचक्र निवारणार्थ, कांहीं प्रमाणांत हिंसेला स्थान हें असणारच. हिंसेमागेंही प्रसंगानुरुप चांगला उद्देश, " बहुजनसुखाय, बहुजनहिताय " हें ध्येय असूं शकतें. " केवळ हिंसेसाठीं म्हणून, हिंसा " ही नेहमींच इष्टोत्पत्तीस पडत नाहीं. **अर्थात, ध्येय म्हणून अहिंसा हेंच ध्येय इष्ट. मानव उत्क्रांत नसल्यामुळेंच आज हिंसेचा आश्रय घ्यावा लागतो व हा आश्रय घ्यावा लागूं नये, हा प्रयत्न करण्यांतच मानवता आहे.** बुद्ध नि गांधी यांनीं अहिंसा हें ध्येय म्हणूनच जगापुढें ठेवलें. सामान्य मानवाच्या ते हजारों शतकें पुढें होतें, व त्यांची शिकवणच अंतीं मानवाचा उद्धार करील, हें निश्चित.

## वेदान्तधर्म हाच आजचा भारतीय धर्म

ज्यांत मनुष्याच्या चिकित्सक बुद्धीला, जिज्ञासु वृत्तीला पूर्ण वाव मिळूं शकेल, अशा धर्माची आज आवश्यकता आहे. त्या दृष्टीनें वेदांत–धर्म हाच एक विवेचक बुद्धीला पटण्यासारखा धर्म आहे. हें जग म्हणजे वस्तुतः कांहींच नसून, येथें जें काय दिसतें, वाटतें अथवा भासतें, तें सर्व सापेक्षतेनेंच असतें, हा वेदान्ताचा मुख्य सिद्धान्त. म्हणजेच, 'ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या.' आयन्स्टाइनसारख्या बड्या पदार्थविज्ञानशास्त्रज्ञासहि हें तत्त्व मान्य आहे. परंतु, असें असलें तरी वेदान्त निराशावादी मात्र नाहीं. हें दृश्य जग क्षणिक असलें, चिरस्थायी नसलें, तरी नित्याच्या घडामोडींतहि बदलाबदल होण्यास आवश्यक असणारें तात्कालिक स्थैर्य हें असतेंच. मनुष्य अथवा अन्य प्राणी मर्त्य असले, तरी त्यांनाहि आयुष्य हें आहेच. ह्याचकरितां कर्मकांडाच्या रूपानें मायान्तर्गत, म्हणजेच इंद्रियजन्य जगाचा व ज्ञानकांडाच्या रूपानें इंद्रियातीत जगाचा विचार वेदान्ती करतात. म्हणूनच, पारलौकिक सुखाचें आमिष दाखवून ऐहिक सुखाचा त्याग करा, असें वेदान्ताचें म्हणणें नाहीं. ऐहिक व पारमार्थिक हा भेद, ही विसंगति, स्वर्ग व नरक या कविकल्पना, वेदान्तास मान्य नाहींत. परमार्थ नित्यसिद्ध व सर्वव्यापी आहे; अविद्येच्या

आवरणामुळें आम्हाला त्याची जाणीव नाहीं इतकेंच. जें कांहीं आहे, तें येथेंच आहे व म्हणूनच ह्या स्वप्नसृष्टींतहि स्वतः जास्तींत जास्त पराक्रमी व्हा व इतरांसहि तसें होण्यास मदत करा, हा वेदान्ताचा आदेश आहे.

भेद हा अनेकरूप असतो, संघटण हें एकरूप असतें. लिंगवर्णादि भेद आत्म्याला नाहीं नि म्हणूनच सर्वत्र साम्यावस्था पहावयाची, हें वेदान्ताचें सार आहे. श्रीमंत नि निर्धन, स्पृश्य नि अस्पृश्य, उच्च नि नीच, पंडित नि मूढ, ब्राह्मण नि चांडाळ इत्यादि भेदभाव नष्ट करून भौतिक जगांत विश्वबंधुत्वाचा, विश्वशांतीचा नि साम्यवादाचा प्रचार करणें, हेंच वेदान्ताचें ध्येय आहे. स्त्रियांना कःपदार्थ लेखणें अथवा वर्णभेदाचा आश्रय धरून गरीब दुबळयांना भरडणें, हा अधार्मिकपणाचा कळस होय.

स्त्रियांना समान हक्क मिळालेच पाहिजेत; स्त्रीशिक्षणाची वाढहि झाली पाहिजे. परंतु याचा अर्थ जें जें कांहीं पुरुष करतात, तेंच स्त्रियांनीं करावें, असा मात्र नव्हे. स्त्री–पुरुषांचीं कार्यक्षेत्रें निसर्गतःच भिन्न असल्यामुळें, स्त्रीचें 'स्त्रीत्व' नि पुरुषाचें 'पुरुषत्व' ज्यांत पूर्णपणें विकसित होईल, अशा प्रकारची समाज-रचना, विवाहरचना अथवा विचाररचना होणें अवश्य आहे. नव्या जगांत नवी स्त्री जन्मास येत आहे, ह्या दृष्टीनें स्त्री–स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे अधिक सहानुभूतीनें बघणें अवश्य आहे. कारण, ज्या राष्ट्रांत स्त्रियांना मान नाहीं, तें राष्ट्र कधींच उदयास आलेलें नाहीं. प्रत्येक देहांत व्यष्टिरूपानें नि समष्टिरूपानें परमेश्वराचा वास आहे. समष्टिरूप परमेश्वर म्हणजेच जग नि म्हणून बहुजन समाजाची सेवा हीच खरी परमेश्वराची पूजा होय.

## वेदान्त नि साम्यवाद

साम्यवाद हा अशा प्रकारें वेदान्त धर्मांत अंतर्भूत आहे. परंतु वेदान्त म्हणजे साम्यवाद नव्हे. कारण, त्यांस साम्यवादाप्रमाणें फक्त इंद्रियजन्य विश्वाचाच विचार करावयाचा नसून, अतींद्रिय विश्वाचाहि विचार करावयाचा आहे. भाकरीच्या भूकेबरोबरच मानवाची आध्यात्मिक भूकहि भागवावयाची आहे. कारण, अन्नग्रहण हीच कांहीं मानवाची एकमेव क्षुधा नाहीं. मनुष्याला पोट आहे, पण पोट म्हणजे कांहीं मनुष्य नव्हे. जीवनाला नितांत आवश्यक म्हणून मनुष्य अन्नग्रहण करीत असला, तरी अन्नग्रहणाकरितांच कांहीं मनुष्य

जिवंत राहात नाहीं–निदान राहू नये. कारण, भाकरी हेंच जीवित सर्वस्व असेल, तर पशु–पक्षी नि मानवाच्या जीवनांत फरक तो काय राहिला ? अतींद्रिय विश्व म्हणजे एक भ्रामक कल्पना, अशी जर साम्यवादी लोकांची धारणा असेल, तर तें मात्र बरोबर नाहीं.

"अल्ट्राव्हायोलेट" नि "इन्फ्ररेड" ही प्रकाश किरणें मानवी चक्षूंस दिसत नाहींत, म्हणून त्यांचें अस्तित्वच नाहीं, असें कोणी शास्त्रज्ञ म्हणेल काय ? तसें पाहतां, शास्त्रीय उपकरणें न वापरल्यास, इंद्रियजन्य ज्ञान हें फारसें विश्वासार्ह नाहींहि. एक ऊन पाण्यांत नि दुसरा थंड पाण्यांत, असे आपले दोनहि हात बुडवून, नंतर दोघांस एकाच वेळीं साधारण ऊन पाण्यांत बुडविल्यास, एका हातास तेंच पाणी ऊन लागतें, तर दुसऱ्यास थंड ! एक विशिष्ट मर्यादांतर्गत असें स्पंदन असेल, तरच मनुष्यास ध्वनि ऐकू येतो, प्रकाशकिरण दिसतात अथवा विद्युत भासते नि म्हणूनच इंद्रियातीत विश्व नाहींच, हें म्हणणें युक्तिवादाला धरून नाहीं. पशूंच्या मेंदूत इंद्रियातीत जगाची कल्पनाहि येत नाहीं; इंद्रियातीत जगाच्या जिज्ञासेमुळेंच मनुष्य हा मनुष्यत्वास प्राप्त झाला. वेदान्त धर्माचें स्वरूप अशा प्रकारे एकदेशीय नसून विश्वव्यापी आहे. वेदान्ततत्त्वाचा अधिकार त्रिकालाबाधित नि स्थलातीत आहे. म्हणूनच, वेदान्त–धर्म हाच आजचा भारतीय धर्म नि उद्यांचा मानवधर्म होण्याच्या योग्यतेचा आहे. कोणत्याही आधुनिक शास्त्राच्या अद्यावत नि शास्त्रीय बैठकीप्रमाणें ( थिअरी नि प्रॅक्टिकल प्रमाणें ). वेदान्त हें ज्यांचें अंतिम स्वरूप नि योग हें ज्यांचें महत्तम साधन असणार, असा हा मानव धर्म अफूची गोळी ठरणार नसून, संजीवनी मंत्र ठरणार आहे.

योगशास्त्राबद्दल प्रस्तुत चर्चा करण्याचें कारण नाहीं. तो एक स्वतंत्र विषयच होईल. परंतु, ओघानेंच आले म्हणून इतकें सांगितलें कीं पुरे, कीं ब्रह्मप्राप्ती, मोक्षसाधन हीं ध्येयें बाजूला ठेवली, तरी योगासनें ही एक उत्कृष्ट व्यायामपद्धति होय. पाश्चात्य व्यायाम पद्धतीनें होणारी स्नायूंची जादा वाढ व त्यामुळें जीवनशक्तीवर येणारा अतिरिक्त ताण दीर्घायुष्यांस पोषक नाहीं, हें अलिकडील शरीरशास्त्रज्ञांचें मत लक्षांत घेतल्यास तर आसनांचें महत्त्व अधिकच पटतें. कारण, स्नायुवर्धनापेक्षां, शरीरांतील ग्रंथी नि स्राव, तसेंच हृदय, मेंदू, फुप्फुसें इत्यादींच्या आरोग्य नि समप्रमाणाकडेच आसन

पद्धतीचें विशेष लक्ष असतें. हातपाय मजबूत असणें इष्ट, परंतु हृदय मजबूत असणें त्याहून अधिक इष्ट. कारण, हातपाय जायबंदी झाले अथवा नसले तरी मनुष्य जगू शकतो, परंतु, हृदयास अपाय झाल्यास "पंचत्व" ठेवलेलेंच. कोणत्याही स्थितींत मन आनंदी ठेवा, हें सांगणें सोपें, आचरणें कठिण. परंतु, जो प्रतिदिनीं कठिण योगासनें हंसतमुखानें करील, तो कठिण परिस्थितीसही हंसतमुखानें तोंड देईल. शरीर नि मन हें परस्परावलंबित आहे व "शारीरिक नि मानसिक समतोलपणा भिन्न गोष्टी नव्हे; एकामुळें दुसरें प्राप्त होतें" हें बॅर्नार मॅकफेडन या सुप्रसिद्ध अमेरिकन शरीरशास्त्रज्ञाचें मत तर सुप्रसिद्धच आहे.

## वेदान्त नि व्यवहार

पुन्हा एकदां हें सांगणें आवश्यक आहे कीं वेदान्ताचा उद्देश केवळ बुद्धीची भूक भागविणें हा नाहीं. वेदान्ताचा व्यवहारिक उपयोग नाही, हा शुद्ध गैरसमज होय. तात्विक बैठक नसताना व्यवहार जमू शकतो, तर ती असताना तो जमणार नाहीं काय? उलट, सामान्य माणसाच्या मनांत असणाऱ्या विकारांवर–विषाद, हर्ष, भीति, लोभ, मत्सर, सूड इत्यादिकांवर–विजय मिळविल्यानें, समचित्त असल्यानें, वेदान्त्यास व्यवहारिक यश येण्याची शक्यता केव्हांही अधिक असणार

"लौकिक व्यवहार सोडा" हें वेदान्ताचें मुळींच सांगणें नाहीं. "अर्थ" साधनें बरोबरच "परम अर्थ" साधना होऊं द्या, इतकेंच वेदान्ताचें म्हणणें आहे. कारण, केवळ "अर्थ" साधनेनें सौख्य लाभत नाहीं. बौद्धमताप्रमाणें सर्व दुःखमयच आहे, हा सिद्धान्त वेदान्तास मान्य नाहीं. संसार दुःखमय भासत असला, तरी तो दुःखावर आधारलेला नाहीं, त्याला सुखाचें अधिष्ठान आहे. दुःख क्षणिक आहे, सुख शाश्वत आहे; परंतु, अविद्येमुळें भास मात्र उलटा होतो. सुख त्यागासाठीं नव्हे, तर अधिक सुख उपभोगासाठीं संयम करा; वासना उपभोगानें वासनातृप्ती होत नाहीं, म्हणून (चित्त स्थिर ठेवून) शक्यतो वासना क्षय करा; वासनाक्षयानें जीवन नष्ट होत नाहीं, उलट अधिक व्यापक होतें; वरपांगी संन्यास घेण्यापेक्षां संन्यस्तवृत्ति अंगीं बाणवा; आपल्या कल्याणास्तव दुसऱ्यावर अवलंबून राहूं नका, स्वावलंबी व्हा; हाच वेदान्ताचा उपदेश होय.

मंडनमिश्राच्या पत्नीच्या प्रश्नावरून, स्वतः संन्यासी असताहि, परकाया प्रवेश करून आद्य शंकराचार्यांनीं काम-कला सौख्याचा अनुभव घेतला, ही आख्यायिका फार सूचक आहे. वेदान्तशास्त्राची आणखी तात्विक चर्चा करण्याचें कारण नाहीं. शास्त्रकार म्हणतात.

" तावत् गर्जंति शास्त्राणि, जंबुका विपिनायते ।
न गर्जति महाशक्तिर्यावत् वेदान्त केसरी ॥ "

व्यावहारिक वेदान्ताविषयीं मात्र थोडे लिहिणें अप्रस्तुत ठरणार नाहीं, व या बाबतींत वेदान्ताचा आदेश खालीलप्रमाणें होय : " ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या " " शिवोहं ! अहं ब्रम्हास्मि " ही जाणीव ज्या प्रमाणांत होईल, त्या प्रमाणांत हवेच असेल तर व्यावहारिक यशहि मिळेल, हें निश्चित. निरहंकार वृत्तींत असतानांच अलौकिक कार्यें घडतात. इच्छेचा त्याग केल्याशिवाय इच्छापूर्ति होणें अशक्य आहे. यश हें नेहमीं निरिच्छतेच्या मागें लागत असतें. प्रत्यक्ष यशाची प्राप्ती होण्यापूर्वी यशाच्या वासनेचा बिमोड झाला पाहिजे. ' अहं 'चा यज्ञ करा, म्हणजे यश तुमचेंच आहे. यशा-विषयीची चिंताच पुष्कळवेळां अपयशाला कारणीभूत होते. मनुष्य गोंधळल्या मुळें पाण्यांत बुडून मरतो; चित्ताची स्थिरता कायम ठेवील, तर तेवढ्यानेंच तो बुडणार नाहीं. वैराग्य व स्वावलंबन ही यशाची गुरुकिल्ली होय.

स्वाभिमान म्हणजे देहाभिमान नव्हे, आपणांमधील परमात्वतत्त्वाबद्दल, सत्याबद्दल अभिमान. देवहारील ममत्व नाहींसें करून तें परमेश्वरार्पण करा; हें त्याचें वाद्य, त्यालाच वाजवूं द्या, म्हणजे त्यांतून दिव्य संगीत प्रकटेल. अहंकाराची बाधा झाल्यावर सर्व नाश हा ठेवलेलाच आहे. कर्तृत्वाचा टेंभा मिरवणें, कर्तृत्वाभिमान बाळगणें, उपभोक्ता होऊन राहणें, हें निसर्ग नियमांना धरून नाहीं. प्रत्येक मनुष्यामधील परमात्वतत्त्वाची ओळख न करणें, म्हणजे परमात्व वध अथवा देव वध करणें होय. आपल्या ठिकाणीं परमात्व भावना दृढ करून जगांतील सर्व वस्तूंशी त्या दृष्टीनें तादात्म्य पावणें, हा सुखाचा राजमार्ग होय. नानात्वांतील एकत्वाकडे दृष्टी ठेवा. नानात्वांत ज्याला एकत्व दिसते, तो ज्ञानी. ज्ञान अंगीं बाणल्यावर सुख तुमच्याकडे धांवत येईल.

शाश्वत जीवित पाहिजे असेल, तर जीवनाचें मर्म ओळखा. सत्याची कास धरा, नाहींतर ईश्वरी नियमाखालीं चिरडलें जा. नामरूपानें भुलून जाऊ

नका. बाह्य उपकरणावर, लोकांच्या मदतीवर, फार विश्वासून राहूं नका. आपखुशीनें लोक आले, तर त्यांचा संग्रह करा. तत्वनिष्ठा हेच तुमचें खरें भांडवल असले पाहिजे. थोरा मोठ्यांच्या आश्रयावर अवलंबून राहणारे, मोठ्या मोठ्या नावांच्या आणि दौलतीच्या मागे लागणारे, अखेर फसल्याशिवाय राहत नाहींत. सत्याच्या सूक्ष्म तंतूचा आश्रय करा. स्वतःला उन्नत करा, म्हणजे सर्व जगाला उन्नत करता येईल. वेदान्ततत्त्व स्वतः अमलात आणणें, हाच त्याचा खरा प्रचार होय. आत्म्याचें वैभव देहाचें समजणें व देहाच दोष (मरण इत्यादि) आत्म्याला लावण्यामुळेंच सर्व घोटाळा उत्पन्न झाला आहे. आत्मज्ञान संपादन करा, म्हणजे तुमच्या प्रत्येक अवगुणाचें रूपांतर गुणांत होईल.

वैराग्यवृत्ति अंगीं बाणण्यास्तव दुःखाची योजना आहे. म्हणूनच, दुःखें समचित्तानें सहन केलीं पाहिजेत. असे न करितां, परिस्थितीला दोष देऊं लागाल, तर संकट परंपरा कोसळलीच म्हणून समजा. मानवी जिव्हेनें आपल्या दुःखांबद्दल शद्बोच्चार करण्याचें सोडून दिलें, म्हणजे पाषाणांनाही वाचा फुटते. जड वस्तूशीं आसक्त व्हाल, तर ती वस्तूच हिरावून घेणें हा ईश्वरी नियम आहे. वैराग्य अंगीं बाणावें, हा त्यांत हेतु असतो. निराशा हा दुबळेपणा आहे, म्हणून ती टाकून द्या. सर्व सामर्थ्य निर्भयपणामुळें प्राप्त होतें.

जबाबदारीचा बाऊ करू नका. तुमच्यावर परमेश्वरानें फक्त एकच जबाबदारी टाकली आहे, ती म्हणजे चित्त प्रसन्न व शांत ठेवा. कार्य करण्याच्या आनंदापेक्षां कार्य सिद्धीचा आनंद अधिक असतो, असे मूर्ख आणि अविचारी पुरुष समजतात. आनंद हा कर्मांच्या रूपानें जगांत विहरत असतो. या जगांत प्रत्येक जीवाला कांहींतरी नियत कार्य असतेंच व तें फक्त तोंच करूं शकतो. म्हणून प्राप्त कर्तव्यांत कधींही कमीपणा वाटून घेऊं नका. प्राप्तकर्तव्य योग्य प्रकारें करणें, हेंच इश्वराचें खरें पूजन होय. मनापासून केलेलें कुठलेंही कर्म ही विश्रांतीच होय. कोणत्याही हलक्या कामाला हात पुढें करण्यास तुम्ही तयार व्हाल, तेव्हां उच्च दर्जाचीं कामें आणि प्रतिष्ठित व्यवसाय आपापले हात लांब करून तुमचें मनःपूर्वक स्वागत करतील. उद्योगाच्या वेषांत नटलेल्या परमेश्वरापासून तोंड वांकडे करून बाजूला न सरता, त्याची षोडशोपचारें पूजा कराल, तर शिष्टाचाराच्या बाबतींत ईश्वर तुम्हांला कधींही हार जाणार नाहीं. निरुद्योगीपणा ही मरणाची

तयारी होय. उद्योग, सततोद्योग म्हणजेच जीवित. नदी प्रवाहाप्रमाणें प्रसंगानुरूप आपण स्वतः बदलून, तसेंच परिस्थितीला योग्य वळण देऊन, मोठ्या धैर्यानें व उत्साहानें पुढें जा. शरीर ह कर्मांकरितां असल्यानें गति शास्त्राचें नियम लागू करून, तें नेहमी कार्यांत व्याप्त ठेविले पाहिजे. परंतु चित्तावर स्थितिशास्त्राच्या नियमाची अंमलबजावणी करून, तें नेहमीं एकाग्र करण्याची सवय ठेवली पाहिजे. देहभान नाहींसें झाल्याशिवाय, अहंता गळाल्याशिवाय, जिवंतपणांतील मरण आल्याशिवाय, स्फूर्ति होणें शक्य नाहीं. वातावरणांत संपृक्तता असली, म्हणजे वर्षा होते; मनांत एखाद्या विषयाची संपृक्तता झाली, म्हणजे स्फूर्ति होते.

दुसऱ्याबद्दल आपलीं मतें ठाम बनवूं नका. अन्यायाचा माफक प्रतिकार करा, पण सूडबुद्धि मनांत ठेवूं नका. स्वार्थाचा विसर पडणें यांतच यशाचें बीज आहे. स्वतःच्या गुणाची वकीली स्वतः करूं नका; परंतु, स्वतःस तुच्छ लेखून, अथवा फाजील विनय बाळगून मागेंही राहू नका. कारण, तुम्ही स्वतःस तुच्छ लेखूं लागला, तर लोकही तुम्हांस तुच्छ लेखतील. स्वतःस तुच्छ लेखणें, हा अंतर्यामी परमेश्वराचाच अपमान करणें होय.

स्वार्थपरायण लोकांवर न रागावता किंवा त्यांची लोभबुद्धि पाहून मनाची समता न ढळूं देतां, लोककल्याणार्थ आपले उद्योग केवळ कर्तव्य म्हणून वैराग्य पूर्वक चालू ठेवा. लोक लुच्चे आहेत अशी ठाम समजूत बाळगाल, तर तुम्हांला तसाच अनुभव येईल. त्या बाबतींत तुमची कधींच निराशा होणार नाहीं. द्वेष करूं नका. ज्याचा द्वेष कराल, ती वस्तु तुम्हांस पुरून उरेल. शेवटी कंटाळून द्वेष करणें सोडून द्याल, तेव्हांच तुमचा विजय होईल. जीवन कलहांत काय टिकू शकते ? प्रेम. दुसऱ्यावर प्रेम करणें व दुसऱ्याच्या प्रेमाचा विषय होणें, हेंच जीवितार्चे मुख्य साध्य आहे."

वेदान्त आणि व्यवहार यांची फारकत नाहीं, याबद्दल अनेक तत्वज्ञांचा आधार घेता येईल. प्रसिद्ध जर्मन तत्वज्ञ पॉल डायसन यानें स्पष्टच म्हटलें आहे कीं " Vedanta, in its unfalsified form, is the strongest support of pure morality, is the greatest consolation in the sufferings of life and death."

या वर्धिष्णु धर्मांचा विकासवाद, कर्मयोग, तर्कशास्त्र नि चिकित्सक बुद्धि सोडून, ज्या क्षणीं भारतीयांनीं अंधश्रद्धा, हटवाद, संकुचित वृत्ति नि आत्यंतिक अहिंसेचा स्वीकार केला, त्याच क्षणीं त्यांनीं आपल्या स्पृहणीय नि उज्वल भूतकालाचा नि भविष्यकाळाचा कपाळमोक्ष करून घेतला ! त्याच क्षणीं त्यांनीं, पूर्वजांस नरकांत व वशंजांस गुलामींत लोटले ! अहिंसेचा नि भूतदयेचा एवढा विपर्यास केला कीं दुर्जनांनीं, परक्यांनीं नि शत्रूंनीं केलेल्या अत्याचारावरहि प्रत्याचार, आघातावरहि प्रत्याघात करण्याचे सोडून आत्मघात करून घेतला. या पुरातन धर्मभूमीनें धर्मांचा त्याग करावा असें नाहीं. परंतु, खऱ्या धर्माचें आचरण करावे, हेंही तितकेंच खरे !

लेख : " सह्याद्री " पुणें, सेप्टेंबर १९४४; " नियतकालिक " राणींपार्वतीदेवी कॉलेज बेळगांव, मार्च १९५४.

# शास्त्राचा संदेश

“ शास्त्राचा संदेश ” या विषयावर कांहीं सहज विचार प्रस्तुत मांडावयाचे आहेत. सहज भासणाऱ्या गोष्टींतच पुष्कळदा भरपूर अर्थ असतो. “ सहज गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची मानवी संवयच, अनेक दुःखांचें मूळ आहे ” हें संत, महंत आणि तत्त्वज्ञ फार पुरातन कालापासून सांगत आले आहेत. “ जें पिंडीं, तें ब्रम्हांडीं ” ही म्हण याच सत्याची द्योतक आहे. धर्म आणि शास्त्र, यांची भूतकाळांत लठ्ठालठ्ठी झाली असेल, परन्तु, आज त्यांचें या बाबतींत एकमत आहे. धर्म आणि शास्त्रच कशाला, आजच्या राजकारणासहि सामान्यांचे महत्त्व कळले आहे, उपेक्षितांचें अंतरंग जाणण्याची तळमळ लागली आहे. एक काळ होता, कीं जेव्हां अनुपम सुंदरींच्या हाती इतिहास हें बाहुलें होतें. राम-रावण युद्धाचें कारण सीतेचें लावण्यच नाहीं काय ? क्लिओपॅट्रा, या इजिप्तच्या राजकन्येचें नाक जरा बोथट असतें, तर जगाचा इतिहास तीनशें वर्षांनी तरी बदलला असता, असा आंग्ल इतिहासज्ञ गिब्बन, याचा दावा आहे. पद्मिनीच्या अभिलाषेनेंच अल्लाउद्दीन खिलजीनें रजपूतांवर शस्त्र धरलें नाहीं काय ? मोठमोठ्या योध्यांनीं इतिहास घडवावा, असाहि काळ आला. या काळांत, तैमूर नि चंगीजखान, शिवाजी नि नेपोलियन, हिटलर नि मुसोलिनी हे चमकून गेले. परन्तु, ते दिवस आतां संपले आहेत. आजची लोकशाही नि समाजवाद, आजचें राजकारण, सामान्य माणसाच्या सुखाचाच टाहो फोडीत आहे !

## सामान्यांचें शास्त्रीय महत्त्व

शास्त्रांतीलच उदाहरण घ्यावयाचें, तर अणुपरमाणूंचें उदाहरण घेतां येईल. अणूपेक्षां आणखी लहान आणि क्षुद्र गोष्ट, जगांत असणें शक्य नाहीं. त्याची व्याख्याच बघा. ज्याचें विभाजन होणें शक्य नाहीं, इतका जो लहान, तो म्हणे अणु. या शतकापूर्वी तो उपेक्षित होता; परंतु, एकाएकी, थॉम्सन, रुदरफोर्ड या शास्त्रज्ञांचें त्याच्याकडे लक्ष गेलें, आणि त्यानें अशी कांहीं माया दाखविली कीं आजहि शास्त्रज्ञांचीं मनें गुंग झालीं आहेत. त्या इवल्याश्या अणूंत साऱ्या

ग्रहमालिकांच प्रतिबिंब आहे. अणू म्हणजे लहानगे सूर्यमंडळ! त्याच्या पोटांत असलेले अनेक लहानगे इलेक्ट्रॉन्स (ग्रह), मध्यभागीं असलेल्या प्रोटॉन (सूर्य), भोवतीं फिरत असतात. म्हटलें तर त्यांना अस्तित्व आहे, म्हटलें तर नाहीं! तो सव विद्युत (वीज) चा प्रकार आहे, हेंहि आतां उघडकीस आले आहे. या क्षुल्लक अणूची थोरवी काय वर्णावी? यानेंच गेल्या युद्धांत दोस्त राष्ट्रांना विजय मिळवून दिला. जपानी प्रतिकाराच कब्रड अणु–गोलानेंच मोडलें!

क्षुल्लक गोष्टींचें शास्त्रीय महत्त्व अन्य मार्गेहि सिद्ध करून देतां येईल. न्यूटनचें उदाहरण घ्या. त्याच्या बागेंत संत्रे खालीं पडतांना त्यानें बघितल किती साधी गोष्ट! संत्री कांहीं फक्त न्यूटनच्या बागेंतच खालीं पडत नाहींत. तीं सर्वत्र पडतात. परंतु, या क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष देतो कोण? तें फक्त न्यूटननें दिलें व गुरुत्वाकर्षणाचा अमर सिद्धान्त शोधून काढला. न्यूटन कांहीं आदिमानव नव्हता. कोटि कोटि मानव त्याच्या आधीं जन्मले नि मेले. परंतु, ही साधी गोष्ट कोणाच्याहि लक्षांत आली नाहीं. कोकणांत उंचावरून नारळ पडतांना आपण नेहमी बघतो, परंतु तो आपल्या डोक्यावर पडूं नये, या पलीकड त्या गोष्टीचा आपण कधीतरी विचार करतों काय?

आयन्स्टाइनचें उदाहरण घ्या. एकदां त्यानें एका सामान्य माणसाला विचारलें, "वर फेकलेला दगड खालीं का पडतो?" तो म्हणाला, 'शहाणाच आहे कीं! मग कुठें पडणार? वर पडणार? खालींच पडला पाहिजे!" आयन्स्टाइनला प्रश्न पडला–कोण बरोबर, न्यूटन की हा सामान्य माणूस? **सुदैवानें सामान्यांकडे दुर्लक्ष करण्याचा मोठेपणा आयन्स्टाइनमध्यें नाहीं**. त्यानें भरपूर विचार केला व त्यापासून त्याला एक नवी स्फूर्ति मिळाली. त्यानें न्यूटनचा सिद्धान्त खोडून काढला–नवा शोध लाविला. "गतिमान जडपदार्थ, अल्प विरोधी मार्गाचा अवलंब करतात" हाच तो सिद्धान्त होय. दगड खालीं पडतो, कारण वर कुठें जाणार बिचारा? सूर्य चंद्रावर जाणार? किती लांबचा प्रवास तो! अल्प विरोधी मार्ग म्हणजे भूतलावर आदळणें!

**क्षुल्लक नि सामान्य गोष्टींकडे दुर्लक्ष करूं नका, हा शास्त्राचा पहिला संदेश आहे.**

## अंगीकृत कार्याशीं समरस व्हा !

शास्त्रज्ञांचीं चरित्रें वाचून आणखी एक गोष्ट नजरेंत भरते. हे लोक बहुधा एकमार्गी आणि ध्येयवेडे असतात. पुन्हा आपण न्यूटनचेंच उदाहरण घेऊं. "पाइप" ओढण्याची त्याला भारी संवय होती. आपल्या प्रियतमेशीं गोड गोष्टी बोलत असतां, एकदां एकाएकी तो गणिताचा विचार करूं लागला. त्याचें भान हरपलें. तिच्या बोलण्याकडे लक्ष आहे, हे दाखविण्यास्तव तोंडानें 'हो' म्हणणें अर्थात् चालू होतें ! इतक्यांत त्याला आठवण झाली—"आज सकाळी आपण पाइप साफ केला नाहीं !" त्यानें खिसे चाचपले, परंतु, पाइप क्लीनरचा पत्ता नव्हता. अखेर आपल्या प्रियतमेचें बोट हातांत घेऊन त्यानें जळत्या पाइपमध्यें घातलें. ती किंचाळली, तेव्हा हा शुद्धीवर आला व म्हणाला, "क्षमा कर, मला असें नेहमीं होतें. मी तुझ्याकरिता योग्य नाहीं."

आपण सर्व न्यूटन नसल्यानें, अितका वेडसरपणा करण्याचें कारण नाहीं; परंतु, **अंगीकृतकार्याशीं जास्तींत जास्त समरस व्हा, हा शास्त्राचा दुसरा संदेश लक्षांत ठेवला पाहिजे.**

## मनाचा निर्विकारपणा हवा

माईकेल फॅराडे हा प्रज्ञावंत शास्त्रज्ञ होता. पूर्वायुष्यांतील दारिद्र्यामुळें तो फार अनुभवी होता. गरिबांना श्रीमंतांपेक्षां अनुभव जास्त येतात, हें एक उघड सत्य आहे. "शास्त्र म्हणजे काय ?" हा प्रश्न फॅराडेला विचारण्यात आला. त्यानें उत्तर दिले, "मन सुधारण्याचा तो एक प्रयत्न आहे." मन हें आरशाप्रमाणें आहे. बाहेरील जगाचें त्यांत प्रतिबिंब पडतें व आपणाला ज्ञान प्राप्त होतें. हें प्रतिबिंब जितकें बरोबर असणार, तितकेंच आपले विचार बरोबर असणार; परंतु, आरशांत तीन प्रकार असतात. कांहींत प्रतिबिंब लहान दिसतें, कांहींत मोठें दिसतें, कांहींत यथायोग्य दिसतें. मन हें या तिसऱ्या प्रकारच्या आरशा-प्रमाणें असले पाहिजे. परंतु, मानवी मनें हीं बहुधा पहिल्या दोन प्रकारच्या आरशांसारखीं असतात. संकटाचा आपण निष्कारण बाऊ करतों व जरा परिस्थिति अनुकूल असली कीं शेफारून जातो. युद्धकाळांत मुंबईंत एकदां बॉम्बस्फोट झाला. सर्व लोक पळूं लागले. स्टेशनवर जायला एकानें दहा रुपयांत गाडी ठरविली, दुसऱ्यानें वीस रुपये,

तिसऱ्यानें तीस रुपये काढले. गांवी पळण्याची ज्याला त्याला घाई झाली होती-जो तो आपल्यापुरतें बघत होता. "मुंबई कोणाची ?" हा प्रश्न त्यावेळीं उत्पन्न झाला नाहीं ! संकटामुळें भ्रातृभाव निर्माण व्हावयास पाहिजे, जसा लंडनच्या, स्टॅलिनग्राडच्या लोकांत निर्माण झाला. परंतु, आमचीं मनें पतित झालीं आहेत; बाहेरील परिस्थितीचें सम्यक् ज्ञान तीं आम्हांस देत नाहींत. संकटकाळीं आमच्यांत तुसडेपणा निर्माण झाला. "धैर्यधर" व्हावयाची वेळ असते, तेंव्हा "भागुबाई" प्रमाणें आम्हीं पळत सुटतों.

**परिस्थिति कशीहि असली, तरी निर्विकार, निरपेक्ष नि शांत मनानें, बुद्धि सम ठेवून, विचार करा, हा शास्त्राचा तिसरा संदेश आहे.**

## सत्याची चाड बाळगा

परंतु, मनाचा सुधार कसा करावयाचा ! फॅराडेनें यावर उपाय सुचविला आहे. "सत्याची चाड बाळगा" हा त्याचा आदेश आहे. सत्य आणि आहिंसा, हे महात्माजींचे अमर सिद्धान्त आहेत. अहिंसेबद्दल सांगतां येणें कठीण आहे; परंतु, सत्याशिवाय शास्त्रीय प्रगति शक्य नाहीं, हें निर्विवाद होय. स्वतः फॅराडेला सत्याचें वेड होतें. पुस्तकांची बांधणी करणारा तो एक अशिक्षित माणूस होता. दुरुस्तीस येणाऱ्या शास्त्रीय पुस्तकांचें वाचन करण्याची त्याला गोडी लागली. प्रयोगशाळेंत जाऊन प्रयोग करण्याचीहि त्याला अनिवार इच्छा झाली. तो अनेक शास्त्रज्ञांकडे गेला. परंतु, या अशिक्षितास कोण ठेऊन घेणार ? अखेर सर हम्फ्री डेव्ही नांवाच्या शास्त्रज्ञास त्याची दया आली व "प्रयोगशाळेंतील नोकर" म्हणून फॅराडेची नेमणूक झाली. डेव्ही त्या वेळीं विद्युत्-पृथःकरण करीत होता. फॅराडेचेंहि लक्ष तिकडे होतेंच. विद्युत् प्रमाण जास्त कमी कराल, तसें वस्तूंचें पृथःकरण जास्त कमी होतें, हें या सत्यशोधकाच्या ध्यानीं आलें व "वस्तूंचें विद्युत् – पृथःकरण, हें विद्युत् प्रवाहावर अवलंबून असतें" हा सिद्धान्त मांडून त्यानें विद्युत्-रसायनाच्या पाया घातला. आश्चर्य म्हणजे ही साधी गोष्ट डेव्हीच्या लक्षांत आली नाहीं !

**सत्य संशोधनाची सतत खटपट करा, हा शास्त्राचा चौथा संदेश आहे.**



क्रमांक ........

## स्वतंत्र बुद्धीनें विचार करा !

सत्य संशोधन, हें शास्त्राचें ध्येय आहे व जें अनुभवसिद्ध असेल तेंच सत्य मानावयाचें हा शास्त्राचा दंडक आहे. सत्य संशोधन शास्त्रीय मार्गानेंच होतें, हा शास्त्राचा दावा नाहीं. अन्य मार्गहि असूं शकतील. धर्मांतील गूढ सत्यें श्रद्धेमुळें ज्ञात होतात, असें म्हणतात; परंतु, श्रद्धा, विश्वास या गोष्टींस शास्त्रांत स्थान नाहीं ! श्रद्धावंतांनीं सुखैनैव धर्माचा मार्ग चोखाळावा. शास्त्रांत लुडबूड करून, शास्त्र नि धर्म या दोघांचाहि त्यांनीं घात करूं नये, इतकीच शास्त्राची अपेक्षा आहे. **सदा संशयी असणें हाच शास्त्रज्ञांचा गुण ठरतो. जो स्वतंत्रपणें विचार करील तोच शोध लावील !**

सरळ रेषेची व्याख्या आपण पुरातनकालापासून पाठ करीत आलों आहोंत—"दोन बिंदूंमधील कमींत कमी अंतर म्हणजे सरळ रेषा." आयन्स्टाइनच्या संशयी मनाला हें पटेना. त्यानें विचार केला व अनुमान काढलें की ही व्याख्या निखालस चूक आहे. दोन बिंदूंमधील कमींत कमी अंतर सरळ रेषा असणें शक्य नाहीं; ती वक्र रेषाच असली पाहिजे. **सरळ रेषा ही असंभव गोष्ट आहे !** ज्याला तुम्ही सरळ रेषा म्हणतां, ती एकाच बाजूनें सतत वाढवीत गेल्यास, पुन्हा मूलपदावर, पहिल्याच ठिकाणीं परत येईल ! एक भलें मोठें वर्तुळ मात्र तयार होईल !

स्टेशनवर जात असतां, एकदां एका सामान्य माणसास आयन्स्टाइननें विचारलें, "स्टेशन किती लांब आहे ?" त्यानें उत्तर दिलें, "१५ मिनिटांचा मार्ग आहे." आयन्स्टाइनचा शास्त्रीय अहंकार जागृत झाला. तो म्हणाला, काय गांवढळ मनुष्य आहे ! मैल, दीड मैल, दोन मैल, चार मैल ही अंतर मोजण्याची शास्त्रीय पद्धत ! हा वेळेच्या रूपांत अंतर मोजीत आहे ! मूर्ख आहे, आणखी काय ? परंतु, आयन्स्टाइन पक्का संशयी आहे. त्याचें मन त्याला स्वस्थ बसूं देईना ! त्यानें विचार केला, व तो सामान्य मनुष्यच बरोबर आहे अशी त्याची खात्री पटली. आपल्या सुविख्यात सापेक्षतेच्या सिद्धान्तांत, वरील सामान्य माणसासच त्यानें बरोबर ठरविलें आहे. **देश आणि काल**, Space and Time, **हींच अखेरची सत्यें होत. तींच एकामेकांचें मूल्यमापन करूं शकतात, हें वरील सिद्धान्तात त्यानें ठांसून मांडलें आहे व तें आज सर्वमान्य झालें आहे.** मग शास्त्राचा

पाचवा संदेश कोणता असणार? **अंध विश्वास बाळगूं नका, स्वतंत्र बुद्धीने विचार करा, हाच तो संदेश होय.**

## नियमबद्ध व्हा, पण ठोकळेबाज होऊं नका

सृष्टींतील व्यवहार नियमबद्ध आहेत, त्यांत निश्चितता आहे, हा न्यूटनच्या सिद्धान्ताचा पाया आहे. हाइझेनबर्ग या जर्मन शास्त्रज्ञास हें पटेना. स्त्री-पुरुषांचें प्रमाण एकंदर जगांत सम आहे. पूर्वी असेंच होतें, व पुढेंहि असेंच राहील. मग जेकबला विचारूं या. "तुला चार मुलें आहेत. त्यांतील दोन मुलें व दोन मुली आहेत काय?" तो "नाहीं" म्हणेल. त्याला चारहि मुलीच असणें शक्य आहे; परंतु, एकंदर शहराचा विचार केल्यास, स्त्रीपुरुषांचें प्रमाण पुन्हा सम असल्याचें दिसेल. कारण जेकबला चार मुली असतील, तर स्टीफनला आठ मुलगेहि असणें शक्य आहे. हाईझेनबर्गने विचार केला व एक नवा सिद्धान्त मांडला. "**निश्चितता व अनिश्चितता, या एकाच सत्याच्या दोन बाजू आहेत. जास्त संख्येचा विचार केला तर निश्चिततेचा सिद्धान्त लागू पडतो; संख्या जितकी कमी, तितकी अनिश्चितता जास्त.**" एखाद्या नगराचा विध्वंस झाला तर नागरिकांना अतीव दुःख होतें, हा सर्वसामान्य नियम आहे. रोमला आग लावण्यांत आली, तेव्हां तेथील नागरिक ढळढळा रडले, हा झाला निश्चिततेचा सिद्धान्त. परंतु, नीरो नांवाचा एक अवलिया असाहि निघाला की, रोम जळत असतां त्याला हर्षवायु झाला! तो नाचूं लागला, गाऊं लागला, आवडतें वाद्य वाजवूं लागला. याला म्हणतात अनिश्चिततेचा सिद्धान्त. उंच फेकलेली वस्तु नेहमीं खाली पडते, कारण ती एकच वस्तु आहे असें आपणांस वाटत असलें, तरी वस्तुतः त्यांत कोटि कोटि अणु-परमाणू असतात. मग संख्या जास्त म्हणून, अर्थातच, निश्चिततेचा सिद्धान्त लागू पडतो. परंतु, प्रत्येक अणूचा वेगळा विचार केला तर तो खाली पडेलच असें नाहीं. निश्चितता जितकी खरी, तितकीच अनिश्चितताहि खरी आहे. जग हें शाश्वत नि अशाश्वत यांचें एक विचित्र मिश्रण आहे, हें शास्त्रज्ञांसहि आता पूर्ण पटलें आहे! **नियमबद्ध व्हा, पण ठोकळेबाज होऊं नका; निर्बंध, कायदा हवा—एकंदर समाजाला तो आवश्यक आहे—पण, व्यक्तिस्वातंत्र्यहि हवे, हा शास्त्राचा सहावा संदेश आहे.**

## फुटीर वृत्ति सोडा, ऐक्याकडे लक्ष द्या !

शास्त्राची आणखी एक व्याख्या आहे—" वर्गीकृत, शिस्तबद्ध ज्ञान, म्हणजे शास्त्र. " किती लहान व्याख्या आहे व अर्थ केवढा महान् आहे! वर्गीकरण कसें करतात याचा विचार करूं या. प्रतिवर्षी कॉलेजांत अनेक मुलें येतात. कांहींना प्रथम वर्षांत ठेवण्यांत येतें, कांहींना द्वितीय, इत्यादि. प्रथम वर्षाचा वर्ग सगळयांत मोठा असतो. त्यांत भिन्न भिन्न स्वभावांचीं, उंचीचीं, भाषांचीं मुलें असतात. मग त्यांना एकाच वर्गांत कां ठेवण्यांत येतें? कारण भिन्नता कितीहि असली, तरी एका बाबतींत त्यांच्यांत संपूर्ण साम्य असते. ते सर्व एस्. एस्. सी. परीक्षा पास झालेले असतात. मग शास्त्राचा सातवा संदेश कोणता असणार? **विविधतेंतील ऐक्याकडे लक्ष द्या, फुटीर वृत्ति सोडा, एक व्हा, हाच तो संदेश होय !**

## उच्च ध्येय बाळगा, पण अव्यवहारी होऊं नका

वरील संदेशाविरुद्ध एक शंका येणें साहजिक आहे. " प्रावीण्यते " चें प्रस्थ शास्त्रांत फार आहे. रसायन, भूगर्भ, प्राणिशास्त्र, वस्तुशास्त्र इत्यादि शास्त्राचे अनेक भेद आहेत, व शास्त्रज्ञ त्यांतील एखादा लहानसा भाग घेऊन प्रावीण्य मिळवितो. तर मग शास्त्र संकुचितपणा शिकवीत नाहीं काय? उत्तर "नाहीं" असें आहे. शास्त्रज्ञान आज इतकं वाढलें आहे कीं, एक मनुष्य सर्व शास्त्रांत पारंगत होणें शक्य नाहीं. मानवी मर्यादा लक्षांत घेऊन, लहान लहान शास्त्रीय क्षेत्रांत प्रावीण्यता मिळविण्याची खटपट सुरू झाली. राजकारणांतील ब्रिटिशांचें " फोडा व झोडा " हें तत्त्व व शास्त्रांतील " प्रावीण्यता " यांत बरेंच साम्य आहे. प्रावीण्यतेमुळेंच शास्त्रवाढ इतक्या झपाट्यांत झाली व होत आहे. परंतु, ही प्रावीण्यता डोळस हवी, अंध नको. मोठाले शास्त्रज्ञ हें आपल्या विशिष्ट क्षेत्रांत प्रवीण असलें, तरी एकंदर ज्ञानाच्या बाबतींत अंध नव्हते. रॉबर्ट बाइल हा वस्तुशास्त्रज्ञ होता, तसा रसायनशास्त्रज्ञहि होता ! जगदीशचंद्र बोस हे जितके प्राणिशास्त्रज्ञ होते, तितकेच वस्तुशास्त्रज्ञहि होते. संकुचितपणाचा दोष शास्त्रास देणें युक्त होणार नाहीं. कार्यविभागणी ही कार्यवाढीसाठीं करावयाची असते. विविधतेंतील ऐक्याकडे लक्ष द्या, परन्तु, विविधता आहे ही गोष्ट विसरूं नका. बदलत्या परिस्थितीशीं एकरूप व्हा.

**उच्च ध्येय बाळगा, परंतु, अव्यवहारी होऊं नका, हा शास्त्राचा शेवटचा संदेश होय. स्वातंत्र्य प्राप्तीबरोबर अस्मानांत भरारणाऱ्या आपल्या देशास या शेवटच्या संदेशाची किती गरज आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.**

( विस्तृत भाषण : लिंगराज कॉलेज, बेळगांव, शास्त्र विभाग उद्घाटन, १९४८; रोटरी क्लब, बेळगांव, १९५०. )

( संक्षिप्त भाषण : विजय कॉलेज, विजापुर, शास्त्र विभाग, १९५१; कॅनेरा कॉलेज, कुमटा, शास्त्र विभाग, १९५१. )

लेख : " सह्याद्री " पुणें, जुलै १९५१.

# गांधीजींची अभिनव स्वराज्य साधना

विशिष्ट विषयांतील प्राविण्य हेंच ज्या काळाचें वैशिष्ट्य आहे, त्या आजच्या काळांत, समाजाची सर्वांगीण सेवा करण्याचें सामर्थ्य असलेले नेते दुर्मिळच असणार. गांधीजी हे या नियमास अपवाद होत. जग त्यांना भारतीय स्वातंत्र्याचें जनक म्हणून ओळखतें. परंतु, त्यांचें जीवन राजकारणापुरतेंच मर्यादित नव्हतें. या देशाचें दास्य सर्व प्रकारें देशास पतित करीत आहे, हें बघून त्यांनीं राजकारणाकडे विशेष लक्ष दिलें इतकेंच. राजकारणांत ते मोठ्या आवडीनें पडेल असतील, असेंहि वाटत नाहीं. दलितांचा कवार, माणुसकी, ह त्यांच्या जीवनाचें होकायंत्र होतें. म्हणूनच दक्षिण आफ्रिकेंतील गोऱ्या हुकुमशाहीशीं आणि भारतांतील ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं त्यांना दोन हात करावे लागले. स्वातंत्र्याप्रीत्यर्थ ते साऱ्या आयुष्यभर लढले. परंतु, स्वातंत्र्य प्रत्यक्ष मिळाल्या-वर झालेल्या उत्सवसमारंभाचे बाबतींत ते उदासीन राहिले. समाजाला सुखी करण्याचें एक साधन म्हणून ते स्वातंत्र्याकडे बघत. स्वातंत्र्य हेंच त्यांचे साध्य नव्हतें. त्यांचा पिंड समाजसुधारकाचा होता. या देशांतील राजकीय परिस्थितीनें त्यांना राजकारणांत ओढलें इतकेंच. सुशिक्षितांमध्यें त्यांच्याबद्दल मोठा वाद आहे. परंतु, या देशांतील सामान्य जनता त्यांना बरोबर ओळखते, राजकीय नेता म्हणून नव्हे, महात्मा म्हणून !

आधुनिक जीवनांतील ठोकळेबाजपणा त्यांना मान्य नव्हता. राजकारण, धर्म-कारण, समाजकारण, इत्यादि सर्वच गोष्टींकडे त्यांचें सारखेंच लक्ष असे. सर्वसंग्राहकता, सर्वंकषता, हें त्यांच्या जीवनांतील महान वैशिष्ट्य होय. त्यांच्या समग्र जीवनकार्याबद्दल थोडक्यांत लिहिणें कठीण आहे. अशा प्रयत्नांत त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यताच जास्त. प्रस्तुत, स्वराज्यप्राप्तीस्तव ज्या अभिनव साधनांचा त्यांनीं उपयोग केला त्यांचाच विचार करावयाचा आहे.

## गांधीजींच्या राजकारणाचें वैशिष्ट्य

एक राजकीय नेता या दृष्टीनेंहि गांधीजींचें स्थान अद्वितीय आहे, अढळ आहे. बिंदुमात्रहि रक्तपाताशिवाय त्यांनीं एका खंडप्राय देशास स्वातंत्र्य मिळवून

दिलें. "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?" या प्रश्नास "रणावीण स्वातंत्र्य आम्हां मिळालें" हें उत्तर न बोलता त्यांनीं दिलें. जगाच्या इतिहासांत ही घटना जितकी अद्‌भुत, तितकीच रम्य आहे. "ब्रिटिशांची ती मेहरबानी समजा" असें जे म्हणतात, त्यांना इतकेंच सांगितलें कीं पुरें कीं 'अहिंसेनें स्वातंत्र्य मिळेल' हें स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गांधीजींनी सांगितलें नाहीं. स्वातंत्र्याचा उच्चार करणें हाहि जेव्हां गुन्हा होता, त्या दूरच्या काळांत, दुर्दम्य आशावादानें, उपहास नी उपेक्षा सहन करूनहि, "अहिंसेनेंच स्वराज्य मिळवीन" हें गांधीजी ठांसून सांगत. या त्यांच्या आत्मविश्वासाचें कारण स्पष्ट आहे. गांधींजी कांहीं 'पावसाळी' पुढारी नव्हते. देशाच्या राजकीय आखाड्यांत उतरण्यापूर्वीं सत्याग्रही म्हणून दक्षिण आफ्रिकेंत त्यांना भरपूर लोकप्रियता लाभली होती. परंतु, १९१५ सालीं या देशाच्या राजकारणांत पाऊल टाकल्यावर व्यासपीठें गाजविण्याचा मोह त्यांनी कटाक्षानें टाळला. ना. गोखले हे त्यांचे गुरु. त्यांच्या उपदेशानुसार या बॅरिस्टरानें वर्षभर राजकीय मौन धारण केलें, सारा देश निरखून पाहिला, सत्यसंशोधन केलें व स्वातंत्र्याचीं साधनें म्हणून चार साध्या गोष्टी जनतेपुढें ठेवल्या–सत्य, अहिंसा, असहकार आणि खादी. या देशांतील हतवीर्य झालेल्या निःशस्त्र समाजास 'वर्षांत स्वातंत्र्य मिळवून देतो' असें आश्वासन देऊन गांधीजींनी पुनरुज्जीवित केलें !

वरील चतुःसूत्रीनेंच त्यांनी पारतंत्र्याविरुद्ध जास्तींत जास्त लोकमत तयार केलें; स्वराज्याचें, स्वातंत्र्याचें लोण समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचविलें. अन्यायाचा प्रतिकार फक्त 'शठं प्रति शाठ्यं' अथवा 'ठोशास ठोसा' ह्या न्यायानेंच करतां येतो, हा आत्तांपर्यंतचा समज बदलून, विशिष्ट परिस्थितींत अहिंसेनेंही अन्याय–निवारणाचा लढा चालविण्याचें एक नवें शास्त्र म. गांधींनीं निर्माण केलें, हें निःसंशय. मग त्यास ते स्वतः सत्याग्रह म्हणोत, कोणी त्यास निःशस्त्र प्रतिकार म्हणोत, अथवा ब्रिटिशांप्रमाणें अन्य कोणी त्यास राजकीय बुवाबाजी म्हणो. अर्थात, गांधीवादांतील ईश्वरी प्रेरणा, उपोषण, प्रार्थना, आंतला आवाज, हिमालयीन चुकांची कबूली इत्यादि गोष्टी मात्र म. गांधींच्या व्यक्तिमत्वापुरत्याच मर्यादित होत्या, हें लक्षांत घेणें जरूर आहे. या त्यांच्या व्यक्तिगत गोष्टींची नक्कल करणाऱ्यांचें हंसेंच होईल.

## गांधीजींचें 'सत्य' म्हणजे काय ?

'सत्य' या शब्दाचा अर्थ सत्य बोलणें इतकाच बहुधा घेतला जातो. गांधीजींच्या सत्याचा अर्थ इतका मर्यादित नव्हता. "माझ्या सत्यांत इतर तीनहि साधनें समाविष्ट आहेत" असें ते सतत सांगत.

सत्यशोधन, निरपेक्ष दृष्टीनें परिस्थितीची पाहणी, साधनांची शुचिता व अचूकता, या सर्व गोष्टी त्यांच्या सत्यांत अंतर्भूत असत. पाशवी शौर्य, धैर्य इत्यादींच्या कमतरतेमुळें नव्हें, तर नीतीदृष्ट्या पतित असल्यानेंच हा देश गुलाम आहे, हें अचूक निदान या सत्यसाधनेनेंच त्यांनीं केलें. या देशांतील सामान्य जनता दरिद्री नी अशिक्षित आहे, देशभक्तीचा तिच्यांत लवलेशहि नाहीं, "को नृप होइ, हमें क्या हानी ?" ही एकंदर वृत्ति आहे, हें लक्षांत घेऊन, आम जनता स्वातंत्र्योन्मुख झाल्याखेरीज देशास स्वातंत्र्य मिळणार नाहीं, हा सिद्धांत त्यांनीं बसविला.

१८१८ सालीं मराठी राज्य लयास गेल्यावर या देशांत मोठी वैचारिक खळबळ उडाली. दोन पक्ष निर्माण झाले—क्रांतिकारक व समाजसुधारक. क्रांतिकारकांचें म्हणणें असें, कीं युद्धांत पराभव झाल्यानें देश परतंत्र झाला. स्वातंत्र्याकरितां युद्ध अपरिहार्य आहे. पेशवाई बुडाल्यावर पुण्याच्या ब्राह्मणांनीं लहानसें बंड केलें होतें. परंतु, दोन दिवसांत त्याचे तीनतेरा झाले. मोठा प्रयत्न करून क्रांतिकारकांनी १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध लढविलें. पण ज्या कारणामुळें मराठी राज्य खलास झालें, त्याच कारणामुळें, म्हणजे एकसूत्रीपणाच्या व देशभक्तीच्या अभावामुळें, दुहीमुळें, हा प्रयत्नहि फसला. परंतु, या अनुभवांतूनहि क्रांतिकारकांनी बोध घेतला नाहीं. "रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?" हा त्यांचा घोष चालूच होता. फडके, सावरकर, चाफेकर व बंगाली—पंजाबी क्रांतिकारक याच पक्षाचे होत. त्यांच्या त्यागाबद्दल कुणाचेंच दुमत नाहीं. पारतंत्र्यांतील शिथिल गात्र अशा या देशास या वीरांच्या त्यागानेंच स्फूर्ति दिली, कार्यप्रवण केलें. परंतु, त्यांचें वैचारिक अधिष्ठान अचूक नव्हतें, हेंही खरेंच. या उलट, समाजसुधारकांचें म्हणणें असें कीं देशांत ऐक्य व राष्ट्रप्रेम नसल्यानें देश गुलाम झाला. आमचेच लोक चांगल्या पगाराच्या आशेनें इंग्रजांच्या सैन्यांत शिरले व हा देश त्यांनीं इंग्रजांना जिंकून दिला. लोकहितवादी, न्या. मू. रानडे, ना. गोखले व गांधीजी ही समाजसुधारकांची

अखंडित परंपरा होती. त्यांत गांधीजींचें वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनीं सामान्य जनता आपल्याबरोबर ओढली.

" कमविपाक " हें तुमच्या दारिद्र्याचें कारण नसून, राज्यसत्तेवर तुमचा ताबा नाहीं, अज्ञानामुळें दुसऱ्याकरितां तुम्ही राबतां, मोहामुळें परदेशी माल विकत घेऊन घरांतील लक्ष्मी बाहेर घालवितां, यामुळें तुम्ही दुःखी आहांत, हें गांधीजींनीं गरीब जनतेस समजावून सांगितलें. सुशिक्षितांचें अंधानुकरण करण्याच्या मोहापासून सामान्य जनतेस वांचविण्यासाठीं, त्यांनीं स्वतः साहेबी पोशाख वर्ज्य केला व गरीबांतला गरीब माणुस जितकें वस्त्र घेऊं शकेल, तितक्याच वस्त्रावर सारें आयुष्य घालविलें. गांधीजींच्या सत्याचा अर्थ इतका महान होता, व त्या सत्याकरितां ते अहर्निश झटले.

## अहिंसा नि असहकार

पारतंत्र्य विमोचनाची चळवळ आतांपर्यंत अनेक देशांत झाली आहे. साध्य उदात्त व पवित्र असल्यास साधनांकडे नीतीदृष्ट्या विशेष लक्ष देण्याचें कारण नाहीं, ही आतांपर्यंत राजकीय नेत्यांची भूमिका होती. साध्य आणि साधनांची ही फारकत गांधीजींना मान्य नव्हती. साध्याचें पावित्र्य व साधनांची शुचिता यांवर त्यांचा सारखाच कटाक्ष असे. जगाच्या राजकारणांतील अविश्वास, भीति, युद्ध, यांचें मूळ साधनांच्या अपवित्रतेंतच आहे, असें ते म्हणत. नुसत्या उच्च ध्येयांनी शांतता प्रस्थापित होत नाहीं, हें आतां "यूनो" सिद्ध करीत आहेच ! " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे " हें लो. टिळकांनी सांगितलें व "स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांत कोणत्याहि प्रकाराच्या गुप्ततेचें कारण नाहीं " हें गांधीजींनी स्पष्ट केलें. "आपल्या पारतंत्र्यास आपणच कारणीभूत आहोंत; मूठभर इंग्रज लोक आपल्याच मदतीनें आपणावर राज्य करीत आहेत; त्यांना घालवून लावण्यास हिंसेची जरूरी नाहीं; त्यांच्याशी केवळ असहकार केल्यासहि त्यांचें राज्ययंत्र बंद पडेल " हा त्यांच्या आदेशाचा सारांश होय. या उपदेशानें त्यांनीं जनतेंत नवचैतन्य ओतलें व १९२०, १९३० व १९४२ च्या महान अहिंसक चळवळी केल्या. गौतमबुद्धानंतर कोणत्याहि पुढाऱ्यास मिळाले नसतील, इतके अनुयायी या देशांत गांधीजींना मिळाले व जनता-जनार्दनाच्या या पाठिंब्यावर अखेर त्यांनीं या देशास स्वातंत्र्य मिळवून दिलेंच.

गांधीजींच्या अहिंसेची व असहकाराची त्यांचे विरोधक थट्टा करीत असतात. या तत्त्वाचें मर्म या विरोधकांना कळलें नाहीं, इतकेंच म्हणावें लागेल. गांधींच्या असहकारांत, देशाच्या उपयोगाचें असेल तेव्हां, सरकारशी सहकार ही अभिप्रेत होता, हें कौन्सिल प्रवेश, अधिकार–स्वीकार, या बाबतींत त्यांनी काँग्रेसजनांना वेळोवेळीं सम्मति दिली, यावरून सिद्ध झालेंच आहे. या दृष्टीनें, तशी प्रत्यक्ष घोषणा न करितां, लो. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचेंच तत्व गांधींनी अंमलांत आणलें, हें उघड होय. सरकारशीं अनिवार्य असलेला सहकार आपल्या राष्ट्रास जास्तींत जास्त लाभकारक अथवा हितावह करून घेण्याकडे त्यांचा कल असे. ध्येय नि व्यवहार यांची ते इतकी उत्कृष्ट सांगड घालीत कीं बॅरिस्टर, बनिया आणि बैरागी यांचे गांधी म्हणजे एक विलोभनीय नि उत्कृष्ट मिश्रणच वाटे. टिळक नि गांधी यांच्या मतभेदावरच जोर देणारी अनिष्ट प्रथा जेव्हां कालौघाबरोबर नष्ट होईल, तेव्हां टिळकांचें कार्यच गांधींनी पुढें चालविले, स्वातंत्र्य लढ्यांत एकीची आवश्यकता भासल्यानें टिळकांच्या "लखनौ–करारा"प्रमाणेंच गांधींनी अल्पसंख्यांकांशीं जुळतें घेतलें, टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचें मर्म व आचरण गांधींनांच उत्कृष्ट साधले, हाच निर्णय इतिहास देईल. स्वतः टिळकांनाही गांधीच्या कर्तृत्वाची आपल्या प्रज्ञाबुद्धिनें जाणीव असावी, असें दिसते. आपल्या अखेरच्या काळांत, अमृतसर काँग्रेसला जात असतां, प्रवासांत एका स्थानकावर, लोकांनीं त्यांचा जयजयकार व सत्कार केला असता, टिळकांनीं लोकांचें लक्ष गांधींच्याकडे वेधलें व सांगितलें कीं भविष्यत् काळचा नेता हा होय. टिळक नि गांधी यांच्या अनुयायांची गतकालांत रणें माजलीं असलीं तरी गांधी नि टिळक यांच्या संयुक्त जयजयकाराचा काळ दूर नाहीं. गांधींच्या अहिंसेचा जे उपहास करितात, त्यांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं गांधीजींना दुर्बलांची अहिंसा मान्य नव्हती. सबलांच्या अहिंसेसच त्यांचा आशीर्वाद असे. त्यांच्या अहिंसेचा अर्थ शौर्य नि धैर्य हा होता, भेकडपणा नव्हे. शत्रूचें हृदयपरिवर्तन करण्यावर त्यांचा विश्वास होता. त्यास्तव आत्मबलिदानहि ते पवित्र मानीत. परंतु, अत्याचारी माणसास भिऊन कोणी त्यांचेकडे आश्रयार्थ गेल्यास ते त्याची निर्भत्सना करीत. भ्याडपणापेक्षां, प्रसंगी हिंसा करूनसुद्धां स्वत्वरक्षण करणें त्यांना मान्य होतें. गेल्या युद्धांत पोलंडनें केलेल्या सशस्त्र प्रतिकारास, ते अहिंसाच म्हणत.

अहिंसा व असहकार या नव्या अस्त्रांचा उपयोग गांधीजींनी या देशांत व द. आफ्रिकेंत मोठ्या सफलतेनें केला. फ्रेंच सोशॅलिस्ट पार्टीनेंहि अन्य मार्ग कुंठित झाले असतां, याच मार्गाचा अवलंब केला आहे. डॉ. मुंजे हे गांधीजींचे कट्टर विरोधक. परंतु, हिंदूंना न्याय मिळवून देण्यास्तव, १९३७ सालीं हैद्राबाद संस्थानांत जी चळवळ त्यांच्या पक्षानें केली तींत त्यांनीं हेंच शस्त्र वापरलें, मग त्यास ते सत्याग्रह म्हणोत अथवा निःशस्त्र प्रतिकार !

## खादीची उपयुक्तता

लो. टिळकांनीं या देशांतील जनतेस परदेशी माल बहिष्कृत करण्याचा उपदेश केला. मोहवश होऊन आपली संपत्ति बाहेर घालवूं नका, हें त्यांचें सांगणें असे. महात्माजी एक पाऊल आणखी पुढें गेले. त्यांनीं जनतेस सांगितलें कीं परदेशी माल तर घेऊं नकाच, परंतु जो स्वदेशी माल गिरण्यांत तयार होतो तोहि घेऊं नका. कारण गिरण्यांवर सामान्य जनतेचा अधिकार नाहीं, गिरण्या राष्ट्राच्या मालकीच्याहि नाहींत; त्यांची मालकी मूठभर धनिकांकडे आहे. गिरणींतील माल घेणें म्हणजे गरीबांनीं आपल्या कष्टानें मिळविलेला पैसा गिरणी मालकाच्या घशांत घालण्यासारखें आहे. त्यामुळें गरीबी वाढते. श्रीमंत व गरीब असे दोन ध्रुव निर्माण होतात. आपल्या हातानें सूत काढा, आपल्या हातानें कापड तयार करा, खादी वापरा व स्वावलंबी व्हा, हा गांधीजींचा आदेश होता. प्रत्येक खेडें स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देश स्वयंपूर्ण होणें शक्य नाहीं, हें त्यांचें म्हणणें असे. अफाट लोकसंख्येच्या या देशांत, प्रत्येकास कामधंदा मिळावा, हस्तव्यवसायास उत्तेजन मिळावें, हें गांधीच ध्येय होतें. खादीचें हें अर्थशास्त्र जेवढें उपयोगी, तेवढेंच सहजसाध्य आहे. साम्यवादाच्या प्रस्थापनेचा, आर्थिक विषमता नष्ट करण्याचा हा मार्ग गांधीजींनी, तीस वर्षांपूर्वी, १९२० सालीं सांगितला, हें लक्षांत घेणें जरूर आहे.

## गांधीजींच्या स्वातंत्र्याचा अर्थ

गांधीजींच्या स्वातंत्र्याचा अर्थ सामान्य जनतेचें सुख हा होता. गोरे अधिकारी जाऊन देशी अधिकारी येण्यांत त्यांचें "स्वातंत्र्य" समाविष्ट झालें नव्हतें. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं देशास स्वातंत्र्य मिळालें; परंतु गांधीजींना

त्यात कांहींच गोडी वाटली नाहीं. फाळणीमुळें पूर्व आणि पश्चिमेकडे रक्ताच्या नद्या वाहत होत्या. हा रक्तपात थांबविण्यासाठीं हा गरिबांचा कैवारी, दीन–दुबळ्यांचा "मोहन" धांवला! रामनामोच्चारानें, आत्मबलिदान करून, या देशांत शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यानें केला!

स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिवशीं इतर सर्व हिंदी नेते स्वातंत्र्योत्सवांत अहमहिकेनें भाग घेत होते. नव्या दिल्लींत मोठी रोशणाई केली होती, पंक्ती झडत होत्या; परंतु, त्याच वेळीं आपलें सर्व आयुष्य हिंदी स्वातंत्र्याकरितां वेंचणारा हा वृद्ध नेता नवखालीच्या अरण्यांत अगदीं एकाकी अनवाणी भटकत होता, दुःखितांचे अश्रू पुशीत होता, हिंसेनें भडकलेल्या लोकांना अहिंसेचा आणि एकतेचा उपदेश करीत होता! **आपल्या जीवितांचें सार्थक झालें, या आनंदांत ज्या वेळीं इतर नेते मग्न होते, त्याच वेळीं "हेंचि फळ काय मम तपाला?" असा प्रश्न गांधीजी स्वतःला विचारीत होते. त्यांच्या या अखेरच्या नवाखाली यात्रेंत त्यांच्या साऱ्या जीवनाचें रहस्य साठलेलें आहे. त्या यात्रेची स्मृतीसुद्धां या देशाचें भवितव्य उज्वल करील! जय गांधीजी!**

(गांधी जयंती, २ आक्टोबर १९४९, ग्लोब टॉकीज, बेळगांव येथील भाषण.)

लेख: "प्रेरणा," बेळगांव, जानेवारी १९५१.

# शास्त्रीय प्रगतीचीं आवश्यक उपांगें

हिंदुस्थान हा सर्व जगाचा अध्यात्मिक गुरू आहे, हा दावा आमच्या परराष्ट्रीय वकिलांपासून तत्त्वज्ञांपर्यंत सर्वच मांडीत आहेत. पाश्चात्यांचें सर्व लक्ष ऐहिक जगाकडेच असल्यानें ते या बाबतींत सहसा आम्हांस दुखवीत नाहींत. "पारमार्थिक क्षेत्रांत तुम्ही खुशाल पाय पसरा, ऐहिक जग मात्र आम्हांस मोकळें सोडा !" असाच जणुं त्यांचा सल्ला असतो. "कशाला उगीच हा पेशवाईचा खटाटोप करतां ? त्यापेक्षां लक्षावधि रुपयांची ही पेन्शन घ्या, चांगल्या सुखासमाधानानं ब्रम्हावर्तास जाऊन राहा, कांहीं परमार्थ साधन करा !" असाच पोक्त उपदेश एलफिन्स्टन साहेबानें दुसऱ्या बाजीरावास केला होता. रावबाजींना हा उपदेश किती मानवला, हें सुप्रसिद्धच आहे ! आमच्या अध्यात्मिक गुरुत्वाबद्दल जे संतोष मानून आहेत, त्यांच्याबद्दल येथें कांहींच म्हणावयाचें नाहीं. परंतु, ज्यांना हा देश ऐहिकदृष्ट्या बलवत्तर व्हावा अशी उत्कट इच्छा आहे, त्यांच्यास्तव थोडें लिहिण्याचें योजिलें आहे.

'हें जगच मिथ्या आहे, जीवन म्हणजे माया आहे' या विचारांत जे गुंग झाले आहेत, त्यांना अर्थातच जगाचा—दृश्य सृष्टीचा-विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. सूर्याची प्रखरता, चंद्राची मोहकता, सागराचें अक्राळ विक्राळ स्वरूप, विजेचा लखलखाट, वायूची उन्मादकता—अफाट शक्ति, ग्रहांचें शिस्तबद्ध भ्रमण इत्यादि बघून हे लोक जास्तच भाविक बनतात. परंतु, ज्यांना ऐहिक पराक्रम करावयाचा आहे, त्यांनीं निसर्गाबद्दलची ही विस्मय आणि कौतुकाची भावना सोडून, निसर्गशक्ति आपल्या ताब्यांत आणण्याची महत्त्वाकांक्षा धरली पाहिजे. शास्त्रज्ञांचा प्रयत्न हाच असतो व म्हणूनच, राष्ट्राचें ऐहिक सामर्थ्य हें शास्त्रज्ञांच्या संख्येवर अवलंबून असतें, हें मत आतां सर्वमान्य झालें आहे.

## दैववाद व शास्त्रीय प्रगति

ऐहिक जगाची आसक्ति आणि भौतिक शास्त्राची प्रगति या दोन गोष्टी परस्परावलंबी आहेत. कारण, ऐहिक जगाची आसक्ति असल्याखेरीज शास्त्रीय

प्रगतीस आवश्यक अशी मनोभूमिकाच तयार होत नाहीं. 'हें जगच खोटें आहे; याची आसक्ति बाळगल्यास मोक्ष (?) मिळणार नाहीं. माणसाच्या हातीं काय आहे ? जें होतें तें परमेश्वरी इच्छेनेंच !' इत्यादि समज जो समाज उराशी बाळगील, तो अर्थातच निसर्गशक्तींकडे दुर्लक्ष करील, संशोधनाची महत्त्वाकांक्षा धरणार नाहीं. "हित साधावयाचें असेल, तर भूत आणि भविष्याबद्दल विचार करूं नका; वर्तमानकालाचा सदुपयोग करा" अशी इंग्रजींत एक म्हण आहे. याच न्यायानें, पूर्वजन्म आणि परलोक याविषयीं जो समाज बेफिकीर असतो, त्याचेंच ऐहिक कल्याण होतें; कारण असाच समाज आपलें सर्व लक्ष ऐहिक हिताकडे केन्द्रीभूत करूं शकतो.

या दृष्टीनें आतां आपल्या समाजाकडे बघा. जिकडे पाहावें तिकडे असहाय्य व संन्यस्त वृत्ति दिसेल. आमचीं मनें इतकीं विकृत झालीं आहेत, कीं शोक, दुःख व असहाय्यतेंतच आम्हांस विचित्र प्रकारचें समाधान लाभतें ! अशाच बोलपट, कादंबऱ्या आणि नाटकांना विशेष लोकाश्रय मिळतो ! संगीत हें हृदयाचें भावनिदर्शक असतें, असें म्हणतात. आमच्याकडील लोकप्रिय गाणीं बघा. "एक दिलके टुकडे हजार हुअे" "दुनियामें कौन हमारा ?" "क्या मिल गया भगवान्, तुम्हें दिल को दुखाके ?" "दो दिनकी है दुनिया सारी, झूठा है संसार" इत्यादि लोकप्रिय गीतांतील हताशपणाचें, विरक्तीचें विशेष वर्णन करण्याचें कारण नाहीं. हे विचार आमच्या तरुण पिढीनें कळत अथवा न कळत सतत आळविणें भौतिक प्रगतीस कितपत श्रेयस्कर आहे, याचा विचार आमच्या समाजधुरंधरांनी व सरकारनें जरूर करावा. दैववाद, पारलौकिकवाद व शास्त्रीय प्रगति यांचें प्रमाण नेहमींच व्यस्त असतें; ज्या राष्ट्राचे डोळे परमार्थाकडे असतात, त्याच्या हातून शास्त्रीय प्रगति कालत्रयींहि होणें शक्य नाहीं !

## शिक्षणाची पुनर्घटना हवी !

वर सुचविलेल्या मानसिक क्रांतीबरोबरच आपल्या शिक्षणक्रमाचीहि पुनर्घटना होणें अवश्य आहे. शिक्षणक्रमांत शास्त्राचा समावेश उशीरा झाला व प्रारंभींच्या काळांत या नवीन विषयाची एकंदरीनें उपेक्षाच झाली. आजहि भाषा, इतिहास, भूगोल, गणित इत्यादि विषयांप्रमाणें आमच्या शिक्षणक्रमांत,

शास्त्र हा सक्तीचा विषय नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं विद्यापीठांत तर "गायन, शिवण, चित्रकला व शास्त्र" अशी ऐच्छिक विषयांची नामावलि असते! धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण इत्यादि विषयांप्रमाणें शास्त्रांस शिक्षणक्रमांत अथवा समाजांत मान नाहीं. उलट, शास्त्रज्ञ हा आपल्या विषयांत कितीहि तरबेज असला तरी त्याखेरीज त्याला कांहींच 'गम्य' नसतें, साधें व्यवहार-ज्ञानसुद्धां नसतें, असाहि लोकापवाद आहे! इतर विषयांपेक्षां प्रगतीचीं बीज शास्त्रांत विशेष प्रमाणांत आहेत, शास्त्राचे विजय कायम स्वरूपाचे असले तरी शास्त्रांतील नियम, सिद्धांत, भूमिका यांचें स्वरूप बदलतें आहे, 'बाबावाक्यं प्रमाणं' या वृत्तीस किंवा श्रद्धेस शास्त्रांत स्थान नाहीं, शास्त्रांत कांहीं निराळेपणा आहे, हें आमच्या शिक्षणतज्ज्ञांनी लक्षांत न घेतल्यानें अत्यंत अशास्त्रीय पद्धतीनें, इतिहास–भूगोलाच्या तालसुरांत, शास्त्र शिकविण्याची पद्धति रूढ झाली, पाठांतरास प्रोत्साहन मिळालें! शास्त्रामुळेंच आजची संस्कृति निर्माण झाली–होत आहे, शास्त्रानेंच गेल्या अनेक शतकांचा इतिहास घडविला, शास्त्रनिष्णात असल्याशिवाय यापुढें कोणत्याहि राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, ही मनोभूमिका बालपणींच तयार होईल, अशी कोणतीहि तरतूद आजच्या शिक्षणक्रमांत नाहीं. यापुढें सोव्हिएट रशियाप्रमाणें, अगदीं प्राथमिक अवस्थेपासूनच, आमच्या शिक्षणक्रमांत शास्त्रास महत्त्वाचें स्थान मिळालें पाहिजे. अन्यथा, या देशांतील शास्त्रीय शिक्षणाची दुर्दशा थांबणार नाहीं, भौतिक दृष्ट्या हा देश उर्जितावस्थेस येणार नाहीं!

आमच्या शिक्षणक्रमांतील सक्तीच्या अशा प्रत्येक विषयांत शास्त्राचा अंतर्भाव असावा; तसा करणें सहज शक्यहि आहे. इतिहासाचेंच उदाहरण घ्या. हा विषय शिकविण्याची सध्याची पद्धति अत्यंत एकांगी आहे. राजे–रजवाडे, त्यांची वंशावळ व साम्राज्यें, त्यांचे तह व कलह, उदय नि अस्त, यांतच आमचा इतिहास सपुष्टांत येतो! सामान्य जनता, तिची परिस्थिति नि प्रगति, यांची त्यांत जवळजवळ कांहींच माहिती नसते. आतां याच इतिहासांत, शास्त्रवाढीचा आत्तापर्यंतचा मानवी प्रयत्न, त्यापायीं झालेलें बलिदान, त्यांतील सामान्य जनतेचा वांटा, मोठमोठ्या शास्त्रज्ञांचीं चरित्रें इत्यादींचा अंतर्भाव केल्यास तो नव्या पिढीला स्फूर्तिदायक नि उद्‌बोधक होणार नाहीं काय? असाच बदल भूगोल नि भाषाशिक्षणाच्या बाबतींतहि करतां येईल.

खनिज द्रव्यें व तीं शुद्ध करण्याच्या रासायनिक क्रिया, वनस्पति आणि पशु, नक्षत्रें नि तारांगण यांची माहिती भूगोलांतच अंतर्भूत करणें शक्य नाहीं काय ? यामुळें भूगर्भ, रसायन व खगोल शास्त्रांतलीं आद्यतत्त्वें, अगदीं नकळत मुलांना समजतील. भाषाशिक्षणाच्या बाबतींत तर नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, कविता इत्यादींप्रमाणें स्वतंत्र असा एक 'शास्त्रविभाग' असावा. या विभागांत शास्त्राची युक्तायुक्तता, स्वरूप नि साध्य, मर्यादा नि प्रगति यांची भरपूर माहिती असावी. अशा वाङ्मयाची मराठी भाषेस वाण पडणार नाहीं व योग्य तें प्रोत्साहन दिल्यास, सर्व वयाच्या मुलांना सोयिस्कर असें शास्त्रीय वाङ्मय आमचे साहित्यिक सहज पुरवितील.

## बदलता शास्त्रीय शिक्षणक्रम कां ?

शास्त्रज्ञान हें अव्याहत वाढत आहे व म्हणूनच शास्त्रीय शिक्षणक्रम हा सदैव बदलता हवा. अन्यथा, तो अद्यावत् राहणार नाहीं. परंतु, तसें होत नाहीं. याला चार कारणें आहेत. एक म्हणजे बदल न करण्याची, स्थितिस्थापकतेची मनुष्यास नैसर्गिक आवड आहे. दुसरें असें की बदलता शिक्षणक्रम ठेवल्यानें तो शिकविण्यास शिक्षकवर्गास विशेष तसदी पडते व तो या गोष्टीस नाखूष असतो. तिसरें असें, कीं अशा प्रकारें शिक्षणक्रम सतत बदलणें परीक्षांच्या दृष्टीनें फार गैरसोयीचें असतें! त्यामुळें परीक्षकांना ठराविक ठशाचे प्रश्न टाकतां येत नाहींत व विद्यार्थ्यांस पाठान्तर करणें सोयीचें होत नाहीं! आणि चौथें असें कीं शास्त्रवाढीबरोबर शिक्षणक्रमाचीहि वाढ केल्यास, तें सर्व ज्ञान ठराविक कालमर्यादेंत बसविणें हें त्रासदायक असतें! हीं खरीं कारणें सोडून, आणखी एक जुजबी कारणहि अनभिज्ञ लोकांच्या पुढें वेळोवेळीं मांडण्यांत येतें. म्हणे, शास्त्रांत नवीन सिद्धांत, भूमिका वगैरेंची सतत भर पडत आहे हें खरें; परंतु, हा नवीन भाग जोंपर्यंत वादातीत ठरत नाहीं, तोंपर्यंत तो शिक्षणक्रमांत घेणें कसें शक्य आहे ? उद्यां तो खोटा ठरला तर ? ही विचारसरणी वरवर 'सशास्त्र' वाटली, तरी तेवढीच फुसकी आहे! कारण, जुने सिद्धांत खोटे ठरणार नाहींत, अशी तरी काय हमी आहे ? वस्तुतः ते खोटे ठरतच आहेत. गेलीं तीन शतकें न्यूटनच्या सिद्धांताचा सर्व जगांतील गुरुशिष्यांकडून पुनरुच्चार नि पाठांतर होत आहे; परंतु, आइन्स्टा-ईनने तें बिनदिक्कत जमीनदोस्त केलेच कीं नाहीं ? प्राथमिक अवस्थेंत कितीहि

कळकळीनें हे सिद्धांत शिकविले, तरी उच्च शिक्षणाच्या वेळीं "न्यूटनच्या कल्पना खोट्या ठरल्या आहेत" हें सांगावें लागतेंच की नाहीं? मग प्रथमपासूनच शास्त्रांतील सत्य हें परिस्थितीनुरूप नि तुलनात्मक असतें, अंधश्रद्धा, विश्वास इत्यादि गोष्टींना शास्त्रांत स्थान नाहीं, हें स्पष्टपणें विद्यार्थ्यांस सांगणें श्रेयस्कर नाहीं काय? उलट, शास्त्रसिद्धांतांत कसकसे बदल होत गेले, हें सप्रमाण दाखवा, अशा प्रकारचे प्रश्न यापुढें परिक्षकांनी विचारावयास हवे! चिकित्सकपणास शास्त्रांत अमर्याद वाव आहे, हें विद्यार्थ्यांच्या लक्षांत आणणें जरूर आहे. म्हणूनच, योग्य तें तारतम्य ठेवून, अडचणींची तमा न धरतां, अद्यावत् शास्त्रज्ञान पुरविणें हें कर्तव्यच आहे हें लक्षांत घेऊन, शिक्षणक्रमांत नवीन शोधांचें, सिद्धांतांचें सदैव स्वागतच व्हावें. मग प्रतिवर्षीं शिक्षणक्रम बदलावा लागला, शिक्षकांची पगारवाढ करावी लागली तरी हरकत नाहीं! असा बदल करण्यास संशोधक व अनुभवी लोकांचें एक मंडळच नेमून टाकावें, अशी आग्रहाची सूचना आहे.

## मुलांचें मानसशास्त्र लक्षांत घ्या.

शास्त्रज्ञान मिळविणें व शास्त्राची आवड उत्पन्न होणें या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत. अन्यथा, केवळ शास्त्रज्ञानानें पांडित्य अंगीं बाणेल, परंतु नवसंशोधन होणार नाहीं. आणि नेमकी हीच तर आमच्या राष्ट्राची खरी गरज आहे. आमची शिक्षणपद्धति बरोबर असेल, तर मुलांची शास्त्रनिष्ठा प्रतिदिनीं वाढावयास हवी. पण आज बरोबर उलट होत आहे! शास्त्र हा विषय घेतलेल्या मुलांची थोड्याच काळांत निराशा होते. हा शिक्षणपद्धतीचाच दोष नाहीं काय? नित्य परिचयाचे शास्त्रीय शोध बघून, कांहींतरी रोमहर्षक, नावीन्यपूर्ण शिकावयास मिळेल या लालसेने, विद्यार्थी शास्त्र हा विषय घेतात. परंतु, वर्गांत त्यांच्यावर बॉइल्स लॉ, चार्ल्स लॉ इत्यादींचा रुक्ष भडिमार करण्यांत येतो!

"पाण्यांत वजन केलें, तर कोणत्याहि वस्तूचें वजन कमी भरतें" या आर्किमिडीजच्या सिद्धांतानें त्यांच्या कानठळया बसविण्यांत येतात! ते म्हणतात, "भरेना का वजन कमी! पुढें काय?" त्यांना पाहिजे असते रेडिओ, टेलीफोन, विमानें, वीज इत्यादींची माहिती! त्याचें नांव नाहीं. मग

त्यांची शास्त्रनिष्ठा वाढणार कशी ? घरीं गेल्यावर " मला रेडिओ दुरुस्त करतां येतो, मी लहानगा शास्त्रज्ञ झालों " हें गौरवानें सांगतां येणार कसें ? लहान वयांत या गोष्टी समजणार नाहींत, असें म्हणणें शुद्ध थोतांड आहे. ग्रहणशक्ति चिकित्सकता, स्मरणशक्ति हे गुण लहानपणींच जास्त प्रमाणांत असतात; व मुलांचें वय पाहून त्याप्रमाणें माहिती देणें, हें कठीण नाहीं. रसायनशास्त्र, वस्तु-शास्त्र इत्यादींची मूलभूत तत्त्वें, सोप्या रीतीनें मांडल्यास, सहा वर्षांच्या मुलांनाहि समजणें शक्य आहे, हें पाश्चात्य देशांत प्रयोगान्ती सिद्ध झालें आहे. लिहितांवाचतां येण्यापूर्वींहि शास्त्राची आवड उत्पन्न होऊं शकते, अशी त्यांची खात्री पटली आहे. परंतु, सुधार म्हटल्यास तो आपल्या देशांत सहजासहजीं व्हावयाचाच नाही; जुनें सोडवयाचें नाहीं, नवें शिकावयाचें नाही, हा आमचा बाणा आहे. गेलीं ८० वर्षें आपल्या देशांत शास्त्राचें शिक्षण चालू आहे, पदवी-धर तयार होत आहेत, परंतु नांव घेण्याजोगे शास्त्रज्ञ मात्र मोजकेच ! जी शिक्षण-पद्धति मुलांचें मानसशास्त्र लक्षांत घेत नाहीं, ती कदापि फलदायी होणार नाहीं, हें ब्रह्मवाक्य म्हणून लक्षांत असणें जरूर आहे.

## शास्त्रीय ऐपतीची वाताहत

सधन व मध्यम वर्ग सोडल्यास, आपल्या देशांतील बहुतेक मुलें चौदा वर्षें वयाच्या पुढें शिक्षण घेत नाहींत. आता या वयापर्यंत शास्त्राची माहिती त्यांना नसतें म्हटलें तरी चालेल. या लोकांना आम्हीं शास्त्राची ओळख करून देत नाहीं. म्हणजे शेकडा ७५ टक्के कार्य याच ठिकाणीं खची होतें ! बरें, जे शाळा सोडून जातात त्यांची शास्त्र शिकण्याची ऐपतच नसते, असेंहि नाहीं. ' मिस्त्री ' नावाने ओळखला जाणारा, रेडिओ, मोटार, इंजिनें लीलेनें दुरुस्त करणारा व मिल आणि फॅक्टरींत उत्कृष्ट काम करणारा एक भलामोठा वर्ग या देशांत आहे. हे लोक अशिक्षित असतात; परंतु, शास्त्र शिकलेले लोक तोंडांत बोटें घालतील, इतका हा वर्ग शास्त्रीय क्रियाकर्मांत वाकबगार असतो ! पुस्तकी ज्ञानानें भारलेले आमचे शास्त्रीय पदवीधरच त्यांच्याकडून, प्रसंगीं त्यांच्या रांगड्या भाषेंत, उपयुक्त असें शास्त्रज्ञान मिळवितात !

आतां जे पंचवीस टक्के विद्यार्थी उरतात, त्यांची दशा बघा ! शास्त्रीय शिक्षणांत प्रयोगांचें महत्त्व फार आहे. प्रयोग केल्याविना स्वतःबद्दल आत्म-

८४५८

विश्वास व शास्त्राबद्दल आवड उत्पन्न होणें शक्य नाहीं. भूमिका, सिद्धांत व त्यावरील ठराविक ठशांचीं गणितें शिकविण्याऐवजी, वस्तुतः शास्त्रीय शिक्षणाची सुरुवातच मुळीं लहानमोठ्या प्रयोगांनीं असावी. परंतु, हें होत नाहीं ! आपल्या-कडील मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांस शास्त्राबद्दल जी थोडीबहुत माहिती असते, ती सर्व सिद्धांतरूप. त्यांत अद्यावत् माहिती अत्यंत अल्प असते. शाळेंत जें शास्त्रज्ञान त्यांना मिळतें, तें असें की जें जगास चारशें वर्षांपूर्वी ठाऊक होतें. किचकट व कंटाळवाण्या भागास सध्या परीक्षेच्या दृष्टीनें फाजील महत्व दिलेलें आहे. पाठांतराची ज्यांना हौस आहे, गणिताचा ज्यांना नाद आहे, असेच विद्यार्थी सध्या शास्त्राच्या परीक्षेंत जास्त गुण मिळवितात. अर्थात्, या दोन गुणांचा नि संशोधक वृत्तीचा अन्योन्यसंबंध नाहीं, हें कोणीहि मानसशास्त्रज्ञ सांगूं शकेल. माइकेल फॅराडे हा प्रज्ञावन्त शास्त्रज्ञ होता. आज त्याला शास्त्रज्ञांचा अध्वर्यु समजण्यांत येतें; विद्युत्‌रसायनाचें एक नवें युग त्यानें निर्माण केलें; परंतु, या शास्त्रज्ञाची गणितांत फारशी गति कधीच नव्हती. त्याचा धनी, प्रख्यात शास्त्रज्ञ सर हम्फ्रे डेव्ही, यांस जें जमलें नाहीं, तें बेताचेंच शिक्षण घेतलेल्या या त्याच्या सेवकानें चौकसपणा नि चिकित्सकपणा, या दोन गुणांच्या बळावर करून दाखविलें. फॅराडेचा आदर्श आमच्या युवकांनीं सदैव आपल्या डोळ्यासमोर ठेवावा. निरनिराळ्या रासायनिक मिश्रणांवर डेव्ही त्या काळीं विद्युत्‌चे प्रयोग करीत होता. हा अशिक्षित मुलगा तें बघत असे व डेव्हीच्या अनुपस्थितींत तोहि तेंच करून बघत असे. विद्युत्प्रवाह जास्त जाऊ दिल्यास रासायनिक मिश्रणांचें पृथःकरण जास्त होतें, कमी जाऊं दिल्यास कमी होतें, ही डेव्हीच्या सुशिक्षित नजरेंतून सुटलेली साधी गोष्ट, या अशिक्षित मुलाच्या नजरेंत भरली ! आणि "वस्तूंचें विद्युत्पृथःकरण, हें विद्युत्प्रमाणावर अवलंबून असतें" हा विद्युत्-रसायनाचा पहिला सिद्धान्त त्यानें जगापुढें ठेवला ! परंतु, सध्या आमचा शास्त्रीय शिक्षण-क्रम एकंदरीत असा आहे, कीं ज्यांना गणिताचा नाद नाहीं व ज्यांना पाठांतर करण्याची हौस नाहीं, त्यांनीं शास्त्रास कायमचा रामरामच ठोकावा ! अशा प्रकारें, बहुतांशीं विद्यार्थी अन्य विषयांत आपलें लक्ष गुंतवून घेतात, कांहीं थोडे मास्तरकीचा धंदा पत्करून हीच परंपरा पुढें चालू ठेवतात व तुलनात्मक दृष्टीनें अत्यंत थोडे विद्यार्थी शास्त्रांतील उच्च शिक्षण मिळावें, हें ध्येय आपल्या नजरेसमोर ठेवतात.

शास्त्रीय शिक्षणक्रमांतील आतापर्यंतचे दोष लक्षांत घेऊन पाश्चात्य राष्ट्रांनी शालेय शिक्षणांत अनेक प्रकारचे फेरबदल केले आहेत व सध्याहि करीत आहेत. अिंग्लंडच्या सायन्स मास्टर्स ॲसोशिएशननें व अमेरिकेंतील मॉडर्न एज्युकेशन कमिटीनें शास्त्रांतील प्राथमिक शिक्षणक्रम चार वर्षांचा असावा असें सुचविलें असून, प्रत्येक वर्षी नित्य परिचयाचे कांहीं शोध नि कांहीं मूलभूत सिद्धांत यांची पेरणी केलेला एक अभिनव शिक्षणक्रम आंखला आहे. स्थलमर्यादेमुळें त्यांची सविस्तर माहिती येथें देत नाहीं. आपल्याहि देशांत शक्यतों असा बदल करण्यांत यावा इतकें सांगितलें की पुरे !

## कांही दोष व त्यांवरील उपाय

प्राथमिक नि दुय्यम शिक्षणाचें ध्येय विषयाची आवड उत्पन्न करणें व उपलब्ध ज्ञानाची माहिती देणें हें असतें. परंतु, उच्च शिक्षणाचा हेतु इतकाच असत नाहीं. ज्ञात असलेल्या माहितीच्या बळावर अज्ञाताचें संशोधन करणें, नवनिर्मितीची ऐपत निर्माण करणें, हें उच्च शिक्षणाचें ध्येय आहे. ह्या दृष्टीन आपल्या विद्यालयीन शिक्षणाकडे बघा. संशोधनतंत्र ही काय चीज आहे, शास्त्राच्या कुठल्या भागांत सध्या विशेष संशोधन चालू आहे, आपल्या देशाच्या दृष्टीनें सध्या कोणतें संशोधन आवश्यक आहे इत्यादींची माहिती आमच्या पदवीपरीक्षेपर्यंतहि विद्यार्थ्यांस मिळत नाहीं. ज्या वयांत बुद्धि जास्तींत जास्त चिकित्सक, चौकस नि संशोधक असते, तें सर्व वय संशोधनाच्या दृष्टीनें फुकट जातें. मग शास्त्रसंशोधनास उत्तेजन मिळणार कसें ? शालेय शिक्षणांत सूचित केलेले सर्व दोष विद्यालयीन शिक्षणांत आहेतच; आणखी कांहीं नवी भरहि आहे. त्यांतील कांहीं ठळक दोष नि त्यांवरील उपाय येथें सुचवीत आहे.

शास्त्रांतील उच्च शिक्षण हें खर्चिक असल्यानें आमच्याकडील सर्वसाधारण विद्यार्थ्यांस तें झेंपत नाहीं. त्यामुळें जे सधन आहेत त्यांचाच शिरकाव महाविद्यालयांत विशेष प्रमाणांत होतो. सधनता व बौद्धिक लायकी यांचें प्रमाण बहुधा व्यस्त असल्यानें विद्यालयीन शिक्षणाचा दर्जा, त्यांना झेपेल इतपतच ठेवावा लागतो. त्यामुळें जे खरोखर हुशार आहेत व ज्यांच्याकडून संशोधन होणें शक्य आहे, अशा मुलांचा कालापव्यय होतो. यावर उपाय दोन आहेत. एक तर विद्यालयांतील शास्त्र-विभागांत प्रवेश देण्यापूर्वी विद्यार्थ्यांची बौद्धिक

दृष्ट्या कसून तपासणी व्हावी व जे शास्त्र शिकण्यास योग्य आहेत, अशांनाच प्रवेश मिळावा. दुसरें असें, कीं विद्यार्थ्यांच्या बौद्धिक उंचीनुसार अनेक प्रकारचे शास्त्रीय शिक्षणक्रम असावेत, म्हणजे आपापल्या योग्यतेनुसार जो तो आपला शिक्षणक्रम निवडील. पण हे दोन्ही उपाय आर्थिक दृष्ट्या गैरसोयीचे आहेत. पहिल्या उपायानें विद्यार्थ्यांची संख्या घटेल व त्यांच्याकडून 'फी' च्या रूपानें मिळणारें आर्थिक उत्पन्नहि बुडेल. दुसरा उपाय प्रत्यक्षांत आणल्यास प्राध्यापकांच्या संख्येंत बरीच भर घालावी लागेल व त्यामुळें महाविद्यालयांचा खर्च वाढेल. तें कांहींहि असलें, तरी अशा प्रकारचा बदल करणें आवश्यक आहे. सरकारनें अथवा धनिक वर्गानें हा आर्थिक बोजा सहन करण्याची तयारी ठेविली पाहिजे. शिक्षणाच्या बाबतींत आर्थिक दृष्टि ठेवून भागत नाहीं! शास्त्रप्रगतीस्तव कांहींतरी 'किंमत' द्यावी लागते, हें आमच्या समाजाच्या अजून नीट लक्षांत आलेलें नाहीं. म्हणूनच, सध्याच्या शिक्षणपद्धतीच्या दोषांमुळें जोंपर्यंत आपला समाज होरपळून निघत नाहीं, शास्त्रपारंगत अशा एखाद्या राष्ट्राच्या परचक्रानें जोंपर्यंत आपल्या स्थितिप्रिय समाजास प्रत्यक्ष 'चटका' बसत नाहीं, तोंपर्यंत आपल्या शास्त्रशिक्षणपद्धतींत आमूलाग्र बदल होईल, असें आम्हांस वाटत नाहीं.

आमच्या शालेय शिक्षणांत शास्त्रविभाग अत्यंत अल्प असतो. त्यामुळें कॉलेजांत शास्त्रशिक्षण जवळजवळ सुरवातीपासूनच घ्यावें लागतें. कॉलेजांत आल्यानंतर चार वर्षांत मुलें पदवी परीक्षेस बसतात. यावरून हा कार्यक्रम किती झटपट उरकण्यांत येतो याची कल्पना केलेली बरी. निदान इंटरसायन्सपर्यंतचा आजचा शिक्षणक्रम तरी शाळेंतच उरकण्यांत यावा, हा यावर एक उपाय आहे व शाळेंत शास्त्र-शिक्षणाची सुरवात प्रथमपासूनच केल्यास, हें अगदीं सहज शक्य आहे.

आमच्या विद्यालयांतील प्रयोगशाळांत सध्या मिळणारें शिक्षण अगदीं ठराविक ठशाचें आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेकरितां तयार करणें, हाच त्याचा उद्देश असतो. हें पाहिजेच, परंतु त्याशिवाय संशोधन तंत्रहि शिकविण्याची आवश्यकता आहे. हें कसें समजणार? यास्तव, पदवीपरीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांनीं निदान वर्षभर तरी संशोधन करीत असलेल्या तज्ञ लोकांच्या हाताखालीं काम केलें पाहिजे. लहान सहान गोष्टींत त्यांना मदत केल्यानें, त्यांच्या प्रयत्नांचें व

यशापयशाचें प्रतिदिनीं निरीक्षण केल्यानेंच संशोधन तंत्र साध्य होईल; कारण, ' संशोधन तंत्र ' हें जेवढें ' शास्त्र ' आहे, तेवढीच ती एक ' कला ' आहे, हें निर्विवाद होय ! मोठमोठाले प्रयोग आमच्या प्रयोगशाळांतून करणें शक्य नाहीं, म्हणूनच कारखाने व उद्योगधंद्यांचें निरीक्षण विद्यार्थ्यांनीं अवश्य केलें पाहिजे. अशा प्रकारच्या सहली हा शिक्षणक्रमाचाच एक आवश्यक भाग असला पाहिजे; अन्यथा, विद्यार्थ्यांस ' शास्त्रीय व्यवहारज्ञान ' प्राप्त होणार नाहीं.

## प्राध्यापक नि विद्यालयांतील त्यांचीं व्याख्यानें

शास्त्रीय प्रगतीच्या बाबतींत प्राध्यापकवर्गाची जबाबदारी मोठी आहे. नेहमींचा शिक्षणक्रम अर्थातच पुरा केला पाहिजे; परंतु, त्याच बरोबर युवकांत शास्त्रसंशोधनाची आवड उत्पन्न करण्याचें कार्यहि त्यांचेंच आहे. मुलांची जिज्ञासा जागृत करणें, उपलब्ध असलेल्या ज्ञानाची अपूर्णता पटवून संशोधनाची दिशा दर्शविणें, शास्त्र नि समाज, शास्त्र नि औद्योगीकरण यांचे संबंध दिग्दर्शित करणें, हीं सर्व कार्येंहि त्यांनींच करावयाचीं आहेत. त्यांच्या भाषणांनीं ' अलिखित ' पुस्तकांची जागा घेतली पाहिजे. आज बरोबर उलट होत आहे. बहुतेक प्राध्यापकांचीं भाषणें पुस्तकी असतात ! ज्यांना स्वतंत्रपणें अभ्यास करतां येत नाहीं, वाचण्यापेक्षा ऐकणें हेंच ज्यांना सोयिस्कर वाटतें, अशा विद्यार्थ्यांना या भाषणांचा उपयोग होत असेल; परंतु, इतरांच्या दृष्टीनें हा शुद्ध कालापव्यय होय ! पुस्तकांत लिहिलेलेंच सांगावयाचें असेल, तर मुलांचा वेळ घेण्यांत काय हंशील आहे ? भाषणाच्या टंकलिखित प्रति मुलांना वाचावयास दिल्या म्हणजे झालें. अमेरिकेंत कांहीं ठिकाणीं हा प्रयोग सुरू झाला असून विद्यालयांतील भाषणांचे दोन प्रकार करण्यांत आले आहेत. नामांकित संशोधकांनीं, शास्त्रज्ञांनीं, आपापल्या संशोधनकार्यावर अथवा इतर नावीन्यपूर्ण विषयावर दिलेलीं भाषणें हीं पहिल्या प्रकारांत व विद्यालयीन परीक्षांकरितां म्हणून दिलेलीं ' पुस्तकी ' भाषणें हीं दुसऱ्या प्रकारांत मोडतात. पहिल्या प्रकारचीं भाषणें ऐकण्याचीं विद्यार्थ्यांवर सक्ती आहे; दुसऱ्या प्रकारचीं भाषणें ' ऐच्छिक ' आहेत ! विद्यालयांतील ४० टक्के भाषणें तरी पहिल्या प्रकारचीं असलीं पाहिजेत, अशी सक्ती करण्याचाहि विचार चालू आहे.

आपल्याकडेहि योग्य तो फेरबदल करून वरील प्रघात पाडणें इष्ट होईल. म्हणजे प्रत्येक विद्यालयांत दोन प्रकारचा प्राध्यापकवर्ग हवा. एक कायमचा, दुसरा ‘ फिरता ’. हे ‘ फिरते ’ प्राध्यापक निरनिराळ्या विद्यापीठांचे असावेत व त्यांच्या वेतनांची सोय करण्यास्तव स्वतंत्र असें एक ‘ आंतरविद्यापीठ मंडळ ’ असावें. अशा प्रकारें सर्व हिंदुस्थानांतील नाणावलेल्या शास्त्रज्ञांचा लाभ देशांतील सर्व विद्यार्थ्यांस होऊं शकेल. या प्रघातामुळें केवळ व्याख्यानबाजीस प्रोत्साहन मिळूं नये, म्हणून या ‘ फिरत्या ’ प्राध्यापकवर्गानें वर्षातून सहा महिने तरी संशोधनकार्य केलेंच पाहिजे, अशीहि सक्ती करण्यांत आली पाहिजे. या ‘ फिरत्या ’ प्राध्यापकांचा खर्च, कदाचित् खाजगी विद्यालयांना सोसणार नाहीं; परंतु, त्यावर उपाय हाच कीं पदवीपरीक्षेचें शिक्षण विद्यापीठांनीं प्रत्यक्ष आपल्या ताब्यांत घ्यावें. या दृष्टीनें हल्ली प्रस्थापित झालेल्या पुणें विद्यापीठाचा उपक्रम स्तुत्य आहे.

आतां प्राध्यापकवर्गाकडे बघा. अभ्यासुवृत्तीचा त्यांच्यांत लोप होत आहे. याला बहुतांशीं परिस्थिति जबाबदार आहे असें वाटतें. पुण्यांतील एका नामांकित प्राध्यापकानें सहज बोलतांना एकदां असे उद्‌गार काढले कीं आपल्या विषयाच्या सखोल अभ्यासापेक्षां How to win friends and influence people? अशा पुस्तकांचा अभ्यासच आजकाल प्राध्यापकांना विशेष हितावह होतो! यांतील मर्म स्पष्ट आहे विद्याभ्यासापेक्षां कांहीं इतर गोष्टींचेंच आमच्या समाजांत विशेष चीज होतें ! या बाबतींत विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. ज्या समाजांत गुणग्राहकता नाहीं, त्या समाजाचें गुणवर्धन होणें शक्य नाहीं ! इतकें सांगितलें कीं पुरे ! क्लाइव्ह आणि डुप्ले हे दोन प्रख्यात पाश्चात्य मुत्सद्दी एकाच वेळीं हिंदुस्थानांत आपल्या राष्ट्राच्या साम्राज्यवाढीच्या खटपटींत होते. इंग्लिश राष्ट्रानें क्लाइव्हच्या सर्व दोषावर पांघरुण घालून त्याच्या गुणांचें ‘चीज’ केलें, त्याला प्राठिंबा दिला. फ्रेंचांनीं डुप्लेच्या लहानसहान दोषांबद्दलहि त्याला क्षमा केली नाहीं; प्रत्येक वेळीं त्याचा पाणउतारा केला, त्याला निरुत्साह केलें. त्याचा परिणाम काय झाला हें सर्वांस माहीत आहेच.

खाजगी विद्यालयाच्या बाबतींत प्रस्तुत फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. परंतु, ओघानेंच आलें म्हणून, असल्या संस्थांच्या आर्थिक असहायतेबद्दल

योग्य ती सहानुभूति ठेवूनहि, हें सांगणें जरूर आहे कीं या संस्थांचें चालकत्व यापुढें शिक्षण तज्ञांच्या हातीं येणें जरूर आहे. या बाबतींत आतां विद्यापीठांनीं हालचाल करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सधनता व खर्चाची तोंड-मिळवणी करण्या इतपत बौद्धिक उंची, या गोष्टी शिक्षण संस्थेच्या चालक होण्यास पुरेशा नाहींत. कारण, भावी पीढींचें व्यक्तिमत्व घडविणारी विद्यालयें चालविणें म्हणजे तेल तुपाचा धंदा चालविणें नव्हे. शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांत आदर नाहीं, ही ओरड हल्लीं फार चालू आहे. यांत तथ्य असेलहि. परंतु, आपली विद्वत्ता, व्यक्तिमत्त्व यांच्या आधारें पद टिकविण्याचें सोडून, धनिकांची लाचारी पत्करणारे आजचे प्राचार्य नि प्राध्यापक विद्यार्थ्यांना आदरणीय वाटावे तरी कसें ? ज्यांची मनें मारून टाकण्यांत आली आहेत, ज्यांचें व्यक्तिमत्त्व विकत घेण्यांत आलें आहे, अशांच्या हातून विद्याक्षेत्रांत नवनिर्मिती, नव संशोधन शक्य आहे काय ?

## संशोधन व संशोधक

पदवी परीक्षेपर्यंतच्या शिक्षणाचा विचार केल्यानंतर शास्त्रसंशोधनाच्या बाबतींत कांहीं विचार मांडणें क्रमप्राप्तच आहे. संशोधन हें बहुतांशीं व्यक्तिगत कार्य असतें. एकाच विषयावर पांचपंचवीस लोक कार्य करीत असले, तर त्यांचा परस्परांना उपयोग होऊं शकेल; परंतु, तेवढ्यानें संशोधनाचें व्यक्तिगत स्वरूप नष्ट होत नाहीं. वाङ्मयनिर्मितीचे उदाहरण याचें स्पष्टीकरण करूं शकेल. प्रख्यात साहित्यिक एकत्र येऊन, समाजहितास्तव वाङ्मय कसें असावें हें ठरवूं शकतात, एकाच ध्येयानें प्रेरित होऊन, परस्परांशीं सहकार्य करूं शकतात; परंतु, प्रत्येकाची वाङ्मय-निर्मिति स्वतंत्रच असणार. तसाच कांहींसा प्रकार शास्त्र-संशोधनाच्या बाबतींतहि आहे. म्हणूनच, आपल्या देशांत शास्त्रसंशोधनाची परंपरा स्थापन करावयाची असेल, तर संशोधकांचें हित, त्यांच्या अडीअडचणी लक्षांत घेणें जरूर आहे. संशोधनकार्य हें बहुधा खर्चिक असतें, श्रमांच्या मानानें त्यांत प्राप्ति अल्प असते, यश येईलच ही खात्री देतां येत नाहीं. परंतु, यश आल्यास सर्व अपयश धुवून निघतें, हेंहि खरें. शास्त्रसंशोधन हें व्यक्तिगत कार्य असलें, तरी त्याचा लाभ सर्व समाजाला मिळतो; म्हणूनच संशोधनास प्रोत्साहन देणें हें समाजाचें कर्तव्य आहे. संशोधक हा आपल्या संशोधनावर जगूं शकत नाहीं. हा धंदा स्वावलंबी होणेंहि कठीण, मग

फायदेशीर होणें दूरच राहो ! अर्थात्, जे अगदींच 'ध्येयवेडे' नाहींत, ते सहसा या भानगडींत पडत नाहींत. हा दोष सर्वस्वी आपल्या समाजरचनेचा आहे–भांडवलशाहीचा आहे. अशाप्रकारच्या समाजरचनेंत कांहीं व्यवसाय फायदेशीर तर कांहीं दरिद्री, हा भेद सदैव असणार. या रचनेंत आवडीनुसार व्यवसाय निवडणें हें बहुधा अशक्यच असतें ! भांडवलशाहींत 'अर्थस्य पुरुषो दासः' हें वचन नेहमींच खरें ठरणार ! रशियांत इतक्या लवकर शास्त्रीय प्रगती कशी झाली हें आतां सहज कळेल. समाजवादी रचनेंत सर्व व्यवसायांना सारखेंच महत्त्व असतें व म्हणून जो तो आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडूं शकतो. ज्यांना संशोधनाची आवड आहे, असे लोक रशियांत इतर कोणत्याहि व्यवसायाकडे न वळतां आपलें सर्व लक्ष शास्त्रसंशोधनाकडे केन्द्रीभूत करतात व यशस्वी होतात. या दृष्टीनें शास्त्रीय प्रगतीस्तव तरी निदान, आपल्या देशांत समाजवादी रचना प्रस्थापित होणें अगत्याचें आहे. परंतु, हा प्रश्न भविष्यकाळचा आहे. आहे ती परिस्थिति जमेस धरतां, तूर्त इतकेंच सांगतां येईल कीं या देशांतील धनिक वर्गानें, सरकारनें, शास्त्रसंशोधनास मुक्त हस्तानें सहाय्य करावें व **देशाच्या संरक्षणाइतकीच देशाची शास्त्रीय प्रगति ही एक आवश्यक बाब आहे, हें सदैव ध्यानांत ठेवावें.** संशोधक होण्याचा मोह वाटेल, निदान या व्यवसायांत कायमचें राहिल्यास स्वाभिमानाने जगतां येईल, इतपत तरी वेतन संशोधकास मिळालेंच पाहिजे. नाहींतर शास्त्रीय पीछेहाटीचे सर्व दुष्परिणाम आपल्या देशाला भोगावे लागतील, हें निश्चित !

( राजाराम कॉलेज कोल्हापूर, शास्त्रविभाग स्नेह संमेलन, जानेवारी १९४९ प्रसंगीचें भाषण; स्थळः पॅलेस थिएटर, कोल्हापूर. )

संक्षिप्तवृत्तः " गर्जना " कोल्हापूर, जानेवारी १९४९; लेखः " किर्लोस्कर " मार्च १९५०.

# जातीयतेवर तोडगा

सन १९४५ सालच्या निवडणुकीच्या आधीं प्रस्तुत लेखकानें नेक नामदार डॉ. जयकर यांची भेट घेतली होती. भेटीचें उद्दिष्ट व त्या विषयीं डॉ. जयकर यांची निर्भीड भूमिका त्यांच्याच पत्रोत्तरांत स्पष्ट असल्यानें त्याबद्दल विशेष कांहीं लिहीत नाहीं. बाबासाहेबांनीं तेव्हां व्यक्त केलेले विचार आजहि महाराष्ट्रास मार्गदर्शक ठरतील, या विश्वासानें त्यांच्या इंग्रजी ( ता. २५–१०–१९४५ ) च्या पत्रांतल्या महत्त्वाच्या भागाचा मराठी अनुवाद येथें देणें उचित होईल—

"...आपल्या भेटीनें मला आनंद होईल; परंतु, आपण आपल्या पत्रांत सूचित केलेली चार नेत्यांची एकी ही मला तरी अशक्य वाटते. अशा प्रकारें एक होऊन काम करण्याचें महाराष्ट्र हें योग्य ठिकाण आहे, असें आपण म्हणतां. परंतु, जातीयतेनें गांजलेला महाराष्ट्र आजहि किती अप्रगतिमान आहे याची आपणास बहुधा माहिती नसावी. अखिल भारतीय राजकारणांत महाराष्ट्र मागें असण्याचें हेंच कारण आहे. तसेंच स्वतंत्र विचार व आचार गमावून महाराष्ट्रीय नेते इतर नेत्यांची 'जी जी' करीत असल्याचें ज दुर्दैवी दृश्य आज दिसतें, त्याचेंहि मूळ यांतच आहे. म्हणूनच, जें ध्येय आपण डोळ्यासमोर ठेवलें आहे, त्यांत आपणांस यश येण्याची शक्यता मला तरी कमीच दिसते."

महाराष्ट्रास जडलेल्या एका दुधर रोगाची–जातीयतेची–बिनतोड छाननी वरील पत्रांत आहे. ४५ सालच्या सुमारास 'चल–जाव' ही आमची घोषणा होती. आज 'जातीयता नष्ट करा!' हें घोषवाक्य सर्वत्र निनादत आहे. यांपैकीं पहिली घोषणा अवघ्या चारपांच वर्षांत आम्हीं प्रत्यक्षांत आणली. मग दुसरी घोषणा स्वातंत्र्याच्या या अनुकूल वातावरणांत सहजसाध्य कां ठरूं नये?

## यांत प्रामाणिकता किती?

'चले जाव' चा उच्चार बेचाळीस सालीं झाला, तरी त्यामागील प्रयत्न पाउणशें वर्षांचा होता. उत्कट इच्छेची, हौतात्म्याची, स्वार्थत्यागाची एक अखंडित परंपरा त्यामाग होती. 'जातीयता नष्ट करा' ही या देशांतल्या

लोकांची प्रामाणिक इच्छा आहे काय? तसें असेल तर हा शाप अगदीं जवळच्या काळांतहि मृतवत् होईल. परंतु, या बाबतींत संशय घेण्यास भरपूर जागा आहे. 'जातीयता नष्ट करा' हा आदेश जणु दुसऱ्यासाठींच आहे, स्वतःसाठीं नाहींच, फक्त उपदेश करण्यासाठीं आहे, आचरण्यासाठीं नाहींच, या वृत्तीनें आज जो तो वागत आहे.

जातीयतेस आतां अधिकृत पाठिंबा नाहीं, तत्त्वतः आजचें सरकार जातीयताविरोधी आहे, सिद्ध झाल्यास आमच्या राज्यघटनेनुसार जातीयता हा अपराध होऊं शकतो, हें लक्षांत घेऊन वरकरणी आतां सर्वांनीच जातीयता सोडली आहे. निदान, भरपूर जातीयता असून ती सिद्ध करतां येऊं नये, इतकी खटपट, इतपत राष्ट्रीयतेचें सोंग करणें तर सर्वत्र चालू आहे. परंतु, स्वजातीय आंतरिक आसक्ति व त्याहीपेक्षा परजातीचा द्वेष, आहे तसाच आहे! मानसिक परिवर्तन हें राजकीय परिवर्तनाप्रमाणें झटपट होत नसतें, हेंच यामुळें सिद्ध होत आहे. एक कृत्रिम व नाटकी वातावरण आज या देशांत निर्माण झालें आहे. 'जातीयता नष्ट करा' ही घोषणा करून, आज तरी आम्ही एकमेकांस केवळ फसवीत आहोंत.

आपल्या देशांतील या आत्यंतिक जातीयतेस कोण जबाबदार आहेत? मुसलमान कीं इंग्रज? एक धार्मिक पंथ म्हणूनच नव्हे, तर एक राजकीय संस्था, या दुहेरी दृष्टीनें इस्लाम इतिहासांत वावरला आहे. "जो मुसलमान नसेल, त्याला मुसलमान करा" हा कुराणाचा आदेश असेल, परंतु, जन्मजात जातीयतेचा प्रसार मुसलमानांनीं कधींच केला नाहीं. तसच, जातीयता इंग्रजांनीं ही निर्माण केली नाहीं. ती इंग्रज येण्यापूर्वी या देशांत होती, तशीच त्यांच्या पश्चातहि नव्या दमानें कायम आहे. खरें असें आहे कीं या देशाच्या सर्व प्रकारच्या जातीयतेचें मूळ हिंदु समाजांत आहे. दोन विषसर्प आम्हीं नेहमीं पोशीत आलों आहोंत–आत्यंतिक जातीयता व ऐहिक सुखाविषयीं उदासीनता. पहिल्याने या देशांतील ऐक्य नष्ट केलें, तर दुसऱ्याने पराक्रमाचा नायनाट केला. कारण, पराक्रम सुखासाठींच करायचा असतो ना? जातीयतेनें निर्माण केलेली दुही, हेवेदावे, मत्सर, फुटीर वृत्ति इत्यादींमुळें सातशें वर्षें आम्हीं पारतंत्र्य सोसलें आहे. दुसऱ्या विषसर्पाची चर्चा प्रस्तुत करण्याचें कारण नाहीं; ओघानेंच आलें म्हणून इतकें सांगितलें कीं पुरे,

कीं सुखाची इच्छा, प्रणयभावना, निदान या ब्रह्मज्ञानी देशानें तरी तिरस्करणीय ठरवावयास नको होती. प्रणय नि पराक्रम यांचें सामान्यतः असलेले परस्परावलंबित्व, अन्योन्य संबंध लक्षांत न घेणें, ही निःसंशय चूकच. परंतु, एकीकडे भगवान कृष्णाच्या प्रणयाचें मिटक्या मारीत गायन करीत असतांनाच स्त्री-पुरुष प्रेम आम्ही हीन लेखूं लागलों. अर्थात्, अशानें ही आदिमाया नष्ट थोडीच होणार? मग आंत एक, तर बाहेर दुसरें, असला प्रकार सुरू झाला. आज हा देश योग्यांचाहि नाहीं, भोग्यांचाहि नाहीं, तर जीवनास विटलेल्या जात्यंधांचा आहे! भोंदूंचा गराडा पडेल म्हणून या देशांतील योगी हिमालयांत जातात आणि गुंड नि शिष्टांचा उपद्रव होईल, म्हणून या देशांतील प्रेमी युगुलें अंधारांत झुरतात!

## बेगडी युक्तिवादास प्रत्युत्तर

जातीयतेच्या बाबतींत, हिंदुसमाजानें आत्मसंशोधन केलें नाहीं, हेंच खरें. सत्य परिस्थिती आम्हीं जमेस धरत नाहीं, व स्वतःचा सुधारकरण्याऐवजीं इतरांचा उद्धार करण्यास मात्र पुढें होतों. मुसलमान व मुसलमानेतर असे अल्पसंख्यांकांचे दोन गट आज आपल्या देशांत आहेत. पैकी, सुसंस्कृत असल्यामुळें अथवा फारच अल्पसंख्य असल्यामुळें म्हणा, मुसलमानेतर म्हणजे पार्शी, ख्रिश्चन, ज्यू इत्यादिकांनीं जातीय मागण्या पुढें करून, या देशाच्या प्रगतींत, अलीकडच्या काळांत तरी कोणताच अडथळा आणलेला नाहीं. मुसलमानांच्या बाबतींत एक बेगडी युक्तिवाद सदैव पुढें मांडण्यांत येतो. आधी सात, नंतर एकवीस व शेवटीं पाकिस्तान अशा वाढत्या जातीय मागण्या त्यांनीं पुढें केल्याच कीं नाहीं? हें सत्य आहे. परंतु, याची ही पार्श्वभूमी लक्षांत घेतली पाहिजे. परकीय राज्यसत्तेचें मुसलमानांच्या सवत्यासुभ्याला सदैव प्रोत्साहन नि पाठबळ होतें. त्यांचें राज्यच " फोडा नी झोडा " या तत्वावर आधारलें होतें. अखंड भारतांत मुसलमानांची संख्या सुमारें दहा कोटी होती. अन्तर्गत जातिभेद नसल्यानें तो समाज सुसंघटित होता, तर आत्यंतिक जातिभेदामुळें हिंदुसमाज सदैव विस्कळित राहिला. अर्थातच, मुसलमानांनीं या अनुकूल परिस्थितीचा लाभ घेतला. तो समाज अशिक्षित असेल, परंतु व्यावहारिक आहे. त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. आम्हींच त्यांना जातीय केले!

**या देशांतील बहुसंख्य असा हिंदुसमाज, जातीयतेमुळें असाच निर्बल राहणार असेल, तर प्रत्यक्ष देवदूतही कालांतरानें आक्रमक नि जातीय झाल्याशिवाय राहणार नाहींत. इतरांना आक्रमण करण्यास प्रोत्साहन देणारी आमची निर्बलता, ही त्या आक्रमणाइतकीच निषेधार्ह आहे !** मुसलमानांनीं दम दिला, कारण हा हतभागी हिंदुसमाज दम घेण्यास सदैव सिद्ध होता. कोणत्याही विशिष्ट पुढाऱ्यांना अथवा पक्षाला याविषयीं जबाबदार धरणें, हें अनुदारपणाचें लक्षण होय. कारण, बहुसंख्य समाजाची परिस्थिती लक्षांत घेऊनच सूज्ञ पुढारी " चढेल " अथवा " पडेल " धोरण स्वीकारीत असतात.

## समान संधीच हितकर

आज देश स्वतंत्र आहे, हिंदु समाज सुधारण्याचें नवनवे प्रयत्न होत आहेत. अस्पृश्यताविमोचनार्थ लेखणी झिजविणाऱ्या स्वातंत्र्यवीरांना अस्पृश्यतेचे मृत्युलेख लिहिण्याचें भाग्य लाभत आहे. हिंदु कोड बिल पास होत आहे. परंतु, काय आश्चर्य बघा ! ' हिंदु समाजांत सुधारणा का करतां ? तुम्हीं हिंदुद्वेष्टे आहांत ! ' असा नेत्यांवर आरोप होत आहे. परंतु, स्वतंत्र देशांतील बहुसंख्य समाज सुधारल्यास अल्पसंख्य समाज सुधारण्याचे निराळे प्रयत्नहि करावे लागत नाहींत, ही साधी गोष्ट टीकाकार विचारांत घेत नाहींत.

जातीयता आचरणारे आज निगरगट्ट झाले आहेत. " हो हो आम्हीं करणार, कोण आमुचा हातबळेंची अडवून हो धरणार ? " ही नशा आज बहुतेकांना चढली आहे. या धुंदींत जातीयतेमुळें तात्कालिक हित साध्य झालें तरी परिणामीं अहित झाल्याशिवाय राहात नाहीं, ही गोष्ट बहुधा दृष्टीआड होते. गुणवृद्धि ही गुणांच्या आवश्यकतेनुसार होत असते. विशेष सवलतींच्या मागें लागलेले समाज, विशेष पात्रता मिळविण्याच्या मार्गांत स्वहस्तेंच काटे पसरवीत असतात. कारण, स्वजातीयांच्या आवळ्याएवढ्या गुणांचा भोपळा करणारे भाट एखाद्या समाजांत जितके अधिक, तितकाच तो समाज सामान्य राहील. इतर समाज आपणास पुढें येऊं देत नाहीं, हें वैषम्यहि त्याच्यांत सतत टिकेल व जातीयतेची परंपरा तशीच चालू राहील.

केवळ स्वार्थ साधतानांहि विशेष सवलतीपेक्षां समान संधीची मागणी

करण्यांतच मागासलेल्या वर्गांचें खरें कल्याण आहे. आपली लहान अर्भकें स्पार्टामधील वीर उंचावरून फेंकून देत, कारण जो जगण्यास योग्य असेल त्यानेंच जगावें, हें सृष्टीतत्त्व त्यांनीं पुरेपूर ओळखलें होतें. असामान्य कर्तृत्वाचीं नररत्नें सहसा जातीय परिस्थितीचा लाभ मिळवणाऱ्या समाजांत निर्माण होत नाहींत. किंबहुना, एखादा समाज खाऊनपिऊन सुखी, परंतु, एरवीं शतकानुशतकें सामान्य राहिला असेल तर तें जातीयतेमुळेंच, हें अनुमान काढण्यासहि हरकत नाहीं. कारण, एकमेकांस सदोदित सांभाळीत गेल्यानें, असल्या समाजांत गरिबी नसली, तरी गौरवाई असें कांहीं नसतें. जातीयतेच्या चौफेर कुंपणामुळें अशा समाजांतील व्यक्तींना खऱ्या संकटांची, जगांत एकट्यानें झुंजण्याची, म्हणजेच खऱ्या जीवन-कलहाची नीट प्रचीतीच येत नाहीं; व्यक्तित्वाच्या विकासास अवसरच मिळत नाहीं. त्यांचें जीवन सुखी होतें, पण समृद्ध होत नाहीं.

'आपला समाज इतरांपेक्षा कांहींतरी विशेष आहे!' हा समज करून घेणें व त्यानुसार वागणें हा नुसता मूर्खपणाच नसून आत्मघात आहे. हिटलर, सीझर, नेपोलियन अथवा टोजोनें असाच समज करून घेतला. आपल्या कर्तृत्वाचा फाजील अभिमान कोणत्याहि जाति जमातीनें बाळगणें योग्य नव्हे, याची भारताचा इतिहासहि ग्वाही देईल. मराठ्यांनीं प्रताप गाजविला, तर विजयनगरच्या कन्नड साम्राज्यानें भारतीय संस्कृतीचें रक्षण केलें नाहीं कीं काय? पंजाबांत गुरु गोविंदसिंह व बंदा बहादुर, राजस्थानांत राणासंग व राणाप्रताप, गुजराथेंत दयानंद व म. गांधी, बंगालांत सुभाष व विवेकानंद किंवा उत्तर प्रदेशांत प्रत्यक्ष श्रीराम नि श्रीकृष्ण झाले नाहींत काय? भारतांतल्या प्रत्येक भागानें केव्हां ना केव्हां महत्तम कार्य केलें आहे व वंश, धर्म, देश कोण-ताहि कां असेना, समान संधि दिल्यास नराचा नारायण होतो, हें तत्त्व विसरून चालणार नाहीं.

## जातीयतेचा स्वैराचार

ज्या गोष्टीपासून तात्कालिक लाभ होतो, ती अंतीं कितीहि हानि-कारक असली तरी मनुष्य सहसा केल्याशिवाय राहात नाहीं. दारू पिणें, चोरी करणें हें स्वतःस, व काळाबाजार करणें देशास बाधक असतें, हें

गुन्हेगारांस माहीत नसतें का ? परंतु, तात्कालिक सुखासाठीं अंतिम हितावर तो निखारा ठेवतोच कीं नाहीं ? त्याचप्रमाणें जातीयतेमुळें अल्पगुणी अथवा गुणहीन माणसांचाच बहुधा लाभ होत असतो. त्यामुळें वरून राष्ट्रीयतेचें कितीहि अवसान आणलें, कितीहि घसा कोरडा केला, तरी हेच लोक बहुधा जातीयतेचे छुपे प्रचारक असतात. कारण, जातीयता हेंच त्यांचें खरें भांडवल असतें.

आज सर्व साधारणपणें हिंदु सेवकाचें लक्ष धन्याच्या जात-पोटजातीकडे विशेष असतें. धनी आपल्या जातीचा असेल तर प्रत्येक बाबतींत भरपूर संधि देऊन, आपल्या सर्व दोषांवर पांघरूण घालून, असतील ते गुण वाढवून व नसतील तर 'स्वभाव, कार्यक्षमता चांगली आहे' इत्यादि मोघम कारणें सांगून तो आपणास वर ओढल्याशिवाय रहाणार नाहीं, हा त्याला विश्वास असतो. स्वजातीय अधिकारी बघून जातीय वृत्तिचे सेवक सर्पासारखे उन्मत्त होतात; भेकडही शौर्याचा लटका आव आणतात. जातवाले अधिकारी आपल्या राजिनाम्यांचा कधींच स्वीकार करणार नाहीं, हें जाणून आपला भाव वाढविण्यास्तव, हे जातीय वृत्तिचें सेवक राजिनाम्यांचा नुसता वर्षाव करतात, रुसण्या-फुगण्याची एक कायम आघाडीच उघडून ठेवतात. तसेंच, धनी आपल्या जातीचा नसेल तर आपल्या गुणांचें चीज कधींच होणार नाहीं, तो सदैव आपल्या उत्कर्षाच्या आड येईल, ही असहाय्यताहि हिंदुसेवकांत असते. अधिकाऱ्यांत जातीय वृत्ति असल्याची नुसती चाहूल लागली कीं पुरे ! ती वाढविण्याच्या कार्यांत या देशांतील लोक भलतेच तयार आहेत. कधी गोडी-गुलाबीने, कधीं रुसव्याफुगव्यानें, तर कधीं दमबाजीने या देशांतील सेवकवर्ग अधिकाऱ्यांना पुरा जात्यंध करून सोडतो.

नीतीच्या कितीही उदात्त गोष्टी केल्या, आमच्या अध्यात्मिकतेचा कितीही डांगोरा पिटला, तरी **सांप्रत या देशांत न्याय अथवा अन्याय हा व्यक्तीकडे बघूनच मिळतो,** हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. ज्याचावर वशीला असेल, त्याला या देशांत न्यायच कशाला विशेष सवलतीही मिळतात व ज्यास तो नसेल त्याचें न्याय्य हक्कही पायदळी तुडविले जातात. न्यायावर दाब आणायचा, परन्तु, अन्यायाचा जाब विचारायचा नाहीं, ही वृत्ति आमच्या हाडींमांशी खिळली आहे. **जी गोष्ट केल्याने अधिक महत्वाची माणसें**

**प्रसन्न होतील तो न्याय, अशी आपल्या देशांत न्यायाबद्दलची सोईस्कर समजूत आहे.** स्वतःवर अन्याय झाला नाहीं, तोवर इतरांवर झालेल्या अन्यायाकडे साफ दुर्लक्ष करण्याची आत्मघातकी खोड आम्हांस जडली आहे. " आक्रमण पृथ्वीराजावर झाले आहे ना? मग मला काय त्याचें!" हा पोक्त विचार करूनच जयचंदाने आधीं पृथ्वीराजाचा व नंतर अवघ्या सहा महिन्यांत स्वतःचा नाश करून घेतला. " तुमच्या अन्यायां-कडे आम्ही डोळेझांक करूं, आमचा अन्याय तुम्ही चालूंद्या " या करारावरच जणुं या देशांत मैत्री स्थापन होते. **समान गुणांपेक्षां समान अवगुणांच्या आधारावर मैत्री प्रस्थापित होणें, हें कोणत्याही समाजाच्या अधोगतीचें लक्षण होय. आपलें वर्तन शुद्ध नि संशयातीत राहिले पाहिजे, ही जाणीवच आपणांत बहुतांशी राहिलेली नाहीं.**

जे परजातीचें साहाय्यच घेत नाहींत, त्यांची जातीयता अनिष्ट असली तरी क्षम्य ठरेल. परंतु, सहाय्य घेतांना सर्व जमातींकडून घ्यावयाचें व हित साधतांना नेमकी आपली जात बघावयाची, हा जातीय अन्यायाचा कळस होय! आणि नेमकी असल्याच प्रकारची जातीयता महाराष्ट्रांतील अनेक खाजगी संस्थांना, शिक्षणसंस्थांना पतित करीत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर असल्या बऱ्याचशा खाजगी संस्था कागदोपत्रीं 'उदार' झाल्या असल्या, तरी बहुतेकांचें पालकत्वच नव्हे, तर चालकत्वहि आज विशिष्ट सधन जातींच्या हातीं आहे. सधनता हा कांहीं दोष नाहीं. शिवाय पैशा-शिवाय व्यक्तीचें चालत नाहीं, तर संस्थांचें कसें चालणार? पण धनि-कांना नम्र विनंती इतकीच आहे, कीं संपत्तित्यागाबरोबर दान सत्पात्रीं होत आहे कीं नाहीं इकडे त्यांनीं लक्ष द्यावें. शिक्षण संस्थांचें पालकत्व त्यांनीं स्वतःकडे ठेवण्यास हरकत नाहीं; परंतु, दैनंदिन व्यवहार, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष-पणें, स्वतःकडे ठेवण्याचा मोह धनिकांनी कटाक्षानें टाळावा. **सधनता व खर्चाची तोंडमिळविणी करण्याइतपत बौद्धिक उंची या गोष्टी शिक्षणसंस्थांच्या चालकत्वास पुरेशा नाहींत.** शिक्षणसंस्थांचें चालकत्व अनुभवी व दूरदृष्टीच्या शिक्षणतज्ञांच्या हातींच असलें पाहिजे; जातीय विचारहि या कामीं उपयोगी नाहीं. शिक्षणसंस्थांप्रमाणेंच सामाजिक

नि राजकीय संस्थांचाही विचार करता येईल. एखादी संस्था जातीय की राष्ट्रीय, हें तिचें सभासद कोण आहेत, इतक्याच मुद्यावरून ठरूं शकणार नाहीं; कारण, सर्व जमाती असूनही पेशवाई मात्र एकाच जमातीची, हा प्रकार संस्थांच्या बाबतींत वेळोवेळीं प्रत्ययास येतो. तसेंच, " उत्तर भारतीय " अथवा " दक्षिण भारतीय " या प्रकारच्या परिषदाही, केवळ त्यांच्यांत त्या त्या भागांतलेच लोक आहेत, याच कारणामुळें जातीय ठरूं शकत नाहीं. कारण, सभासदत्व हेंच गमक धरलें, तर मुलींच्या शाळेंत फक्त मुलीच अथवा आय. ए. एस. सारख्या हुद्यांवर फक्त पुरुषच असल्यामुळें, ह्या सर्वांवरही जातीयतेचा छाप मारतां येईल. म्हणूनच इतकें सांगितलें की पुरे, की संस्थांची जातीयता अथवा राष्ट्रीयता, संकुचित अथवा विशाल दृष्टि, ही केवळ त्यांची वर्तणूक, धोरण, कार्यक्रम नि आचरणावरून ठरवावयाची असते.

इतिहासाचा आदेश स्पष्ट आहे. आळीपाळीनें आमच्यातीलच निरनिराळया जाती हाताशीं धरून विदेशी आजपर्यंत आमच्या राष्ट्रास झोडपीत आले आहेत. " जातीयता आहे तशीच राहिल्यास आमचे सर्व राष्ट्रीय मनोरथ वाळूवरील इमारतीप्रमाणें ढासळून पडतील ! " असें श्री. अण्णासाहेब लठ्ठे सदैव म्हणत. **हिंदुत्वप्रणीत जातीयवाद भयंकर आहे, कारण तो जन्मजात आहे. एकदां तो मान्य केला की पुनर्जन्माखेरीज त्यांतून सुटका नाहीं.** जातीयता नष्ट केल्याविना राष्ट्रसंवर्धनाचे सर्व प्रयत्न व्यर्थ होत, हें जाणून तर महर्षि कर्वे यांच्यासारखे वयोवृद्ध नेते जातीयता नष्ट करण्याचें कार्य अजूनहि उत्साहानें पार पाडीत आहेत.

## धर्मभेदावर उपाय काय ?

हिंदु समाजांतील जातिभेद सोडला तरी धर्मभेद हा या देशांत राहतोच. मग ख्रिस्ती, यहुदी, पार्शी, मुसलमान नि हिंदु यांचा या देशांत नेहमींच सवता सुभा राहणार काय ? धर्माला ऐहिक बाबतींत आपण कोणतें स्थान देऊं, यावर या प्रश्नाचें उत्तर अवलंबून राहील. आमच्या दैनंदिन राष्ट्रीय जीवनांत धर्माचा धुडगूस आहे तसाच राहिला, तर या देशांतील दुही कधींच संपणार नाहीं. धर्मांची अजिबात हकालपट्टी करणें, कोणता तरी एक धर्म सर्वांवर लादणें अथवा धर्मांना ऐहिक बाबतींत कोणतेंहि स्थान न देणें, हे तीनच उपाय

आमच्यापुढ आहेत व या तीन प्रकारांवर आधारलेलें तीन प्रकारचें राष्ट्रीयत्व आज जगांत नांदत आहे.

धर्माधिष्ठित राष्ट्रीयत्वाचें ठळक उदाहरण पाकिस्तान होय; कारण, राजकारणापासून समाजकारणापर्यंत सर्वत्र कुराणशरियत हाच त्यांचा प्रमाण ग्रंथ आहे. अशा प्रकारें सर्वांवर एकच धर्म लादण्याचे प्रयोग इतिहासांत अनेक झाले आहेत; पण अंतीं त्या त्या राष्ट्रासच ते प्रयोग घातक ठरले आहेत. निधर्मी राष्ट्रीयत्वाचें उदाहरण रशिया होय. साम्यवादी लोक धर्म ही अफूची गोळी समजतात, हें सुप्रसिद्ध आहे. आमचें राष्ट्रीयत्व या दोन्ही प्रकारांहून भिन्न आहे. त्यांत वरील दोहोंचा सुवर्णमध्य साधला आहे. तुम्ही धर्म पाळा अथवा पाळूं नका, आमची शासनसंस्था त्याविषयी उदासीन आहे; तिकडे लक्षच देणार नाही, विरोध करणार नाही आणि प्रोत्साहनहि देणार नाही– हाच धर्मातीत राष्ट्रीयत्वाचा खरा अर्थ आहे. हें धर्मातीत राष्ट्रीयत्व हिंदुसभेलाही मान्य असल्याचें दिसतें. जयपुर येथील हिंदुमहासभा अधिवेषनांत तेव्हाचे हिंदुसभाध्यक्ष डॉ. खरे यांनी असें घोषित केले की मुसलमानांनी निराकार समाज, खिश्चनांनी प्रेमसमाज व पारश्यांनी अग्निसमाज असें नुसतें नामांतर केल्यास त्यांना या देशांत संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य राहील. मग, प्रश्न असा उरतो की नामांतर न करतांही या समाजांना या देशांत, हें स्वातंत्र्य कां असूं नये? धर्मातीत राष्ट्रीयत्व म्हणजे निधर्मी राष्ट्रीयत्व नव्हे, असें डॉ. राधाकृष्णन् यांनी अनेकवार स्पष्ट केलें आहे; कारण, या राष्ट्रीयत्वांत धर्म मानणें तसेंच न मानणें, असें दोन्ही प्रकारचें स्वातंत्र्य आहे.

प्राचीन काळीं धर्मातीत राष्ट्रीयत्वाची घोषणा आम्हीं केली नसेल; परंतु, हा देश सदैवच धर्मातीत होता. 'देव–देवता खोट्या; सर्व विश्वाचा शास्ता परमेश्वर हाहि खोटा; स्वर्ग, नरक, आत्मा या सर्व कविकल्पना आहेत' असें म्हणत गौतमबुद्ध सर्वत्र हिंडले; आपल्या ८५ वर्षांच्या आयुष्यांत त्यांनी अर्धाअधिक भारत आपल्या मताचा करून सोडला; परंतु, कोणीहि त्यांना कसलीहि अिजा केली नाही. शुद्ध जडवादी चार्वाकानुयायीहि या देशांत भरपूर झाले; परंतु, कोणींहि त्यांना हटकलें नाहीं. धार्मिक स्वातंत्र्य नि त्यास आवश्यक अशी धार्मिक सहिष्णुता हें या देशाचें वैशिष्ठ्य आहे; म्हणून तर

शैव, शीख नि शाक्त, वैष्णव, जैन नि लिंगायत, बौद्ध, पार्शी नि मुसलमान, वैदिक, अिसाअी नि यहुदी आजहि या देशांत टिकून आहेत.

"कृण्वंतो विश्वम् आर्यम्" हें खरें परंतु, तें साध्य करण्याचा भारतीय मार्ग हृदय परिवर्तनाचा आहे, आततायी आक्रमणाचा नव्हे. कारण, जे समजूतीनें होतें, तेंच शाश्वत टिकतें. बौद्ध धर्माचा प्रचार चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश, लंका इत्यादि देशांत भारतानें या मार्गानें केला, बळजबरीनें नव्हे. म्हणूनच, भारत परतंत्र झाला असतांही या देशांनी बौद्ध धर्म झुगारून दिला नाहीं. आजही मृत्यु शय्येवर असतांना जपानी, चिनी, सयामी भारताकडे, गयेकडे तोंड फिरवितात—नत मस्तकानें त्या महान भारतीयास, गौतम बुद्धास प्रणाम करतात, वंदितात.

अर्थात्, आपल्या राज्य घटनेनें बहाल केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा कोणताही समाज दुरुपयोग करणार नाहीं, ही दक्षता घेणें अवश्य आहे. स्वधर्मियांना, स्वकुटुंबियांना जे धार्मिक स्वातंत्र्य देऊं इच्छित नाहीं, इतरांच्या धार्मिक सहिष्णुतेचा उपयोग, बऱ्या वाईट मार्गानें, स्वधर्मीय लोकांचें संख्याबल वाढविण्याकडेच जे करूं इच्छितात, ज्यांचे हेतु धार्मिक नसून राजकीय आहेत, अशा समाजांविषयीं देशांत साशंकता असली, तर त्यास त्यांचे तेच जबाबदार आहेत. धर्म हा सुद्धां एक नागरिक हक्क आहे व सक्तीच्या धर्मांतरास कडक शिक्षा ठेवण्याचा, आमच्या राष्ट्रीय नेत्यांचा निर्णय स्तुत्य होय. "इकडे 'सॅक्युलर नॅशॅनलिझम' म्हणतां, व तिकडे असले निर्णय कसे घेतां?" या शंका जे घेतात, त्यांना धर्मातीत राष्ट्रीयत्वाचा अर्थच कळला नाहीं; ते आमच्या राष्ट्रीयत्वास चुकीनें निधर्मी राष्ट्रीयत्व समजत आहेत, हें पुन्हां सांगणें अवश्य आहे. खऱ्या अर्थानें धर्मातीत राष्ट्रीयत्व या देशांत मुरले, तर धर्म राहूनही धार्मिक जातीयता या देशांत राहणार नाहीं. इंद्रधनुष्यांतील विविध रंगाप्रमाणें आमचे विविध धर्म आमच्या संस्कृतीस सौंदर्य नि महानताच प्राप्त करून देतील.

## अल्पसंख्यांकांवरील जबाबदारी

अर्थात, या देशातील अल्पसंख्यांकांवरही कांहीं जबाबदारी आहे. या देशाचे नागरिक होऊन राहावयाचें व आपुलकी मात्र देशाच्या सरहद्दीबाहेर

ठेवावयाची, हें दुटप्पी धोरण योग्य नव्हे. आर्य लोक मध्य आशियांतून भारतांत आले, तेव्हां केवळ ऋग्वेदाचा कांही भाग त्यांनी आपल्या बरोबर आणला होता, असें म्हणतात. एवढ्यावरच ते राहिले असते, ऋग्वेद हाच त्यांनी अखेरचा शब्द धरला असता, तर या देशाविषयीं त्यांना कधींच ममत्व वाटलें नसतें. उत्तर ध्रुवाचे गोडवे गाणें, हेंच कार्य ते करीत राहिले असते. परंतु, ऋग्वेद प्रमाण मानून ते राहिले नाहींत; जो ऋग्वेद प्रमाण मानीत नाहीं, त्याचा निःपात करण्याचा त्यांनी चंग बांधला नाहीं. आणखी तीन वेदांची रचना त्यांनी या देशांत केली. पराभव करूनही अनार्यांशीं मिळतें घेतलें. त्यांच्या देवास अखिल भारताचा देवाधिदेव " महादेव " केला. त्यांच्या भावनांचा अनादर होऊं नये, म्हणून लिंगपूजाही रूढ केली. आज आर्य आणि अनार्य हा भेदही लक्षांत येत नाहीं. सप्तसिंधु या आपल्या देशाच्या पुरातन नांवावरून, " हिंदु " या नांवानें, ते आज उभयता ओळखले जातात. आचार-विचार, देव-देवता, ऐतिहासिक महापुरुष, धर्म नि पुण्य क्षेत्रें यांची त्यांच्यात इतकी देवाण घेवाण झाली आहे, की आर्य-अनार्य हा भेद आतां भूतकाळांत विरून गेला आहे.

भारतांतील धार्मिक अल्पसंख्यांकांनी स्वधर्मानुरूप खुशाल आचरण करावें, परंतु, स्वातंत्र्याच्या या काळांत, संस्कृतिक दृष्ट्या ते या देशाशीं एकरूप झाले पाहिजेत. हिंदु-मुस्लिम प्रश्नच घ्या. इंग्रजी राज्य या देशांत प्रस्थापित झालें नसते, तर हिंदु-मुस्लिम समन्वय कदाचित् यापूर्वीही घडून आला असता. परंतु, इंग्रजांनी फुटीर वृत्तिला उत्तेजन दिलें. समन्वय व्हावा, याच हेतुनें महात्माजी " ईश्वर अल्ला तेरे नाम " या निर्भेळ सत्याचा जप करीत होते ना ? परंतु, हिंदुसमाजाच्या या समन्वयी वृत्तिचा अर्थ " दुर्बलता " हा घेण्यांत आला व मिळते घेण्याचें या समाजानें केलेले सर्व प्रयत्न यशस्वितेनें अयशस्वी करण्यांत आले.

आतां परिस्थिती बदलली आहे. हा देश आतां स्वतंत्र आहे. अंतर्बाह्य शत्रूंना काठोकाठ सामना देतील, असे खंबीर नेते या राष्ट्राला मार्गदर्शन करीत आहेत. ही सत्यता जमेस धरून, या पुढें धार्मिक अल्पसंख्यांकांनी आपलें धोरण ठरवावयास हवें. या देशाचें केवळ नागरिक म्हणून राहावयाचें व हक्का करिता भांडावयाचें ही स्थिती इष्ट नाहीं. नागरिकत्वापेक्षां या देशाचें जनकत्व

प्राप्त करून घेण्यास्तव त्यांनीं झटलें पाहिजे व कोणत्याही देशाचें जनकत्व केवळ पिढ्यानुपिढ्या राहिल्यानें प्राप्त होत नाहीं. या देशाच्या संस्कृतीत भर घालून जे या देशाशीं समरस होतील, झीज सोसून जे या देशास मोठेपणा प्राप्त करून देतील, तेच या देशाचे खरे वारसदार ठरतील. "मुंबई कोणाची ?" हा प्रश्न टाकल्यावर सर्वच उभे राहतात ! परंतु, गेल्या युद्धकाळी विमान हल्ला होण्याची शक्यता निर्माण झाल्याबरोबर, ज्यांची खरोखर मुंबई होती, तेच बिचारे धोका पत्करून मुंबईंत राहिले. इतर सर्व पैसा अडका गोळा करून पसार झाले ! वर्षानुवर्षे राहणाऱ्या भाडेकऱ्यापेक्षा, एरवी फिरकूनही न बघणाऱ्या घरमालकांसच घराची खरी किंमत असते, कारण, त्या घराकरितां त्यानें कांहीं झीज सोसलेली असते; पैसा खर्च केलेला असतो. भाडेकरी हा केवळ नागरिक असतो, हक्काकरितां भांडणें इतकेंच त्याचें कार्य असतें ! पारतंत्र्य विमोचनाची तळमळ या देशातील एका विशिष्ट समाजासच कां होती, इतर समाज अशावेळीं कमीजास्त प्रमाणांत, पण भलभलत्या आणि वाढत्या अटी कां घालीत होते, अथवा स्वस्थ कां बसले होते, इत्यादि प्रश्नांची उत्तरें नागरि-कत्व आणि जनकत्व, या भेदांतच आहेत. नागरिकत्व आणि जनकत्व यांतील भेद लक्षात न घेतल्यानें विश्वासघाताचे अनेक दुर्दैवी प्रसंग आपल्या राष्ट्रावर आले आहेत. सांस्कृतिक दृष्ट्या जे लोक भारत आपला मानतात, तेच संकटकालीं या देशाचें संरक्षण करतील, हें उघड होय. **धर्म निराळा असूं द्या अथवा आमच्या अनेकउत्कृष्ट धर्मग्रंथांत कुराण नि बायबल यांचीही मौलिक भर पडूं द्या; परंतु, या देशाची राष्ट्रभाषा, इतिहास, परंपरा, संस्कृति यांविषयीं अल्पसंख्यांकांस ममत्व वाटणें जरूर आहे** ही निष्ठा जर तें बाळगतील, तर आर्य आणि अनार्य, या भूतकालीन भेदाप्रमाणेंच, आजचे सर्व भेद, सर्व कलह इतिहासांत विरून जातील आणि सर्व संग्राहक असा एक आदर्श भारतीय समाज उदयास येईल, की जो पैगम्बर व येसू, झरतुस्त्र व मोझेस, बुद्ध व नानक या सर्वांचे पुण्य स्मरण करील. भारतांतील समजूतदार अल्पसंख्यांक या दृष्टीनें वाटचालही करूं लागले आहेत. म्हणूनच, भविष्य काल निश्चितपणें आशा-दायक वाटतो.

## जातीयतेवर तोडगा कोणता ?

जातीयवादाच्या विविध अंगाची चर्चा आत्तापर्यंत झाली. आतां हा दुर्धर

रोग नष्ट कसा होईल, याचा विचार करूंया. अडीअडचणींच्या वेळीं आपले जातबंधूच आपल्या उपयोगीं पडतील, आपलें आसन स्थिर करतील, या विश्वासानें अधिकारीवर्ग आणि गुणाच्या बळावर पुढें येण्यापेक्षां 'जात' दाखवूनच पुढें येणें अधिक सोपें आहे, हें बघून सेवकवर्ग जातीय होत असतो. अहंता व क्षुद्रता हे दुर्गुण जातीय वृत्ति वाढवितात. अशा प्रकारें व्यक्तिगत भवितव्याबद्दल साशंकता व मानसिक अहंता, या गोष्टीच प्रामुख्यानें जातीय वृत्तीस जबाबदार आहेत. अर्थात्, उपाययोजना त्यांवरच होणें आवश्यक आहे. जातीयतेच्या दुष्परिणामाचा केवळ जप करून, "जातीयता नष्ट करा" हा टाहो फोडून अथवा परीट घडीवर तसले बिल्ले लावून हा दुर्धर रोग नाहींसा होणार नाहीं. कारण, केवळ दोष दाखवून सुधार होत नसतो, मार्ग सुचविले पाहिजेत.

तर मग आमची संकुचित जातीय मनें उदार कशीं होणार? आमचा समाज गुणग्राहक कसा बनणार? व्यक्तिगत भवितव्याबद्दल सदा भेडसावणारी आजची अनिश्चितता नष्ट होणें शक्य आहे काय? यावर उपाय उघड आहेत—(१) कलेची वाढ (२) शिक्षणाचा प्रसार (३) आर्थिक सुरक्षिततेची योजना (४) चरितार्थ साधनेचें स्वातंत्र्य.

जातीय वृत्तीचा उगम मानसिक क्षुद्रतेंत व अहंतेंत असल्यानें, अहंता विसरावयास लावणारी 'कला' हा तिच्यावर उत्कृष्ट तोडगा होय. कलेच्या क्षेत्रांत आजहि या देशांत जातीयता नाहीं, हें गुलामअली नि अबदुल करीमखां यांचा हिंदु शिष्यवर्ग, तसेंच व्ही. शांताराम व सी. रामचंद्र यांचे पंजाबी-बंगाली चाहते सप्रमाण सिद्ध करीत आहेत. नर्गिसचा अभिनय पाहतांना, नौशादचें संगीत ऐकतांना, ते मुसलमान आहेत याची आपण दखल घेतों का? सोहराब मोदी पार्शी म्हणून त्यांच्या चित्रपटावर आपण बहिष्कार टाकूं का? लतेच्या गाण्याचें वेड जसें या देशास आहे, तसें तें पाकिस्तानास नाहीं काय? ब्रॅडमनचें क्रिकेट, गामाची कुस्ती, ज्यो लुअिसचें मुष्टियुद्ध पाहण्यास आपण कधींच चुकणार नाहीं. शाकुंतल नि मेघदूतचा आस्वाद घेतां यावा म्हणूनच जर्मन पंडित संस्कृत शिकले ना? तुकारामाचे अभंग, ज्ञानेश्वराच्या रसाळ ओव्या, रसखान नि रहीमचें कृष्णप्रेम, गुरु नानकचे पवित्र धर्मग्रंथ, यांची साऱ्या देशास

ओळख झाली, तर महाराष्ट्रियांवर भांडखोरपणाचा, मुसलमानांवर सरसहा हिंदु-द्वेषाचा व शीखांवर आक्रमक असल्याचा आरोप कोण करील ? या दृष्टीनें आंतर-प्रांतीय खेळांचे सामने व सहली, वाङ्मयाची देवाणघेवाण, विविध जमातींनी जतन केलेल्या कलांचा प्रसार देशांत जितका अधिक होईल, तितके आमचे गैरसमज, आमची साशंक वृत्ति, आमची जातीयता लवकर नष्ट होईल.

म्हणूनच, उच्च प्रतीच्या कलासक्तीची वाढ देशांत होत आहे कीं नाहीं, या देशांतील नाटकें, तमाशे, चित्रपट, खऱ्या अर्थानें लोकरंजन करीत आहेत कीं विफलता निर्माण करीत आहेत, हे प्रश्नसुद्धां पंचवार्षिक योजनेइतकेच महत्त्वाचे आहेत. **अर्थात्, कला व व्यसन यांतील भेद लक्षांत घेणे जरूर आहे. कलेचा उद्देश मानवी मनास उच्च पातळीवर नेण्याचा, उत्साह देण्याचा, कार्योन्मुख करण्याचा आहे, कार्यविन्मुख करण्याचा नव्हे. जी श्रमपरिहार करून नवा उत्साह देते, जिच्यामुळें मनुष्य दिलदार होतो, ती कला. कलाप्रेम जेव्हां कर्तव्यकर्माच्या आड येतें, तेव्हां तें व्यसन झालें, असें समजण्यास हरकत नाहीं.** दुर्दैवाने कला नि कलावंत यांना हीन समजणें या देशांत शिष्टमान्य आहे. सुखोपभोग येथें तिरस्करणीय समजण्यांत येतो! अशा प्रकारें वासना दडपून टाकलेलीं आमची मनें कितपत उदार असूं शकतील याची कल्पनाच केलेली बरी !

## कोरडें पांडित्य नको !

'न्यूनगंडामुळें माणूस दुर्गुणी होतो' हा मानसशास्त्राचा एक सिद्धान्त आहे. लाळघोटेपणा, चहाडखोरी इत्यादि दुर्गुणांप्रमाणेंच जातीय वृत्तीचा उगम मानसिक दुर्बलतेंत आहे. गुणबळाची ज्यांना खात्रीं नाहीं, तेच लोक बहुधा जातीयतेचा आश्रय घेतात. हेच लोक तोंडावर राष्ट्रीयतेचें हास्य फुलवून, हृदयांत जातीय असूयेची जोपासना करतात! हें मनोदौर्बल्य नष्ट कसें होणार ? योग्य शिक्षण हाच यावर उपाय होय व जे चरितार्थाला उपयोगी, व मनोधैर्यास पोषक, तच योग्य शिक्षण.

जगाच्या अफाट पसाऱ्यांत स्वतःची मर्यादित शक्ति, क्षुद्रता ज्याला कळली नाहीं, त्यास विद्वान तरी कसें म्हणतां येईल ? ज्यास लोकसंग्रह करतां येत नाहीं, लोकसेवा करण्याची ज्याची इच्छा नाहीं, त्या पंडिताचा काय उपयोग ?

ज्या शिक्षणानें राष्ट्रीय संपत्तींत भर पडेल, तसेंच व्यक्तिगत द्रव्यार्जनहि करतां येईल, तेंच खरें शिक्षण. दुर्दैवानें या देशांतील द्रव्यार्जन— निदान अधिकांश द्रव्यार्जन–आज तरी अडतपद्धतीने ( कमिशन एजन्सी पद्धतीने ) होत आहे. एखादी वस्तु १० रुपयांना विकत घ्यावयाची व १५ रुपयांना विकावयाची व या विनिमयांत पांच रुपये कमवावयाचे हा आमचा व्यापार ! यांत वस्तूंची निर्मिति नाही; फक्त खांदेपालट होते. 'नवनवे कारखाने काढून परदेशी मालाच्या तोडीच्या वस्तु तुम्ही या देशांत तयार करणार काय ? डॉक्टरी पेशा पत्करून देशाची शारीरिक संपत्ति तुम्ही वाढविणार काय ? लेखन व वक्तृत्वानें थोडे तरी नवे विचार तुम्ही समाजास देतां काय ?' या प्रश्नांचें उत्तर होकारार्थी असेल, तुमच्या शिक्षणानें ही कुवत तुमच्यांत निर्माण केली असेल, तरच तुम्ही सुशिक्षित आहांत; अन्यथा, तुमच्या पदव्या, हीं लोढणीं व तुमचें ज्ञान हें कोरडें पांडित्य ठरेल. समाजास सुशिक्षितांची गरज आहे; पंडितांची नव्हे.

मनुष्य भाकरीशिवाय जगूं शकत नाहीं ही सत्य गोष्ट जमेस धरून, इतर चांगल्या गोष्टींबरोबर द्रव्यार्जन करण्याची कुवत ज्यामुळें निर्माण होईल, असाच शिक्षणक्रम यापुढें आंखला गेला पाहिजे. म्हणजेच, नुसत्या पदव्यांपेक्षां प्रत्यक्ष धंदेशिक्षणास यापुढें अधिक महत्त्व देणें जरूर आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांत आज हीच परिस्थिति आहे व आमची आर्थिक लाचारी नष्ट करण्याचा हाच मार्ग होय. **अशा प्रकारें जे शिक्षणाची पुनर्घटना करूं इच्छितात तेच खरोखर जातीयता नष्ट करूं शकतील. जातीयता नष्ट करण्याचें कार्य गृहमंत्र्याचें नाहीं; शिक्षणमंत्र्याचें आहे.** गृहमंत्री राज्यदंडाच्या आधारें जातीयता कांहीं काळ दडपून ठेवूं शकेल; परंतु, नष्ट करूं शकणार नाहीं. शिक्षणाच्या प्रसारामुळें आमचीं मनें विशाल होतील व जात्याभिमानापेक्षां राष्ट्राभिमान हितकर हें सहज पटेल. समाजासहि गुणांची कदर व पारख करण्याची सवय जडेल व गुणवृद्धीस प्रोत्साहन मिळून जातीयतेस आळा बसेल.

आणखी एक गोष्ट सांगणें जरूर आहे. कलेची वाढ, शिक्षणाची पुनर्घटना या गोष्टी सावकाशीनें होतील. आमची आर्थिक लाचारी नष्ट करण्याचा जव-

ळचा मार्ग कोणता ? समाजाची नैतिक उंची वाढविण्याकरितां आज जो पैसा सरकार खर्च करीत आहे, त्याचा ओघ तूर्त तरी नवीन कामधंदे निर्माण करण्याकडे वळविणें अवश्य आहे. द्रव्यार्जनाच्या क्षेत्रांत अधिक शाश्वति निर्माण झाली नाहीं, तर सामान्यजनतेस स्वातंत्र्याचा उपयोग तरी काय ?

आर्थिक लाचारी व अनिश्चितता ही बहुधा मानवास पतित करते. आमच्या समाजाची नैतिक उंची वाढावयाची असेल, आमची संकुचित जातीय मनें विशाल नि राष्ट्रीय व्हावयाचीं असतील, तर या देशांतील प्रत्येक व्यक्तीस आर्थिक दृष्ट्या आत्मविश्वास वाटला पाहिजे. संपत्तिची आजची विषम वाटणी, गरीब नि श्रीमंत हे दोन ध्रुव नष्ट झालेच पाहिजेत. व्यवसाय मग ते कोणतेहि असोत, समाजास हितकर व आवश्यक असतील, तर त्यांचें सामाजिक महत्त्व समान लेखण्यांत आलें पाहिजे. व्यवसायांतील उच्च व कनिष्ठ हा भेद यापुढे राहतां कामा नये. अन्यथा, जुने जातिभेद नष्ट झाले तरी नवे निर्माण होतील ! **चरितार्थ साधनस्वातंत्र्याचा विचार मुख्यतः ग्रामोद्योगाच्या बाबतींत होणें जरूर आहे.** ग्रामोद्योगाची जोपासना व्हावी, वाढ व्हावी, हें ठीक आहे. परंतु, **हें ग्रामोद्योग आजच्या प्रमाणें जन्मजात असूं नये, अन्यथा ते जातीयतेचे वाले किल्लेच ठरतील.** सुतार, लोहार, चांभार या जन्मजात जाति असणें योग्य नव्हे. ज्या व्यक्तीस जें काम उत्तम रीतीनें करता येत असेल, तें त्यानें करावें, इतकेंच नव्हे तर त्यांस त्याबाबतींत सरकार नि समाज या दोहों-कडून प्रोत्साहन मिळावें. अमक्या जातींत जन्म घेतला, म्हणून अमकाच व्यवसाय केला पाहिजे, हें बंधन कोणीच मानू नये. कारण, आजच्या औद्यो-गिक युगांत पूर्वीचे अनेक व्यवसाय फायद्याचे राहिलेले नाहीं व त्यांस निष्का-रण चिकटून बसणें, हें दारिद्र्यास आमंत्रण देणें होय.

व्यवसायाच्या बाबतींतील वरील दृष्टिकोन व्यवहारांत आणावयाचा तर समाजवाद स्वीकारणें अपरिहार्य ठरतें. अर्थातच, समाजवादाचा पुरस्कार नि प्रसार जातीयता नष्ट करण्याचा एक उत्कृष्ट उपाय होय.

## तीन व्यक्तिगत मार्ग

वर सुचविलेल्या मार्गांखेरीज जातीयता नष्ट करण्याचे आणखी तीन मार्ग

आहेत. हे व्यक्तिगत असल्याने कोणासहि आचरितां येण्यासारखे आहेत. ते म्हणजे ( १ ) आंतरजातीय विवाह अथवा त्यांचा पुरस्कार ( २ ) जातीयतेची समजून केलेली उपेक्षा ( ३ ) विधायक दृष्टीने जातीय अन्यायांचा यथाशक्ति प्रतिकार.

जातीय वृत्तीचा उगम मनोविकृतींत अथवा मनोदौर्बल्यांत असेल; परंतु, जातिभेद ही कांहीं मानसिक बाब नव्हे. जन्मजात जातिभेद ही या देशांतील वस्तुस्थिति आहे; किंबहुना, हाच तर आमच्या जातीय वृत्तीचा पाया आहे. शिक्षण अथवा मनोधैर्याने जातीय वृत्ति नाहींशी होईल; परंतु, जन्मजात जातिभेद नष्ट कसा होणार ? आंतरजातीय विवाह हाच यावर एकमेव उपाय आहे. आपला समाज रूढिप्रिय आहे व आंतरजातीय विवाहाची चळवळ त्याच्या गळी उतरविणें हें फार कठीण आहे. परंतु, हेंहि खरेंच कीं जातीयता पूर्णपणें नामशेष करावयाची असेल, तर जातपातीच नष्ट होणें अवश्य आहे.

आज आंतर्जातीय विवाहांचा पुरस्कार नि आचार करणारे सामाजिक कार्यकर्ते हवे आहेत. सरकारनेहि या बाबतींत सहकार्य दिलें पाहिजे. ‘ जे आंतर्जातीय विवाह करतील, त्यांना सरकारकडून विशेष सवलती दिल्या जाव्या ’ अशी मागणी करण्याचा जनतेस अधिकार आहे.

आंतर्जातीय विवाहांनीं नव्या जाति निर्माण होतील, अशी भीति अनेकदा व्यक्त करण्यांत येते. परंतु, अमक्या जातींनी अमक्या जातींशींच विवाह करायचा, असलें वर्गीकरण न करतां, सरमिसळपणें मोठ्या प्रमाणावर असे विवाह झाल्यास ही शक्यता उरत नाहीं. अर्थात्, सर्वत्र समाजसुधारकांच्या कपाळीं असलेला थोडा बहिष्कार, गैरसमजूत, टीका, अपमान, उपहास नि अवहेलना सहन करण्याची तयारी हवीच !

विवाह ही एक वयक्तिक बाब आहे, समाज सुधारणेचें ध्येय डोळ्यासमोर ठेवून प्रीति जडत नसते, ही शंका जें घेतात, त्यांना हें सांगणें जरूर आहे की आंतर्जातीय विवाहांचे पुरस्कर्ते, आंतर्जातीय विवाह हट्टानें करावेत, या मताचे नाहींत. आज अनेक प्रसंगी, अनुरूपता असून ही जातिभेदामुळें विवाह होत नाहीं. ही परिस्थिती, अधिकाधिक लोकांनी पुढाकार घेऊन, बदलणें अवश्य

आहे. अर्थात, अनुरूप वधु नि वर मिळण्याची शक्यता जातिभेद न मानणाऱ्यांच्या बाबतींतच अधिक असणार, हें तर खरेंच. "अधिक संख्याबलातच, अधिक गुण असण्याची शक्यता असते" हा मार्क्सचा सिद्धांत सुप्रसिद्धच आहे.

आंतर्जातीय विवाहांचें यश, अर्थातच, विविध समाजांच्या समजूतदारपणावर अवलंबून आहे. जातीयता नष्ट करण्यास्तव नव्हे, तर राजकीय हेतु मनांत ठेवून किंवा संख्याबल वाढविण्याची हाव धरून, जे इतर समाजांतील मुली करूं इच्छितात, पण देऊं इच्छित नाहीत, अशा समाजांविषयीं सावधता बाळगणें अवश्य आहे.

जातीयतेची समजून केलेली उपेक्षा, हाही जातीयता नष्ट करण्याचा परिणामकारक मार्ग होय. अनेक सामाजिक अन्याय, केवळ लोकांनीं दुर्लक्ष केल्यामुळें. त्यांस खत–पाणी न घातल्यानें, आपोआप नष्ट झाले आहेत. दुर्लक्ष केल्यानें. त्यांचें अस्तित्वच नाकारल्यानें, अनेक रोग बरे होतात, हें मानसशास्त्रज्ञांचेंच नव्हें, तर शरीर शास्त्रज्ञांचेंही अलीकडील मत होय. जातीयतेवर शक्यतो उपाय–योजना झाल्यास, परंतु, त्याच बरोबर जातीयतेचे अवास्तव चिंतन करण्याचे सोडल्यास, या दोषाचें अस्तित्वच विसरण्याचा प्रयत्न केल्यास, जातीयता लवकर नष्ट होईल. आजच्या सरकार–दरबारी जातीयतेस पाठिंबा नसल्यानें व जबाबदार लोकमतही जातीयतेच्या विरूद्ध असल्यानें, या रोगाचें मरण आतां अटळ आहे, **हा आत्मविश्वास जातीयता नष्ट करण्याच्या बाबतींत बरीच आघाडी मारील, हें निश्चित.**

## क्षमाशील वीरांचें कार्य

जातीयता नष्ट करण्याचा तिसरा व्यक्तिगत मार्ग म्हणजे विधायक दृष्टीने, जातीय अन्यायांचा यथाशक्ति प्रतिकार करणें. अन्यायामुळें कोणीहि निरुत्साही होण्याचें कारण नाहीं. स्वार्थत्याग नि धर्मयुद्ध करण्याच्या अशा अपूर्व संधीचें सदैव स्वागतच झालें पाहिजे. व्यायाम, शारीरिक परिश्रम, हे ज्याप्रमाणें शरीरवृद्धीस आवश्यक आहेत, तद्वतच, दुःख, संकटें हीं मनोवृद्धीस पोषक असतात.

जातीयतेमुळे कोणाचीहि हानि झाल्यास, योग्य तें तारतम्य बाळगून, न्याय मिळविण्याची प्रत्येकाने खटपट केली पाहिजे. हें सुद्धां एक राष्ट्र-

कार्यच आहे. असें न करणें, हें एका प्रकारें जातीयतेस प्रोत्साहन देण्यासारखें आहे. जातीय अन्याय मुकाट्यानें सहन करणें, हा नुसता भेकडपणाच नसून देश-द्रोह आहे. अर्थात्, सूडाची भावना मात्र असूं नये. प्रतिकार व सूड यांच्या मर्यादा लक्षांत घेणें जरूर आहे. **अन्यायी माणसानें अन्याय करूं नये, यास्तव केलेली उपाययोजना 'प्रतिकार' या शब्दांत अभिप्रेत आहे; अन्याय केला हा दंश मनांत ठेवून जो छळ केला जातो, तो 'सूड' या शब्दांत अभिप्रेत आहे.** निर्मूलन दुष्टांचें करावयाचें नसून, दुष्टपणाच करावयाचें आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

आपल्या देशांतील जातीजातींत आज 'कांहीं दिवस सासूचे, कांहीं सुनेचे' हा प्रकार चालू आहे. प्रत्येक जात जणु दबा धरून संधीची, प्रत्या-घाताची वाट पाहात आहे. राष्ट्रीयत्वाकरितां लढणारे व झुरणारे, अधिकार प्राप्तीबरोबर जातीय होत आहेत. जातीयतेच्या खऱ्या विरोधकांबद्दल गैरसमज पसरविण्यांत व जातीयता करूनहि ती सिद्ध न होऊं देण्यांत आज जात्यंधांची बुद्धिमत्ता खर्ची पडत आहे! समाजांतील जातीयता जे नष्ट करूं इच्छितात, त्यांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं जातिनिष्ठांची जातीयता हीसुद्धां अखिल समाजाची जबाबदारी आहे.

स्वजातीचें अन्याय हित साधणें, जातीयतेचा खरा अथवा काल्पनिक आरोप करून परजातीवर सूड उगविणें अथवा 'मक्ता' दिल्याप्रमाणें परजातींना 'वळण' लावण्याचा प्रयत्न करणें, या सर्व गोष्टी सारख्याच त्याज्य आहेत. 'स्वतःची सुधारणा करा, जगाचा उद्धार आपोआप होईल' हें स्वामी रामतीर्थांचें बोधवाक्य खरोखर मार्गदर्शक आहे. ज्यांना जातीयता नष्ट करा-वयाची आहे, त्यांनी आपलें मन प्रथम निर्वैर केलें पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची, परंतु, त्यामुळें उद्भवलेलीं संकटें व पसरविलेले गैरसमज हसतमुखानें सहन करण्याची तयारी ठेविली पाहिजे. 'शठं प्रति शाठ्यं' या प्रत्याघाताच्या तत्वज्ञानास कायमची मूठमाती दिली पाहिजे!

जातीयता नष्ट करणें हा एक सामाजिक प्रश्न आहे, राजकीय नव्हे. **बदला घेण्याची ज्यांची वृत्ति आहे, त्यांच्या हातून जातीयता कधींही नष्ट होणार नाहीं. क्रिया-प्रतिक्रिया यांचें अत्यंत अनिष्ट**

**वर्तुळ ते या देशांतनिर्माण करतील. जातीयता नष्ट करणें, हें क्षमाशील वीरांचें कार्य आहे, आततायी आक्रमकांचें नव्हे!** अप्रियता, अवहेलना, उपहास, हेतुपुरस्सर पसरविलेला गैरसमज या सर्वांस न जुमानतां हें कार्य करावयाचें आहे. जातीयतेच्या खऱ्या विरोधकांवर जात्यंध जेव्हां वार करतात, तेव्हां बहुतेक लोक अज्ञानामुळें अथवा हसऱ्या जात्यंधांच्या फसव्या प्रचारास बळी पडून गुपचूप बसतात! ज्यांना समजलेलें असतें, तेहि ' मला काय त्याचें ? ' या फुटीर, व्यक्तिनिष्ठ, दुहीबाज, बेपर्वा व स्वार्थी वृत्तीनुसार शांत असतात. हें सर्व ध्यानांत घेऊनच या पिढीनें जातीयतेस तोंड देण्याचें ठरवावें.

स्वातंत्र्याप्रीत्यर्थ या देशांत भरपूर हौतात्म्य झालें आहे. जातीयता नष्ट करण्यासहि हौतात्म्य-वृत्तीची आवश्यकता आहे गेल्या पिढीनें या देशास स्वातंत्र्य मिळवून दिलें; आजची तरुण पिढी राष्ट्रीय कर्तृत्व खर्ची करणाऱ्या जातीयतेसारख्या अंतर्गत प्रश्नांतहि यशस्वी होणार नाहीं काय ?

( संक्षिप्त भाषण : जयहिंद युवक मंडळ, वेंगुर्ला, १९४७; स्वातंत्र्योत्सव, राणी पार्वती देवी कॉलेज, बेळगांव, १९४९. )

संक्षिप्त हिंदी लेख : " संप्रदायिकता कैसे नष्ट होगी ? " " बेळगांव-समाचार," सप्टेंबर १९४९.

विस्तृत मराठी लेख : " किर्लोस्कर," मार्च १९५५.

वि:
नों: दि:

# नवी हिंदी टंक लिपी

श्री. बाळ गंगाधर खेर यांच्या अध्यक्षतेखाली काम करीत असलेल्या भारत सरकारच्या ‘राज्यभाषा मंडळ’ ( Official Language Commission ) यांचे कडून आलेल्या प्रश्नपत्रिकेनुसार, ऑगस्ट १९५५ मधें “A New Hindi Type Script” हा विस्तृत इंग्रजी प्रबंध, प्रस्तुत लेखकानें मंडळास सादर केला. तसेंच, त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत मंडळासमोर या बाबतींत साक्षही दिली. या प्रबंधांतील विचार अत्यंत संक्षिप्ततेनें खालीलप्रमाणें आहेत.

इतर अनेक गोष्टींप्रमाणें लेखनकार्यहि सुलभ व शीघ्र व्हावें, याकरितां यंत्राचा आश्रय घेण्यांत आला. अर्थात्, मुद्रणयंत्रास व टंकलेखकांस हीं कांहीं बंधनें आहेतच. लिपि जितकी सुटसुटीत, तितकी ती यंत्रांना अधिक सोइस्कर असते. या दृष्टीने २६ अक्षरांची इंग्रजी ( रोमन ) लिपी, ५२ अक्षरांच्या देवनागरी ( हिंदी ) लिपीपेक्षां, मुद्रणास व टंकलेखनास अधिक सोईची आहे, हें निर्विवाद होय. देवनागरी लिपींतील हा अक्षरविस्तार, टंकलेखनाच्या दृष्टीनें तरी संक्षिप्त करणें शक्य आहे काय, याचा प्रस्तुत विचार करावयाचा आहे. मुद्रणांतहि हा लिपिसंकोच असावाच, हा आग्रह नाहीं. कारण, मुद्रणांत अक्षरें जुळविणें व मुद्रित करणें, या दोन क्रिया स्वतंत्र असल्यानें, पहिल्या क्रियेंतील विलंब दुसऱ्या क्रियेंत जलदीनें भरून काढणें फारसें गैरसोयीचें नसतें. हस्तलेखनाच्या बाबतींत तर अशा प्रकारचा लिपिसंकोच अथवा बदल करण्याचें कांहींच कारण नाहीं. तसेंच, हस्त व टंक लिपि यांतील थोड्याबहुत भेदाचाहि बाऊ करण्याचें कारण नाहीं. असा भेद इंग्रजी लिपींतहि आहेच व त्यामुळें फारशी गैरसोय झाल्याचेंहि ऐकिवात नाहीं.

‘अ’ची बाराखडी आतां बहुतांशीं मान्य झाली आहे. म्हणजे ‘क’ पासून ‘ज्ञ’ पर्यंतची अक्षरें काय तीं उरलीं. हीं अक्षरें ‘अ’ आणि ‘ह’ या दोन गटांत खालीलप्रमाणें विभागतां येतील.

( १ ) ‘अ’ विभागः–क, ग, ङ, च, ज, ञ, ट, ड, ण, त, द, न, प, ब, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, त्र, ज्ञ.

( २ ) 'ह' विभागः—ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ.

'ह' गटांतील अक्षरांना आज देवनागरींत स्वतंत्र स्थान आहे. परंतु, हीं अक्षरें जोडाक्षररूपांत, खालीलप्रमाणें लिहिल्यासहि त्यांचा योग्य तो उच्चार होतो.

'क्ह', 'ग्ह', 'च्ह', 'ज्ह', 'ट्ह', 'ड्ह', 'त्ह', 'द्ह', 'प्ह', 'ब्ह'.
(ख) (घ) (छ) (झ) (ठ) (ढ) (थ) (ध) (फ) (भ).

देवनागरींतील अनंत जोडाक्षरांत, या दहा जोडाक्षरांची भर टाकण्यास कांहींच हरकत नाहीं. अर्थात्, हीं अक्षरें देवनागरी मूळाक्षरांतून वजा करणें शक्य आहे.


'अ' विभागांतील अक्षरांचाहि संक्षेप करतां येईल. या गटांतील 'ङ' 'ञ' 'ऋ' हीं अक्षरें अनावश्यक होत. "वाङ्मय" ऐवजी टंकलेखनांत "वांग्मय" लिहिलें तरी फारसें बिघडत नाहीं. "क्ष" "त्र" "ज्ञ" या जोडाक्षरांना स्वतंत्र रूपकें दिलींच पाहिजेत असें नाहीं. कारण, टंकलेखनांत हीं अक्षरें अनुक्रमें "क्श" "त्र" आणि "ग्य" "ज्न" अथवा "द्न्य" या प्रकारें लिहिता येतील. "श" आणि "ष" या दोहोंपैकीं एकाला स्थान असलें की पुरेसें होय. उरलेल्या अक्षरांतहि पूर्णाक्षरांपेक्षां अपूर्णाक्षरांचींच आवश्यकता टंकलेखकास अधिक असणार, कारण,

पूर्णाक्षर = अपूर्णाक्षर + अ (अथवा अपूर्णाक्षर + अ)
ग = ग् + अ (अथवा ग + ा)
च = च् + अ (अथवा च + ा)
ज = ज् + अ (अथवा ज + ा)

अर्थात, ट, ड आणि द या अक्षरांचीं पूर्ण व अपूर्ण रूपें समान असल्यानें त्यांचा प्रश्नच नाहीं.

थोडक्यांत म्हणजे 'अ' आणि 'ह' हीं पूर्णाक्षरें, 'क' गटांतील अक्षरांचीं अर्धाक्षरें व बाराखड्यांतील मात्रा, इतपत देवनागरी लिपीचा संक्षेप करणें शक्य आहे. 'क' गटांतील अक्षरांत 'अ' चें दर्शन हें केवळ कान्यानेच (ा) होतें,

हेंहि वरील समीकरणावरून स्पष्ट असल्यानें, टंक लेखनापुरतें, काना ( ा ) हेंच रूप 'अ' या अक्षरास दिल्यास, फारच सोय होईल. कारण, त्यामुळें इंग्रजीप्रमाणें खालीं दिलेल्या अवघ्या २६ रूपकांत, देवनागरीस, सर्व जोडाक्षरांसहित, आपला संसार थाटतां येईलः—



( 'ळ' हें अक्षर हिंदीं भाषेंत नाहीं. )

या नव्या हिंदी टंकलिपीत 'अ' ची बाराखडी काना मात्रा या रूपांत खालीलप्रमाणें असणार.

ा ाा ि ी ु ू ो ौ ाो ाौ ां ाः
अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

( २ ) 'क' आणि 'स' यांचीं रूपें अनुक्रमें 'का' आणि 'रत्र' हीं असणार.

( ३ ) 'ह' गटांतील अक्षरांना स्वतंत्र रूपकें राहणार नसून, तीं वर सुचविलेल्या जोडाक्षर रूपांत लिहिलीं जातील.

( ४ ) देवनागरींतील उरलेल्या मूळाक्षरांत कोणताही बदल होणार नाहीं.

'क' आणि 'अ' यांचीं सध्याचीं रूपें ठेवावयाचीं असल्यास वरील २६ रूपकांऐवजीं अक्षर संख्या २८ होईल, इतकेंच. अर्थात्, टंकलेखकांतील जगांत यापुढें होणाऱ्या सुधारणा " हिंदी " टंकलेखकांस सहजतेनें आत्मसात् करावयाच्या असतील, तर अक्षरसंख्या २६ असणें केव्हांही अधिक बरें.

अनुक्र ) वि.
क्रमांक ...९०९९... नों. दि.

( ५ ) टंक लेखकाची गति उभी नसून, समांतर असल्यानें उभी जोडाक्षरें ( अट्टल, अड्डा, विद्वान, कर्वे, बुद्धि इ. ) आडव्या रूपांत ( अट्‌टल, अड्‌डा, विद्‌वान, कर्‌वे, इ. ) लिहिली जातील.

या सव्वीस रूपकांखेरीज इंग्रजी टंकलेखकाप्रमाणें, हिंदी टंकलेखकांतहि अर्ध व पूर्णविराम, उद्‌गारचिन्ह, टिंब व रेघ ( dot and dash ), एक ते नऊ हे अंक इत्यादि असणारच.

टंकलेखकांत देवनागरीचा वरीलप्रमाणें संक्षेप केल्यास आणखीहि एक सोय होणार आहे. इंग्रजी टंकलेखकांत २६ लहान व २६ मोठीं ( capital ) अशा अक्षरांची सोय असते. अशा प्रकारचा भेद देवनागरीत नसल्यानें, मोठ्या अक्षरांऐवजी देवनागरी टंकलेखकांत, गुजराथी, कानडी, तामीळ, बंगाली इत्यादि पैकी कोणत्याहि एका लिपीचा जादा समावेशहि करतां येईल. कारण, देवनागरीप्रमाणें यांचाहि संक्षेप करणें शक्य आहे. म्हणजे, shift-key दाबल्याबरोबर इंग्रजी टंकलेखक जसें मोठ्या अक्षरांचें लेखन करतो, तसेंच ही नवी लिपी स्वीकारल्यास भावी देवनागरी टंकलेखक एका जादा लिपींत लेखन करूं लागेल. भाषावार प्रांतरचनेनुसार प्रांतिक व्यवहार प्रांतिक भाषेंत, तर आंतरप्रान्तीय व्यवहार यापुढें देवनागरींत चालणार. अशा प्रसंगीं दोन लिपींत टंकलेखन करणारा, आमचा नवा हिंदी टंकलेखक खर्च व सोय या दोन्ही दृष्टींनीं अधिक उपयुक्त ठरणार नाहीं काय ?

अर्थातच, लिपीसंक्षेपाबरोबरच आजच्या देवनागरी टंकलेखकांतील अक्षर-व्यवस्था व संख्या यांचेहि अराजक नष्ट होणें जरूर आहे. फळयावर (key-board वर ) ४२ ते ४७ किल्ल्या असूनहि आजच्या हिंदी टंकलेखकास हिंदीची योग्य सेवा करतां येत नाहीं. आधीच हिंदी टंकलेखनाची गति मंद; फार तर मिनिटास ४५ शब्द ! त्यांत अंडरवूड, रेमिंग्टन इत्यादींचीं अक्षर-व्यवस्था इतकी भिन्न आहे कीं, एकावर केलेली मेहनत, दुसऱ्याच्या दृष्टीने अगदीच निरुपयोगी ठरते. हिंदी टंकलेखकांत सुधारणा केल्याविना, त्यांतील अराजक नष्ट केल्याविना, यापुढें तरणोपाय नाहीं, हें लक्षांत घेणें जरूर आहे;

कारण, देशाची प्रगति, इतर अनेक गोष्टींप्रमाणें, सरकारी कामकाजाच्या द्रुत-गतीवर अवलंबून असते व टंकलेखन तर या द्रुतगतीचा पायाच होय.

वर सुचविलेल्या नव्या हिंदी टंकलिपींतील लेखन सध्याच्या देवनागरी लिपीहून फारसें भिन्न असणार नाहीं, हें खालील तुलनेवरून लक्षांत येईल:

(" सत्य-प्रकाश, " सावंतवाडी, मधील लेखकाच्या स्फुट लेखांतील एक उतारा, १९४६-४७.)

**नव्या हिंदी टंकलिपीतील लेखन :—**

क्रांति या शब्दाची ाज विटंबना होत ाहे. सर्वत्र तोतये क्रांतिकारकांची क्हैरात ज्हाली ाहे. जो उट्हतो, तो उद्दामपणें वागतो, जनतेच्या नजरेंत व्हरेल ासें काहीं तरी डोंबारी क्रुत्य करतो, वरिष्ट्हांच्या नावानें शंक्ह करतो नि स्वतःवर पुड्हारीपणाचा शिक्का मोर्तब करतो. ाज क्ह्ऱ्या क्रांतिकारी पुड्हाऱ्यांची ावश्यकता ाहे. विरोद्हा करिता विरोद्ह करणारे नव्हे, तर ासणाऱ्या विरोद्हातून विकास साद्हणारे, प्रतियोगी सहकारितेचें तत्व ंगीकारणारे नेते ाज हवे आहेत.

व्यासपीट्हावर गर्जणाऱ्या पुड्हाऱ्यांची ाज ापल्या देशांत वाण नाहीं. विद्हायक कार्यक्रमास्तव ज्हुरणारे सैनिक ाज हवे ाहेत. जे पुड्हारी युवकांना सैनिक होण्यास्तव ावाहन करीत ाहेत, त्यांनीं स्वतः प्रत्हम या सैनिक द्हर्माची दीक्शा घेतली पाहिजे नि त्यास्तव ावश्यक ासल्यास ापल्या पुड्हारीपणास सोडले पाहिजे. व्याक्ह्यान बाजीची निशा चड्हलेल्या या तत्हाकत्हित पुड्हाऱ्यांना ापण ासे स्पष्ट बजावू या की,

कार्य होऊं दे हातानें, बोलणें ाम्हा नको!
शुश्क चर्चा व्हाशणें, तुम्हास ही लक्ह लाब्ह ासो!!

**देवनागरी लिपीतील लेखन :—**

क्रांति या शब्दाची आज विटंबना होत आहे. सर्वत्र तोतये क्रांतिकारकांची खैरात झाली आहे. जो उठतो तो उद्दामपणें वागतो, जनतेच्या नजरेंत भरेल असें कांहींतरी डोंबारी कृत्य करतो, अधिकाऱ्यांच्या नांवानें शंख करतो नि स्वतःवर पुढारीपणाचा शिक्कामोर्तब करतो. आज खऱ्या क्रांतिकारी पुढाऱ्यांची आवश्यकता आहे. विरोधाकरिता विरोध करणारे नव्हे, तर असणाऱ्या विरो-

यांतून विकास साधणारे, प्रतियोगी सहकारितेचें तत्व अंगीकारणारे नेते आज हवे आहेत.

व्यासपीठावर गर्जणाऱ्या पुढाऱ्यांची आज आपल्या देशांत वाण नाहीं. विधायक कार्यक्रमास्तव झुरणारे सैनिक आज हवे आहेत. जे पुढारी युवकांना सैनिक होण्यास्तव आवाहन करीत आहेत, त्यांनी स्वतः प्रथम या सैनिक धर्माची दीक्षा घेतली पाहिजे नि त्यास्तव आवश्यक असल्यास आपल्या पुढारीपणास सोडले पाहिजे. व्याख्यानबाजीची निशा चढलेल्या या तथाकथित पुढाऱ्यांना आपण असे स्पष्ट बजावूंया की,

कार्य होऊं दे हातानें, बोलणें आम्हा नको !
शुश्क चर्चा भाषणें, तुम्हांस ही लखलाभ असो ! !

प्रस्तुत लेखांत "टंक-लेखक" व "टंक-लेखन" हे शब्द "Type-Writer" व "Type-Writing" या इंग्रजी शब्दाकरितां योजिले आहेत.

( लेख : "केसरी", पुणें, २ सेप्टेंबर १९५६. )

---

# — अधःपतनाचें मूळ —

......परधर्म सहिष्णुता व धार्मिक स्वातंत्र्य, यामुळें अध्यात्मिक क्षेत्रांत भारतानें कितीही आघाडी मारली असली, तरी सामाजिक स्वातंत्र्याच्या अभावीं ऐहिक सुखांस मात्र आम्ही बरेच आंचवलो. सहस्त्रावधि वर्षांपूर्वी मनू, याज्ञवल्क्य, पराशर प्रभृति ऋषिवर्यांनी समाजबंधनें निर्माण केलीं. समाजोन्नति हाच त्यांचा मुख्य उद्देश असल्यानें, असें करतांना काल, स्थळ नि समाजाची पात्रता यांचा विचार त्यांनी प्रामुख्यानें केला; गुणवर्धनासाठीं कार्य विभागणी केली, चार वर्ण स्थापन केले. या सामाजिक बंधनांनीच आमचें अनंत काल रक्षण केलें. ती नसती, तर मध्य एशियांतील शक, हूण, तार्तार, मंगोल इत्यादींनी आमचा निःपातही केला असता. परंतु, गुणांचा अतिरेक हाही अवगुणच होय—शिस्तीचा अतिरेक बेशिस्तपणा निर्माण करतो.

तदनंतरच्या मध्ययुगीन काळांत ह्या सामाजिक बंधनांच्या खऱ्या हेतूचा विसर पडल्यामुळें, पूर्वीचे चार वर्ण सोडून अनंत जाति नि त्यांत अंतर्भूत अशा अनंत उपजाति निर्माण करण्यांत आल्या. प्रत्येक जाति ही स्वतःस वरिष्ठ समजून, इतर जातींना कमी लेखूं लागली. साम्यापेक्षां भेदावरच विशेष भर दिल्यामुळें फुटीर नि मत्सरी वृत्ति निर्माण झाली. काळ बदलला, तरीं आम्ही न बदलल्यानें, मृत झालेल्या चालीरीतींना आंधळ्याप्रमाणें मिठ्या मारीत बसल्यानें आमचें अधःपतन झालें ! समाजरक्षक असणारी वर्ण व्यवस्थाच, समाजभक्षक होऊन बसली ! ......

" विक्रम " सांगली, २०-५-१९४४.

... ... ...सामाजिक स्वातंत्र्याच्या अभावीं हिंदु समाज आज खुरटा नि रोगट झालेला आहे. समाजबंधनें निरुपयोगी झालीं, तरी तीं टाकून देण्याची बुद्धि आम्हांस होत नाहीं. आत्यंतिक जातिभेदामुळें आम्ही आमच्या समाजाची धारणाशक्तीच नष्ट करून टाकली आहे. मुसलमानी आक्रमणाच्या कित्येक शतकें आधींच आमच्या सामाजिक ऱ्हासास सुरवात झाली होती. जातिबंधनें, परदेशगमनावर बहिष्कार, अस्पृश्यता, या दोषांची किळसवाणी वाढ झाली होती. बौद्ध जातपात तोडून टाकण्याची भाषा बोलत, म्हणून त्यांचा हिंदूंनीं इतका छळ केला कीं त्यांना 'नको हें हिंदुत्व' असें झालें. आज पंजाब, सरहद्दप्रांत, बंगाल, आसाम नि सिंध हे पाकिस्तानचे बालेकिल्ले आहेत. एकाकाळी हेच प्रांत बौद्धमय झाले होते. आजही ब्रम्ही पद्धतीची रंगीबेरंगी लुंगी मुसलमान वापरतात, हें त्याचेंच द्योतक होय. परंतु, हिंदूंच्या सामाजिक असहिष्णुतेस बौद्ध कंटाळले नि मुसलमानांच्या आगमनाबरोबर त्यांनीं पटापट इस्लाम धर्म स्वीकारला. **अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत तांतडीची उपाययोजना न केल्यास, धर्मांतर टाळता यावयाचे नाही, हा इषारा आम्हांस द्यावयाचा आहे ... ... ... ...**

" झारापकर " मुंबई, ऑक्टोबर १९४४.

डा. ... वि. ... क्रमांक ... नों. दि. ...

९४५८

REFBK-0009458